सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ०७ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २५३ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जय भीम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त वाहिली श्रध्दांजली

नवी दिल्ली : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६९ वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यघटनेचे निर्माते आणि सामाजिक न्यायाचे प्रतिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त श्रध्दांजली वाहिली. त्यांनी समाज माध्यम, एक्सवर याविषयीचे एक ट्वीट केले आहे. मोदींनी भाररत्न बाबासाहेब आंबडेकर यांना नमन करत असल्याचे म्हटले. समानता आणि मानवी मूल्य जपण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मोदी म्हणाले.



## ज्येष्ठ नेते मधुकर पिचड कालवश



नाशिक : ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांनी वयाच्या ८४व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. ब्रेनस्ट्रोकचा झटका आल्याने पिचड यांची तब्येत अत्यवस्थ होती. त्यांच्यावर नाशिकच्या ९ पल्स रूग्णालयात उपचार सुरु होते. मधुकर पिचड यांच्यावर मागील दीड महिन्यांपासून नाशिक येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र त्यांची प्रकृती आणखी खालावली, त्यातच आज त्यांची प्राणज्योत मालवली.

मधुकर पिचड यांचे शुक्रवारी संध्याकाळी साडेसहा वाजता निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम त्यांच्या मूळ गावी राजोर येथे उद्या, शनिवारी संध्याकाळी ४ वाजता होणार आहे. त्यांचे पार्थिव शनिवारी सकाळी १० वाजता देवठाण या गावी जाईल. त्यानंतर साडेदहा वाजता पक्ष कार्यालयत ठेवण्यात येईल. दुपारी १ वाजताच्या सुमारास अकोला कॉलेजमध्ये त्यांचे पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात येईल. त्यानंतर राजौरी येथील मधुकर विद्यालयात पिचड यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येईल. त्यानंतर पुढील विधींसाठी राजौरी येथील त्यांच्या निवासस्थानी पार्थिव नेण्यात येणार असल्याची माहिती पिचड यांचे चिरंजीव वैभव पिचड यांनी दिली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मधुकर पिचड यांचं नाव आदराने घेतलं जातं. त्यांची राजकीय कारकीर्द काँग्रेस पक्षातून सुरू झाली. महाविद्यालयात असतांनाच आदिवासी शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध आंदोलनात सक्रीय सहभागी झाले होते. १९६१ मध्ये त्यांनी हा लढा दिला होता. त्यानंतर पिचड यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. तेथे त्यांनी प्रदेशाध्यक्षपद भूषवले. त्यांनी आदिवासी विकास, वन आणि पर्यावरण मंत्री म्हणून कार्यभार पाहिला होता. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पिचड यांनी राष्ट्रवादीची साथ सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पिचड यांनी आपल्या मुलासह प्रवेश केला. पण, २०१९ च्या निवडणुकीत वैभव पिचड यांचा पराभव झाला. पिचड यांनी अलीकडेच शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे घरवापसीची चर्चा रंगली होती. पण, मधुकर पिचड यांची प्रकृती खालावली. ब्रेनस्ट्रोक आल्याने त्यांना नाशिक येथील नाईन पल्स रूग्णालयात दाखल केलं होतं. त्यांच्यावर दीड महिन्यांपासून उपचार सुरू होते. आज दुपारी पिचड यांची प्रकृती खालावली. संध्याकाळी त्यांनी रुग्णालयामध्ये अखेरचा श्वास घेतला. पिचड यांच्या निधनामुळे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# वर्षभरात देशातील १ लाख ६८ हजार लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू

## केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरींचा खुलासा

नवी दिल्ली : केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत रस्ते अपघातांबाबत धक्कादायक माहिती सांगितली. वर्षभरात देशामध्ये १ लाख ६८ हजार लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला असल्याची माहिती केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत दिली.

नितीन गडकरी म्हणाले की, देशात २०२२ मध्ये एकूण ४ लाख ६१ हजार ३१२ रस्ते अपघात झाले आहेत. या लोकांचा मृत्यू कोणत्याही दंगलीत किंवा लढाईत झाला नाही तर रस्ते अपघातात झाला आहे. केंद्र सरकारने रस्ता सुरक्षा समिती नेमली आहे आणि ब्लॅक स्पॉट्ससाठी ४० हजार कोटी रुपये दिले आहेत. तरीही रस्ते अपघातात वाढ झाली असल्याचं त्यांनी सांगितले. खासदार हनुमान बेनिवाल यांनी रस्ते अपघातासंबंधी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नितीन गडकरी यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की, रस्ते अपघात एक अतिशय गंभीर समस्या आहे. यामागे वेगवेगळी कारणे आहेत. अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये १८ ते ३४ वर्षे वयोगटातील मुले-मुलींचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितले. तसेच, २०१८ ते २०२२ या काळात देशात ७ लाख ७७ हजार ४२३ लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याचे नितीन गडकरी यांनी सांगितले.

मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०१८-२०२२ दरम्यान रस्ते अपघातात ७,७७,४२३ लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. केंद्र सरकारने रस्ता सुरक्षा समिती नेमली आहे आणि ब्लॅक स्पॉट्ससाठी ४० हजार कोटी रुपये दिले आहेत. तरीही रस्ते अपघातात वाढ झाली असल्याचे त्यांनी सांगितले

पुढे नितीन गडकरी म्हणाले की, हेल्मेट न घातल्यामुळे ३० हजार लोकांचा मृत्यू होतो. देशातील नागरिकांनी रस्त्याचे नियम पाळले पाहिजे. नियमांचे पालन न केल्यास वसूल केल्या जाणाऱ्या दंडाच्या रक्कमेत वाढ केली. तरीही लोक नियम मोडतात. यामुळे अपघातांची संख्या वाढत जात आहे. यापूर्वी दरवर्षी रस्ते अपघातात दीड लाख लोकांचा मृत्यू होत होता. मात्र, यामध्ये वाढ झाली आहे. सरकारच्या प्रयत्नांनतरही रस्ते अपघातात वाढ झाल्याचे दु: ख असल्याचे गडकरी म्हणाले.

टोल वसुलीसाठी नवीन प्रणाली येणार

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलंय की, संसदेच्या पुढील अधिवेशनापूर्वी टोल वसुलीसाठी नवीन प्रणाली येणार आहे. महामार्गांवर कोणताही टोलनाका नसेल, वाहनांना कुठेही थांबावे लागणार नाही. अशी नवीन प्रणाली येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जेवढा प्रवास केला जाईल, तेवढाच टोल वसुल केला जाईल त्यांनी सांगितले.

## गुटख्याविरोधात पैठण पोलिसांची कारवाई

तभा वृत्तसेवा पैठण दि ०६ :- नेहरू चौक परिसरातील चौधरी मोहल्ला ठिकाणी एका घरात विक्री करण्याचा उद्देशाने शासनाने प्रतिबंधित केलेला ७० हजार रुपये किमतीचा गुटखा आणि सुगंधीत तंबाखूचा साठा पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उप पोलीस निरीक्षक दशरथ बुरकुल यांच्या पथकाने जप्त केला असून यासाठी आरोपी फैजान धांडे याच्या विरोधात अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकारी प्रज्ञा सुरसे यांच्या फिर्यादीवरून अन्न सुरक्षा कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.



पैठण शहरात अवैध गुटखा विरोधात पोलिसांची ही मोठी कारवाई असून चौधरी मोहल्ला ठिकाणी एका घरात ही कारवाई करण्यात आली. अवैध गुटख्याच्या बाबतीत पैठण पोलिसांना गोपनीय माहिती येताच पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उप पोलीस निरीक्षक दशरथ बुरकुल यांनी वरील ठिकाणी धाड टाकून जवळपास ७० हजार रुपये किमतीचा गोवा,राजनिवास, झेड एल, जाफरणी जर्दा, हिरा पान मसाला,रॉयल ७०७ असा गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी फैजान धांडे विरोधात अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे यांच्या फिर्यादीवरून अन्न सुरक्षा मानदे कायदा, असुमा, कलम ५९ नुसार २२३,२७४,२७५,१२३ बिएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपास पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक दशरथ बुरकुल करत आहेत.

## गंगापुर पोलिसांच्या कारवाईत १४ हजाराचे गोमांस जप्त; एकावर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.६ डिसेंबर : गंगापुर पोलिसांना गोरक्षक दलाच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या माहितीवरून गंगापुर लासूर रस्त्यावर शिंदेवाडी फाट्यानजीक गोमांस वाहतुक करत मोटारसायकल स्वारास पकडले असता त्याच्याकडून ७० किलो गोमांस, व मोटारसायकल असा २९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून एका जणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गोरक्षक दलाच्या कार्यकर्त्यांनी दुचाकीवरून गोमांस वाहतुक होत असल्याची माहिती पोलिसांना दिली असता शुक्रवारी दि.(६ ) रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास गंगापूर लासुर रस्त्यावरील शिंदेवाडी फाट्याजवळ पोलिसांनी आरोपी इदमाम कुरैशी यास दुचाकी क्र एमएच १२ ए पी १०८२ वरुन गोमांस घेऊन जात असता त्यास पकडून त्याच्या ताब्यातून १४ हजार रुपये किमतीचे ७० किलो गोमांस आणि १५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल असा एकूण २९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिस उपनिरीक्षक प्रमोद काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी इदमाम मुनाफ कुरेशी वय १९ रा कुरैशी मोहल्ला गंगापुर याचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे असून आरोपीस अटक करण्यात आले आहे. पोनि. कुमारसिंह राठोड यांच्या मार्गदर्शना खाली पो.उनि अश्विनी कुंभार अधिक तपास करीत आहेत.

## कवी सतीष दराडें यांच्या स्मरणार्थ आज गझल मैफलचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यातील नवीन पिढीचे प्रतिभावंत कवी गझलकार सतीष दराडे यांच्या आकस्मिक जाण्याने साहित्यिप्रेमींना मोठा धक्का बसला. त्यांच्या उत्तम कविता, गझल रसिकांच्या ओठांवर घोळत असतात. सतीष दराडे यांच्या स्मृतीत एका स्मरण मैफलीचे आयोजन शनिवारी, ७ रोजी सायं ६.३० वा. शहरात करण्यात आले आहे. 'अशी जन्मते घरंदाज कविता...' या नावाने सादर होणाऱ्या या गझल मैफिलीत सतीष दराडे यांच्या गझला प्रा. राहुलदेव कदम (लातुर) हे सादर करणार आहेत. या गझला त्यांनीच संगीतबद्ध केल्या आहेत. त्यांना गजानन धुमाळ (तबला), शांतिभूषण देशपांडे (संवादिनी), प्रबोध जोशी (व्हायोलीन), श्रीकांत उमरीकर (बोलवाद्य) हे साथसंगत करणार आहेत. सतीष दराडे यांच्या कवितांचे वाचन गिरीश जोशी, रमेश ठोंबरे, मारोती मानेमोड, जयदीप वघ्रे करणार आहेत. मृदगंध कलादालन, सिडको चौक येथे सायं ६.३० वा. सादर होणाऱ्या या कार्यक्रमांस आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन साहित्यि संगीत कला मंच आणि ट्रान्सडेल्टा फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.






# नाथ ग्रुप आणि सारा बिल्डर्सचा नवा प्रोजेक्ट 'द सोलिटेअर'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर: नाथ ग्रुप आणि सारा बिल्डर्स यांच्या संयुक्त विद्यमाने उभारल्या जाणाऱ्या 'द सोलिटेअर' या प्रीमियम रेसिडेंशियल प्रोजेक्टचे अधिकृत लाँच रविवारी (ता. ८ डिसेंबर) रोजी होणार आहे. ६.५ एकर क्षेत्रफळात पसरलेल्या या प्रोजेक्टमध्ये ४००+ हाय-एंड निवासी गृह प्रकल्प आणि एक हाय स्ट्रीट प्लाझा असणार आहे.

यापूर्वी 'द सोलिटेअर' प्रोजेक्टचे प्री-लाँच झाले होते. या प्री-लाँचमध्ये १००० हून अधिक लोकांनी उत्साह दाखवला होता. हा प्रोजेक्ट पैठण रोडवर (नाथ सीड्सच्या समोर) आणि ३० मीटर रस्त्याला लागून आहे. हा परिसर ऑरिक सिटी, वाळूज आणि पैठण एमआयडीसी या औद्योगिक हब्सच्या जवळ असल्याने उत्तम कनेक्टिव्हिटी आहे. तसेच, मुंबई-नागपूर महामार्ग असलेल्या हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या जवळ असल्यामुळे शहरात प्रवेश करणे आणि बाहेर पडणे सोपे आहे. हिरवळीच्या परिसरात असलेला हा प्रोजेक्ट शांत आणि सुखकर जीवनशैली अनुभवण्यास भाग पाडतो.

'द सोलिटेअर' मध्ये सर्व वयोगटातील रहिवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ५८ जागतिक स्तरावरील सुविधा उपलब्ध असतील. यामध्ये पूल डेक, जकुझी, किशोरवर्गासाठी प्ले लाऊंज, हर्ब गार्डन, पेट पार्क, आउटडोर थिएटर आणि असंख्य सुविधा समाविष्ट आहेत.

नाथ ग्रुपचे श्री. नंदकिशोर कागलीवाल, श्री. सतीश कागलीवाल आणि श्री. आकाश कागलीवाल यांनी सांगितले की, भारताच्या कृषी-औद्योगिक क्षेत्रातील अग्रणी संस्था म्हणून, नाथ ग्रुप नेहमीच नवकल्पना आणि उत्कृष्टतेला आपल्या प्रयत्नांचा पाया मानले आहे. संशोधन-आधारित बियाणे, पर्यावरणपूरक कागद उत्पादन किंवा विशेष रसायने या क्षेत्रात प्रगती साधण्यापासून ते शाश्वत विकासासाठी प्रयत्न करण्यापर्यंत, आमचे ध्येय मूल्य निर्माण करणे आणि शाश्वत विकास साध्य करणे आहे. 'द सोलिटेअर' हा आमच्या या तत्त्वज्ञानाचाच एक भाग आहे. आम्ही एक अशा जीवनशैलीची कल्पना केली आहे जी सुंदर डिझाइन, उत्कृष्ट कारागिरी आणि आधुनिक सुविधांचे संगम आहे. छत्रपती संभाजीनगरमधील नाथ ग्रुप कॅम्पसच्या समोर असलेल्या पैठण रोडवरील या प्रोजेक्टमध्ये आम्ही उत्कृष्टतेची नवी व्याख्या निर्माण करत आहोत. सारा बिल्डर्सचे श्री. सीताराम अग्रवाल, श्री. रुपेश अग्रवाल आणि श्री. निलेश अग्रवाल यांनी सांगितले, विश्वसनीय वास्तु क्षेत्रातील कंपनी म्हणून, सारा बिल्डर्स नेहमीच लोकांच्या जीवनशैलीला उंचावणारी जागा तयार करण्यावर विश्वास ठेवतो. पुणे आणि छत्रपती संभाजीनगरामध्ये २६ वर्षांहून अधिक काळ आणि १०,००० हून अधिक घरांचे यशस्वी वितरण करून, आम्हाला छत्रपती संभाजीनगरच्या रिअल इस्टेट बाजारात एक कमतरता भासली. ही उणीव म्हणजे - आधुनिक शहरी जीवनाच्या आकांक्षांशी जुळणारी लक्झरी घरं. ही उणीव भरून काढण्यासाठी आम्ही 'द सोलिटेअर' हा प्रोजेक्ट सुरू केला. दशकांच्या अनुभवाच्या आधारे, विशेषतः पुण्यातील आमच्या ५० एकर टाउनशिपच्या अनुभवाने, आम्ही 'द सोलिटेअर' ची रचना केली आहे. ज्यामुळे आरामदायी आणि सुंदर जीवनशैली उपलब्ध होईल. सारा बिल्डर्समध्ये आमचे ध्येय आहे उत्कृष्टता, नवकल्पना आणि वेळेत डिलिव्हरी, ज्यामुळे प्रत्येक प्रोजेक्टमध्ये ग्राहक समाधान सुनिश्चित होते. 'द सोलिटेअर'च्या माध्यमातून आम्ही लक्झरी जीवनशैलीच्या नवीन आदर्श स्थापित करत आहोत.

छत्रपती संभाजीनगरचे सीएसएन प्रादेशिक विकास प्राधिकरणचे श्री. उल्हास गवळी म्हणाले, मी 'द सोलिटेअर' या प्रकल्पाचे बारकाईने निरीक्षण केले आहे आणि हा प्रकल्प एक खरा दमदार प्रकल्प बनत असल्याचे पाहून मला खूप अभिमान आणि आनंद होतो. अशा प्रकारचे उल्लेखनीय परिवर्तन मी बघितले नव्हते. नाथ ग्रुप आणि सारा ग्रुपची दृष्टी आणि समर्पण यांचे हे शिखर आहे. त्यांचे प्रयत्न उत्कृष्टता आणि नवकल्पनेच्या त्यांच्या वचनबद्धतेचे साक्षीदार आहेत.

# गंगापूर वकील संघाच्यावतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन.

## चाळीस रक्तदात्यांनी केले रक्तदान

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.६ डिसेंबर : वकील संघ गंगापूरच्या वतीने शुक्रवार दिनांक ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चाळीस रक्तदात्यांनी रक्तदान केले.



यावेळी गंगापूर न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश एस एस अग्रवाल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी गंगापूर न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एस. एस. अग्रवाल मॅडम, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश ए.बी. इंगोले, तिसरे सह दिवाणी न्यायाधीश एस. वाय. वाघचौरे वकील संघाचे अध्यक्ष के. आर. क-हाळे, उपाध्यक्ष ए.पी.ठाकूर सचिव विठ्ठल काळे वकील संघाचे सदस्य बि.आर. राजपूत वाय.एन.जाधव, व्ही. एस. मनोरकर, एस. के. नरोडे,ए.बी. कुलकर्णी ,जी.बी. चव्हाण, आर.बी. दारुंटे बी. एस. शिंदे,, एस.के. लांडे,पी.डी. देशपांडे, ए.एस. इंगळे,डि.ई. पानकडे, डि.के. तारू, आर. जी. बोठे एस.बी. शेख, डी. व्ही. साबणे, एस.एन. साबणे,महेश गडदे, एस. पी. लबडे एम. पी. दारुंटे, पि.आर. बरडे, ए. आर.बरडे , टि.व्ही. कोल्हे,अविनाश चव्हाण, सुनिल गायकवाड अमोल रासकर,मनोज पवार,आकाश सिरसाठ ,रोहण भालेराव, असिफ शहा, सचिन आंबेकर, एस.आर. शिराळे, टी.व्ही.कोल्हे एकनाथ कानडे संजय भोकरे, महेंद्र राऊत अमित बर्वे व्हि.जे. कसाने, शेखर एस कसाने आफताब शेख के बी मस्के बिग.के म्हस्के विजय खांडेकर शंतनु धुमाळ ई एक कानडे एस के दळवी देवा गायकवाड शिवप्रसाद बन्सोड आदींसह सहाय्यक अधीक्षक पोतदार तसेच दत्ताजी भाले रक्तपेढीचे डॉक्टर दिलीप डांगे आप्पासाहेब सोमासे अजिनाथ बडक राधा गवारे आरती बामणे अमोल घारे सुनीता हिरे शीला कोळे उपस्थित होते.

---

संचिका क्रं.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ ज.मू.नोंद/सी.आर /२०२४
दिनांक : ०६/१२/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती कदीर नसिर शेख रा. जिकठाण ता. गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय रा. जिकठाण ता. गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे कदीर नसिर शेख यांचा जन्म दिनांक ०४/१२/१९८५ रोजी मौजे जिकठाण ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय जिकठाण ता. गंगापूर. येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०६/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- ०६/१२/२०२४

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-६९९ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक ३०/०९/२०२४**

अर्जदार : राजू बाबू राठोड रा. मुंडवाडी तांडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय मुंडवाडी तांडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक १२-०५-२००९ रोजी मुंडवाडी तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक १२-०५-२००९ रोजी मुंडवाडी तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक १२-०५-२००९ रोजी मुंडवाडी तांडा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०५-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १२-०५-२००९ रोजी मुंडवाडी तांडा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ३०/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार श्री. विकास धनराज जाधव, वय ३९ वर्षे रा. लिहातांडा, ता. जामनेर, जिल्हा जळगाव ह. मु. ज्ञानेश्वरी प्रसाद इभारत यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून मी ॲड. शुभम अशोक आगे, सोयगाव, तालुका सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजीनगर खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देतो ते खालीलप्रमाणे.

माझे पक्षकार यांची मौजे जंगलातांडा, तालुका सोयगाव येथे गट क्रं. ४३ मध्ये २ हे. ३१ आर वडिलोपार्जित शेतजमीन आहे. सदरची शेतजमीन हि माझ्या पक्षकाराचे वडील नामे धनराज कवरू जाधव, रा. लिहातांडा तालुका जामनेर यांच्या नावे आहे. सदर शेतजमिनीच्या चतुर्सिमा या खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस : महादू बारकू यांची शेतजमीन
पश्चिमेस : गोतमारे यांची शेतजमीन
उत्तेस : अर्जुन मांगू शेतजमीन
दक्षिणेस : गोतमारे यांची शेतजमीन

उपरोक्त वर्णनित मिळकतीत माझ्या पक्षकाराचा अविभाज्य अधिकार व हिस्सा आहे, त्याकरिता माझे पक्षकार मा. दिवाणी न्यायालयात दाद मागणार आहेत. परंतु माझ्या पक्षाराचे वडील व त्यांचे ईतर कुटुंबीय हे माझ्या पक्षकाराचा जमिनीतील हक्क डावलण्यासाठी माझ्या पक्षकाराची पूर्व संमती न घेता हस्तांतरित करण्याचे ठरविले आहे.

तरी सदर प्रगटनाद्वारे जनतेस कळविण्यात येते की, नमूद शेतजमिनीबाबत कुठल्याही प्रकरचा खरेदी-विक्री, गहाण, तारण किव्हा ईतर कुठलाही व्यवहार करण्यात येवू नये, अन्यथा आपणास न्यायलयीन कार्यवाहीस सामोरे जावे लागेल याची नोंद असू द्यावी.

दिनांक :- ०६/१२/२०२४
स्थळ :- सोयगाव

विकास धनराज जाधव — ॲड. शुभम अशोक आगे

---

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर**

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०६/२०२४

१/- नवललाल कन्हीयालाल जैस्वाल, वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. निमखेडी, ता, सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/- बाबूलाल कन्हीयालाल जैस्वाल, वय ३० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- राजू कन्हीयालाल जैस्वाल, वय ३५ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध
कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत कन्हीयालाल गजाधर जैस्वाल यांचा दि. २२.०५.२०१३ रोजी निमखेडी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर मयत असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ एकमेव हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी मयत कन्हीयालाल गजाधर जैस्वाल यांचे वारस असुन त्यांना मयत कन्हीयालाल गजाधर जैस्वाल यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. ६/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता.१६/१/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

---

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर**

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९१/२०२४

१/- शाकेराबेगम इस्तेखार अहमेद, वय ४० वर्ष, धंदा घरकाम, रा. फर्दापूर, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- शफी अहमद खाजा अहमद कादरी, वय ३८ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- कादरी साजेदा बेगम खाजा अहमद कादरी, वय ३६ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ४/-मुनवर अहमद खाजा अहमद कादरी, वय ३४ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध
कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सईदाबी खाज्या अहमद कादरी यांचा दि. ०८.०८.१९८८ रोजी मौजे फर्दापूर, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर मयत असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ एकमेव हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी मयत सईदाबी खाज्या अहमद कादरी यांचे वारस असुन त्यांना मयत सईदाबी खाज्या अहमद कादरी यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि.६/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. २/१/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

---

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर**

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०९/२०२४

१/- अहमदखा उर्फ खान सरदारखा उर्फ खान, वय ६२ वर्ष, धंदा नौकरी, रा. उंडणगाव, ता. सिल्लोड, जिल्हा, छत्रपती संभाजीनगर. २/- जयदाबी हबीब शेख, वय ६५ वर्ष, धंदा. घरकाम, रा. फर्दापूर, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर,

विरुद्ध
कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सरदारखा वजीरखा खान यांचा दि. २०/०८/१९७४. रोजी उंडणगाव, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर मयत झाले तसेच हसणूरबी सरदारखा खान यांचा दिनांक २४/०२/१९८३ यांचा मौजे फर्दापूर, ता. सोयगाव येथे मृत्यू झालेला आहे असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र.१ व २ एकमेव हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ व २ यांनी मयत सरदारखा वजीरखा खान व हसणूरबी सरदारखा खान यांचे वारस असुन त्यांना मयत सरदारखा वजीरखा खान व हसणूरबी सरदारखा खान यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि.६/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता.११/१२/२०२४

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

पु.ता.२०/०१/२०२५
सिव्हील एम.ए.नं. ५४७/२०२४

अर्जदार : १. शोभा अशोकलाल जैस्वाल वय ५७ वर्ष धंदा. शेती २. सुशील अशोकलाल जैस्वाल वय. ३९ वर्ष धंदा. शेती १ त २ रा. घर नं. १-१९-३०, जुना बजार, इरम मेडिकल जवळ, बुड्डी लाईन छ. संभाजीनगर ता.जि. छ.संभाजीनगर ३. संतोष अशोकलाल जैस्वाल वय. ३५ वर्ष धंदा. शेती रा. पेंढापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४. भारती रितेश जैसवाल वय ३७ वर्ष धंदा. शेती रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.छ.संभाजीनगर ५. पूजा रिंकेश जैसवाल वय.२८ वर्ष धंदा. शेती रा. प्लॉट नं. ७५२, रिंग रोड, साई मंदिरासमोर, खुशी नगर, जरीपटका, नागपूर ता.जि. नागपूर.

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, अर्जदार नं. १ यांचे पती व २ ते ५ यांचे वडिल नामे अशोकलाल गंगुलाल जैस्वाल हे दि. १४/१२/२०२० रोजी मौजे पेंडापूर ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत अशोकलाल गंगुलाल जैस्वाल यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत अशोकलाल गंगुलाल जैस्वाल यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत अशोकलाल गंगुलाल जैस्वाल यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्द्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत अशोकलाल गंगुलाल जैस्वाल यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्द्दी नंतर येणार अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहा. अधिक्षक
दिवाणी फौजदारी न्यायालय गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : ०३/०१/२०२५
दि.कि.अर्ज क्र. ३५८/२०२४

अर्जदार : महादु पिता पुंजाजी सुसूंद्रे, वयः ८२ वर्षे, धंदाः शेती, रा. दिगांव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदाराचे वडील नामे पुंजाजी पाटीलबा सुसूंद्रे हे दि. ०१/०६/१९७८ रोजी मौजे दिगांव, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत पूंजाजी पाटीलबा सुसूंद्रे यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही, अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारानी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०६/१२/२०२४

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : ०७/०१/२०२५
दि.कि.अर्ज क्र. ३६१/२०२४
ग.

अर्जदार : चंदु शहा कालु शहा, वयः ५३ वर्षे, धंदाः शेती, रा. करंजखेडा (जा), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार :
महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज :
वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदाराचे वडील नामे कालु शहा मदन शहा हे दि. ०२/०२/१९७७ रोजी मौजे करंजखेडा (जा), ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत कालु शहा मदन शहा यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारानी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०६/१२/२०२४

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : ०४/०१/२०२५
दि.कि.अर्ज क्र. ३५७/२०२४

अर्जदार : महेबुब अमिर शहा, वयः ७७ वर्षे, धंदाः शेती, रा. करंजखेडा (जा), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदाराचे वडील नामे अमिर शा मदन शा हे दि. ०२/११/१९८२ रोजी मौजे करंजखेडा (जा), ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत अमिर शा मदन शा यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारानी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुटलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०६/१२/२०२४

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.व्ही.एन. काटकर मॅडम) क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. ३८०/२०२४

अर्जदार : १. विमलबाई भ्र. रघुनाथ जाधव वय ७९ धंदा घरकाम रा. केसापुर ता. कन्नड जि.- औरंगाबाद २. सुर्यभान पि.भिमराव बोडखे वय-७८ धंदा शेती रा. अंतापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. लक्ष्मीबाई भ्र. दामोधर आघार्डे वय ७६ धंदा शेती रा. घाटशेंद्रा ता. - कन्नड जि. औरंगाबाद ४. जनाबाई भ्र.यादवराव घुमरे वय-७४ धंदा- घरकाम रा.-बाबरा ता. फुलंब्री जि. औरंगाबाद ५. कमलबाई भ्र. रामहरी पवार वय-६४ धंदा- घरकाम रा. चापानेर ता. कन्नड जि. औरंगाबाद ६. विजय पि. भिमराव बोडखे वय-५९ धंदा- शेती रा. अंतापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ६ यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ ते ६ यांचे वडील मयत नामे भिमराव पि. रामराव बोडखे यांचा मृत्यु दि. ०३/०६/२०१२ रोजी मौजे अंतापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ ते ६ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत भिमराव पि. रामराव बोडखे यांचे शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे वारस कारवाई करण्यासाठी हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ ते ६ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयत भिमराव पि. रामराव बोडखे यांचे शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे मयत भिमराव पि. रामराव बोडखे यांचे वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गाहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. ०६/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे. व्ही. एन. काटकर मॅडम) क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. ३७७/२०२४

अर्जदार : १. श्रीमती. सरूबाई भ्र.तेजराव मनगटे वय-६० धंदा घरकाम रा. लोहगांव ता.- कन्नड जि. औरंगाबाद २. श्री. प्रमोद पि.तेजराव मनगटे वय-४० धंदा- शेती रा. लोहगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. श्री. विनोद पि.तेजराव मनगटे वय ३७ धंदा- शेती रा. लोहगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. श्री. मनोज पि.तेजराव मनगटे वय ३४ धंदा- शेती रा. लोहगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः -

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील मयत नामे तेजराव पि. पुंजाजी मनगटे यांचा मृत्यु दि. २४/०७/२०२४ रोजी मौजे लोहगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत तेजराव पि. पुंजाजी मनगटे यांचे शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे वारस कारवाई करण्यासाठी हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ ते ४ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयत तेजराव पि. पुंजाजी मनगटे यांचे शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे मयत तेजराव पि. पुंजाजी मनगटे यांचे वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गाहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. ०६/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए.आय. आवटी मॅडम, सह-दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड, यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ३२८/२०२४पुढील तारीख : ०६/१२/२०२४

अर्जदार : १-अलकाबाई भ्र. प्रकाश बोर्डे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कविटखेडा, ता. कन्नड, ह.मु. खडकी, ता. कोपरगांव, जिल्हा अहमदनगर २-संतोष पिता प्रकाश बोर्डे, वय ३६ वर्षे, धंदा मजुरी, रा. कविटखेडा, ता. कन्नड, ह.मु. खडकी, ता. कोपरगांव, जिल्हा अहमदनगर ३-यशोदा भ्र. लहाणु गायकवाड, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुरेगांव रस्ता, भुलेगांव ता. येवला, जि. नाशिक. ४-किरण पिता प्रकाश बोर्डे, वय ३१ वर्षे, धंदा मजुरी, रा. कविटखेडा, ता. कन्नड, ह.मु. खडकी, ता. कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

- विरुध्द -

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर जिल्हा छ. संभाजीनगर

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. Legal heirship Certificate

ज्या अर्थी, अर्जदार यांचे वकील ॲड. एस.ई. धनेधर यांचे मार्फत या न्यायालयात अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केला आहे. अर्जदार क्रमांक १ चे पती व अर्जदार क्रमांक २ ते ४ यांचे वडील प्रकाश दादा बोर्डे हे दिनांक ११.६.२०२४ रोजी मौजे खडकी, कोपरगांव येथे मयत झालेले आहे. सोबत नगर परिषद कार्यालय कोपरगांव यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अर्जदार हे मुळचे कविटखेडा ता. कन्नड येथील रहिवाशी असून कामानिमीत्त खडकी कोपरगांव येथे राहत आहे, व मयत प्रकाश दादा बोर्डे हे खडकी कोपरगांव येथेच मयत झालेले असल्याने नगर परिषद कार्यालय कोपरगांव यांचे मृत्यु प्रमाण दाखल केलेले आहे. मयतांच्या नावाने मिळणारे शासकीय व निमशासकीय फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे व ईतरही कायदेशीर कामासाठी सदरील वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करण्यास दिनांक १३.१०.२०२४ रोजी कारण घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे.

त्या अर्थी, सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी केलेला आहे, सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आक्षेप सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २२.११.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक २२.११.२०२४
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर कन्नड

आदेशावरून

लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर कन्नड

## एम ओ सी कॅन्सर केअर आणि रिसर्च सेंटरची कॅन्सर उपचार क्षेत्रात प्रगतीशील वाटचाल

छत्रपती संभाजीनगर - एम ओ सी कॅन्सर केअरने कॅन्सर उपचाराच्या क्षेत्रात ऐतिहासिक यश मिळवले आहे. रिलॅप्स्ड रिफॅक्टरी डिफ्यूज लार्ज बी-सेल लिम्फोमा या रक्ताच्या कॅन्सरच्या उपचारासाठी कायमेरिक अँटीजेन रिसेप्टर टी-सेल थेरपी घेतलेल्या पहिल्या रुग्णाला यशस्वी उपचारांती डिस्चार्ज करण्यात आले. या यशानंतर एम ओ सी चे नाव कायमेरिक अँटीजेन रिसेप्टर टी-सेल सारख्या अत्याधुनिक कॅन्सर उपचार देणार्‍या मोजक्या कॅन्सर संस्थांच्या यादीत सामील झाले आहे. रिलॅप्स्ड आणि रिफॅक्टरी लिम्फोमाशी झुंज देणारे ठाणे येथील ६० वर्षीय रहिवासी ज्यांनी यापूर्वी घेतलेल्या पारंपरिक उपचार, इम्युनोथेरपी व इतर उपचार पद्धती अपयशी ठरल्या होत्या त्यांना ५ नोव्हेंबर २०२४ रोजी कायमेरिक अँटीजेन रिसेप्टर टी-सेल थेरपीद्वारे उपचार देण्यात आले. उपचारानंतर कोणत्याही गुंतागुंतीशिवाय रुग्णाला २४ नोव्हेंबर २०२४ रोजी डिस्चार्ज देण्यात आला.

## बेस्ट ला २५० इलेक्ट्रिक बसेस प्रदान करणार

मुंबई: इलेक्ट्रिक बस क्षेत्रातील आघाडीची कंपनी पीएमआई इलेक्ट्रो मोबिलिटीने आज जाहीर केले की त्यांनी बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट (बीईएसटी- बेस्ट) यांच्यासोबत २५०, १२-मीटर लांब इलेक्ट्रिक बसेस पुरवण्यासाठी करार केला आहे. हा करार बेस्टचे महाप्रबंधक श्री. अनिल डिग्गीकर, आयएएस आणि पीएमआयचे संचालक श्री. दीपेश द्विवेदी यांनी स्वाक्षरी करून केला आहे. कंपनी या बसेस २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीपर्यंत टप्प्याटप्प्याने वितरित करेल. पीएमआई इलेक्ट्रो मोबिलिटी २५० सिंगल-डेकर, वातानुकूलित इलेक्ट्रिक बसेस पुरवणार आहे. या बसेस अत्याधुनिक तंत्रज्ञान व विशेष वैशिष्ट्यांनी सज्ज असतील, ज्या प्रवाशांना आरामदायी, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा अनुभव देतील. या बसेस मुंबई आणि परिसरातील उपनगरांमध्ये विविध मार्गांवर चालवल्या जातील आणि शहराच्या कनेक्टिव्हिटीमध्ये सुधारणा करतील. तसेच, या बसेस डिझेलचा वापर कमी करून आणि कार्बन उत्सर्जन घटवून पर्यावरण संरक्षणात योगदान देतील.

## महिला कबड्डी लीग २०२५: पश्चिम विभागीय निवड चाचणी पुण्यात

पुणे - महिला कबड्डी लीग २०२५ ने आज पुणे येथे आयोजित केलेल्या दुसऱ्या प्रादेशिक निवड चाचणीसह एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले. ही फेरी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेशसह भारताच्या पश्चिम भागातील प्रतिभा शोधण्यावर केंद्रित आहे. या चाचण्यांमध्ये महिलांच्या कबड्डीला चालना देण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा म्हणून संपूर्ण प्रदेशातील खेळाडूंचा उत्साही सहभाग दिसून आला.पश्चिम प्रदेशात जवळपास ८०००-१०,००० महिला कबड्डीपटू आहेत, ज्यापैकी अनेकांना त्यांचा खेळ पुढील स्तरावर नेण्यासाठी महिला कबड्डी लीग उपक्रमातून प्रेरणा मिळेल. यापैकी अंदाजे ६००-८०० खेळाडूंनी आधीच राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा केली आहे, ज्यांनी चाचण्यांसाठी लक्षित कोर गट तयार केला आहे. पुण्यात, महिला कबड्डी लीग ला सुमारे ५०० नोंदणी प्राप्त झाल्या, ज्यामध्ये ३५० खेळाडू सक्रियपणे चाचण्यांना उपस्थित होते. या प्रतिभावान पूलमधून, लीगच्या निवड प्रक्रियेच्या पुढील टप्प्यात जाण्यासाठी १००-१५० खेळाडू निवडले जातील. महिला कबड्डी लीग चे लीग सल्लागार डॉ. भूपेंद्र सिंग यांनी लीगच्या परिवर्तनात्मक दृष्टीवर प्रकाश टाकला:महिला कबड्डी लीग ही केवळ स्पर्धा निर्माण करण्यापुरती नाही; ती एक वारसा निर्माण करण्याबद्दल आहे. या चाचण्या भारताच्या तळागाळातील प्रतिभेतील अतुलनीय क्षमता प्रतिबिंबित करतात आणि आम्हाला असे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आनंद होत आहे जिथे या खेळाडूंना चमक दाखवता येईल आणि असंख्य इतरांना ते स्वीकारण्यासाठी प्रेरणा मिळेल.मीडियाला संबोधित करताना, महिला कबड्डी लीग चे मीडिया प्रवक्ते डॉ. जितेंद्र कुमार यांनी त्यांचा उत्साह शेअर केला:

# तळं उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती खानापूर येथील नागरिकांची झाली..!

तभा वृत्तसेवा
देगलूर,दि. ०५ डिसेंबर

तालुक्यातील खानापूर येथील तळं नावालाच..? खानापूर हा तळ्याचा गाव असून देखील येथील नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी कोसो दूर पायपीट करावी लागते. खानापूर गावामध्ये पिण्याचे पाण्याची टंचाई जाणवत आहे. तळं उशाला आणि कोरड घशाला अशी एक म्हण आहे. या म्हणीचा प्रत्यय येथील गावातील महिलांना दरवर्षी येतो. पाण्यासाठी डोंगरदऱ्या कड्या-कपाऱ्यांवर अक्षरशः पाण्याचा शोध घ्यावा लागतो. तसेच अनेक महिला तर दूरवरील हातपंपा पर्यंत जाऊन नंतर त्या हातपंपावर पाणी काढताना दिसून आल्या आहेत. पाणीटंचाईने किती तळ गाठला आहे. हे भीषण वास्तव येथील गावातील लोकांनी समोर आणले आहे. उन्हाळा दूरच राहिला सध्या हिवाळा सुरू होताच इथल्या गावांमध्ये पाण्यासाठी वणवण फिरण्याचा अनेक महीला दिसतात. हंडाभर पाण्यासाठी त्यांचं जीवावर उधार होण अंगावर येत आहे. पाण्याने हातपंपाचा तळ गाठलाय तशा महिलाही जीव मुठीत धरून विहीरीच्या तळाला गेले आहेत. तांब्याने घोट-घोट पाणी हंड्यात भरून तो हंडा डोक्यावर घेण्याची ही कसरत डोळ्यात पाणी आणणारी आहे. आजची तहान भागवण्याची ही फरफट संपली तरी उद्याच काय हा प्रश्न आहे. पण गावात नळ कनक्शन असून देखील नळाला पाणी केव्हा येणार, हा प्रश्न कोण सोडवणार..?

ग्रामपंचायतचे डोळे केव्हा उघडणार..? खानापूर परिसरात हाकेच्या अंतरावर तळ आहे. महिलांना घोटभर पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. त्यातही दुर्दैवी म्हणजे सरकारच्या जलजीवन योजनेचा गाजावाजा असताना हे पाणीसंकट कोसळले आहे. देगलूर तालुक्यातील ही माळरानावर राहणारी माणसे कीती दिवस या योजनेपासून वंचित राहणार..? याचा उत्तर कोणी देईल का..? आजचा हा जीव मुठीत धरून चाललेला पाणीखेळ उद्या जीवावर बेतल्यावर सरकार यांच्याकडे पाहणार काय? जे दिसतय ते इतके भयान वास्तव असताना सरकार कशाची वाट पाहत आहे. उद्या यात काही दुर्दैवी घडू नये ही काळजी असेल तर सरकारने लवकर डोळे उघडावेत अशी मागणी करत आहेत. पाण्यासाठी पायपीट होऊ नये म्हणून गावामध्ये पाण्याचा प्रश्न मिटावा, यासाठी शासनाने लाखो रुपये खर्च करून पिण्याच पाण्याची टाकी बांधली. मात्र या पाण्याच्या टाकीला देखील गळ्ळ पाणी येत असल्याने, ग्रामस्थांकडून पिण्याचे पाणी आणण्यासाठी दुसऱ्या वार्डामधून पायपीट महिलांना करावी लागत आहे. निवडणुकीपुरते लोकप्रतिनिधी आश्वासन देतात, मात्र पुढील पाच वर्ष ते या गावांकडे फिरकत देखील नाही, असे ग्रामस्थ सांगतात.

नळ पाणीपुरवठा योजनेची मागणी ग्रामिण भागात नागरिकांना सुरक्षित आणि पिण्यायोग्य पाणी पुरवण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. यात नळ पाणी पुरवठा, साधी तळ्याद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध करणे, विंधन हातपंपाद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध करणे अशा योजना राबविल्या जात आहे. या योजना आमच्या गावात राबवाव्या, अशी मागणी येथील महिलांनी केली आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात नळाची मागणी होत आहे.

धरण उशाला आणि कोरड घशाला देगलूर तालुक्यातील खानापूर येथील तळ्यातील पाणी पुरवठा एकलारा, मनसकरगा, सुगाव, इब्राहिमपूर, अल्लापुर असे अनेक गावात होत असते तर मग खानापूर गावामध्ये का होऊ शकत नाही. खानापूर तळ्याचे असा नावलौकिक असलेल्या तळ्याचे पाणी गरज भासल्यास जवळच असलेल्या अनेक गावात पाण्याचा विसर्ग पुरवठा केला जातो. पण खानापूर गावात पंधरा दिवसाला एक वेळेस नळाला पाणी येत असते यावर ग्रामपंचायत चा अंकुश नाही असे स्पष्ट दिसून येत आहे. तर येथील पाणीपुरवठा करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना अनेक दिवसापासून मानधन मिळत नाही, त्यामुळे हे सर्व ग्रामपंचायत ऑपरेटर खानापूर गावासाठी पाणीपुरवठा वेळेवर करत नाहीत असे तेथील ग्रामस्थांकडून बोलले जात आहे. त्यामुळे तेथील गावांतील दलित वस्तीतील नागरिकांना नाहक असा त्रास होत आहे. वस्तीवरच्या नागरिकांना मात्र पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती येथील नागरिकांची झाली आहे. म्हणूनच अशी परिस्थिती येथील खानापूर येथील नागरिकांची झाली आहे. याचं ग्रामस्थांना मात्र पाण्यासाठी हंडा घेऊन वणवण भटकावे लागते ही शोकांतिका आहे. असे येथील ग्रामस्थ कडून बोलले जात आहे. तरी संबंधित अधिकाऱ्यांनी काय निर्णय घेणार याकडे सर्व ग्रामस्थांकडून चर्चेला उधाण आला आहे.

## सरदार वल्लभभाई पटेल शाळेची विद्यार्थिनी रागिनी चौदंते शालेय कराटे स्पर्धेमध्ये राज्यात तृतीय

तभा वृत्तसेवा
मुदखेड,दि. ०६ डिसेंबर

मुदखेड शहरातील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूलची विद्यार्थिनी कु. रागिनी राजरत्न चौदंते राज्यस्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धा सन २०२४- २५ या नुकत्याच धुळे येथे पार पडल्या आहेत ४२ किलो खालील वजन गटात मुदखेड येथील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूलची विद्यार्थिनी रागिणी चौदंते हिने राज्यस्तरावर तृतीय क्रमांक पटकाविला आहे तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष



केशव रामराव कदम, व उपाध्यक्ष गोविंद प्रसाद कालानी, संचालक नारायण गैणवाड, पापालाल शर्मा, माधवराव पचलिंग, या सर्वांनी विद्यार्थिनीचे कौतुक व अभिनंदन केले.

मार्गदर्शक म्हणून माधव गाडेगावकर यांनी मोलाची भूमिका पार पाडली तसेच रागिनी राजरत्न चौदंते तिचा व तिच्या पालकांचा सत्कार प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सुनीता लाटकर यांनी शाल व पुष्पहार देऊन सत्कार केला.

तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे यांनी मार्गदर्शक माधव गाडेगावकर सर यांचा सत्कार केला.माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे यांनी सर्वांच्या उल्लेखनीय कामाबद्दल अभिनंदन केले. शाळेचे सहशिक्षक बायस सर,नहानाळे सर,पोगरे सर, पवार सर, धनगरे सर, गुजरवाड, दुडकीकर, चाळणेवाड यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने अभिवादन



**नांदेड,दि. ०६ डिसेंबर :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने आज शुक्रवार दि. ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक रविंद्र संगनवार, निमंत्रक ड. प्रदीप नागापूरकर, पत्रकार परिषदेचे माजी संघटक प्रकाश कांबळे, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव राम तरटे, प्रसिध्दी प्रमुख माधव गोधणे, लक्ष्मण भवरे,महानगर सरचिटणीस सुरेश काशिदे, उपाध्यक्ष प्रल्हाद लोहेकर, प्रशांत गवळे आदिंची उपस्थिती होती.

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त ब्लॅकेट व फळे वाटप



**बाऱ्हाळी,दि. ०६ डिसेंबर :** समाजातील प्रत्येक घटकाने दिव्यांग व्यक्तीच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन संधी निकेतन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रमेश वडगावकर यांनी उपस्थितांना केले. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा निवासी दिव्यांग विद्यालयात आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश वडगावकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ.सुप्रियाताई वडगावकर, मू.अ.सुभाषराव जाधव, मू.अ.गादरे उपस्थित होते. यावेळी उपस्थित दिव्यांग विद्यार्थ्यांना ब्लॅकेट व फळे वाटप करण्यात आले. यावेळी श्रीमती नरवाडे, अविनाश नळगिरे, बाबुराव पांचाळ, व्यंकट रेणगूंटवार, पठाण, देवानंद महाजन संजय बिरादार यांच्या सह विद्यार्थी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी व इतर दोघाची निर्दोष मुक्तता



**उमरी,दि. ०६ डिसेंबर :** उमरी कोर्टातून माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी व इतरासह निर्दोष मुक्तता मिळाली आहे पण कुलकर्णी यांनी कोर्टीचा निर्णय मान्य करून हा विजय माझ्या विरुद्ध रचवलेल्या षडयंत्राचा पराभव झाला असून सत्याची जीत झाली असल्याचे दै तरुण भारतशी बोलतांना प्रतिक्रिया दिली आहे . उमरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे प्रथमवर्ग न्यायाधिकारी ए. बी. रेडेकर यांनी दिनांक ५ डिसेंबर रोजी खुल्या न्यायालयात आर. सी. सी. नं. १२ / २०१८ भा. दं. वि. कलम ३५४(अ), ३४१, २९४, ३२४, ३२३ , ५०६ , ३४ गुन्ह्यातून उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, विठ्ठल जाधव व सोपान गायकवाड यांची निर्दोष मुक्तता केली. या बाबद थोडक्यात माहिती अशी की माझी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी विरुद्ध व इतरावर दिनांक १७ मार्च २०१७ रोजी श्रीमती भारतबाई जाधव यां उमरी पोलिस स्टेशनला गु. र. नं. ५२/ २०१७ दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणातील बालाजी गायकवाड हे मयत आहेत. राजकिय व्देष भावनेतून संजय कुलकर्णी यांच्या विरोधकांनी हा खोटा गुन्हा दाखल करावयास लावला होता. ह्या प्रकरणातील फिर्यादी व साक्षीदार तपासणी नंतर न्यायालयाने उपरोक्त व्यक्तींची निर्दोष सुटका केली आहे. ह्यापूर्वी देखिल संजय कुलकर्णी ह्यांचे विरोधात खंडणीचा आणि घराचे बांधकाम अनाधिकृत करून त्यामध्ये बेकायदेशीर शाळा चालविल्या असल्यासंबंधी खोटे गुन्हे दाखल करण्यात आले होते परंतू त्यासर्व प्रकरणातून संजय कुलकर्णी हे निर्दोष निघाले होते. ह्यावर प्रतिक्रिया देतांना संजय कुलकर्णी म्हणाले कि, माझा न्यायप्रणालिवर विश्वास असून तो विश्वास सार्थकी ठरला असल्याचे नमुद केले आहे. सदरील प्रकरणात संजय कुलकर्णी यांचेवतीने विधिज्ञ ड मनोज मेहता यांनी तर सरकार तर्फे सरकारी वकिल शिंदे यांनी काम पाहिले आहे.

## किनवट तालूक्यात खुले आम रेतीचे उत्खनन

तभा वृत्तसेवा
किनवट,दि. ०६ डिसेंबर

बोधडी बु.च्या नाल्यातून खुल्लेआम रेतीचे उत्खनन करून चोरट्या मार्गाने वाहतूक करीत असतांना महसूल पथकाचा कानोसा लागताच भरधाव वेगाने ट्रॅक्टर चालकाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतू महसूल खात्यातील धाडशी रणरागीने प्रियंका डुकरेंनी पाठलाग करून बोधडी बु.येथिल शासकीय गोदामापर्यंत ... तसेच ... शासीणगरात पोहोचलेले ट्रॅक्टर अखेर पकडले. या धाडशी कारवाईचे तलाठी डुकरेबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात आले. ६



डिसेंबर रोजी दुपारी बारा वाजताची घटना असून, ते पकडलेले ट्रॅक्टर तहसिल कार्यालयात लावल्याची माहिती प्रशासनाने दिली.

सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली आणि तहसिलदार शारदा चोंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ६ डिसेंबर रोजी दु. १२ वाजताचे आसपास मौजे बोधडी बु येथिल नाल्यातून अवैध रेतीचा उपसा करून वाहतूक करणारे एक ट्रॅक्टर पाठलाग करून बोधडी बु येथील शासीणगरातून पकडून किनवटच्या तहसील कार्यालयात लावण्यात आले. या मोहिमेत मंडळ अधिकारी बोधडी बू.जे.पी.गाडे, जलधाराचे मंडळ अधिकारी डि.एम.खान, तलाठी पी.बी.डुकरे, एस.एन.वोतावार आणि महसूल सेवक राजु आमले व बोधडी बु.चे पोलीस पाटील यांचा पथकात समावेश होता. महसूल पथकाची धरपकड मोहीम तेज केल्यानंतरही चोरट्या रेतीचा व्यवसाय करणाऱ्यांना त्याची मुळीच भीती दिसत नाही. पथक असेच सक्रीय राहिल्यास चोरट्या रेतीची डोकेदुखी थांबायला मदत मिळेल अशी अपेक्षि व्यक्त करण्यात आली.

## जलजिवन मिशनच्या बोगस कामाच्या चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**इस्लापूर,दि. ०६ डिसेंबर :** इस्लापूर येथील जलजिवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. अशी मागणी भाजपाचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांना दिलेल्या निवेदनात काशिनाथ शिंदे पाटील यांनी म्हटले आहे की, इस्लापूर येथे जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम सध्या येथे सुरू आहे. या कामाचे ठेकेदार हे मनमानी पद्धतीचा अवलंब करून अतिशय निकृष्ट दर्जाचे काम उरकीत आहेत. शासनाच्या अंदाज पत्रकाला बगल देऊन होत असलेल्या कामांकडे संबंधित विभागाचे अभियंता हे प्रकर्षाने जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत. पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून, गावातील रस्ते खोदून पाईपलाईन करण्यात येत आहे. फक्त अर्धा फूट खोली खोदकाम करून पाईप अंथरल्या जात आहेत. एखादी बैलगाडी ही या पाईपावरून गेली तर पाईप फुटण्याची भीती स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत. शासनाने लाखो रूपये या कामांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. तो जनतेचा निधी या कामाचे ठेकेदार निकृष्ट दर्जाचे काम उरकून शासनाचा निधी आपल्याच घश्यात घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. ठेकेदारांच्या दिमतीला प्रशासकीय यंत्रणाही आहेच. कामे निकृष्ट व थातूरमातूर होत असतांनाही. ठेकेदारास मात्र या विभागाचे अभियंता सुधारीत मूल्यांकन करून जास्तीचा निधी अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करूण ठेकेदारास देत आहेत. या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कायद्याचा बडगा उगारावा. अशी मागणी ही भाजपचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी केली असून, माहितीस्तव जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी, जिवन प्राधिकरण विभागासह संबंधित असलेल्या सर्व विभाग प्रमुखांना शिंदे यांनी निवेदनाच्या प्रती दिल्या आहेत.

## स्वारातीम विद्यापीठ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न

तभा वृत्तसेवा
नवीन नांदेड,दि. ०६ डिसेंबर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दिनांक ६ डिसेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्रात घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीराचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथ ील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र येथील महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर दरवर्षीप्रमाणे अध्यासन केंद्राच्या वतीने आयोजित



भव्य रक्तदान शिबिराचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आले. या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र आणि प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या संयुक्त विद्यमाने व नंदीग्राम ब्लड बँक या रक्तपेढीच्या सहयोगाने करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे, प्र-संचालक हुशारसिंह साबळे, अधिष्ठाता, डॉ. एम. के. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे, संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे, संचालक, डॉ. मल्लिकार्जुन करजगी, उपकुलसचिव, डॉ. रवि एन. सरोदे, मेघश्याम साळुंखे, अधिसभा सदस्य, डॉ. युवराज पाटील, अजय गायकवाड, शिवाजी चांदणे, काळबा हनवते, यांच्यासह तुकाराम भुरके, उध्दव हंबर्डे, शिवराम लुटे, जालिंदर गायकवाड, नारायण गोरे, संदीप लुटे, संजय चौदंते, विजय अचलखांब आदींची उपस्थिती होती. आयोजित शिबीरात प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. विद्यापीठाचे प्र-कुलसचिव, डॉ. डी. डी. पवार व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष काळबा हनवते यांनी रक्तदात्यांचे आभार मानले.तर या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. राजपालसिंह चिखलीकर, प्रदीप बिडला, ऋतुराज कुकरे, प्रा. सतिश वागरे, प्रकाश दीपके, स्वप्निल नरवाण, भिमराव सूर्यवंशी, संदीप एडके, विवेक भोसले, जयवर्धन गव्हे, सचिन पवळे, प्रकाश तारू, आठवले, शशिकांत लोहबंदे, जनार्दन गवंदे, शेख रशिद, यांनी परिश्रम घेतले.

## वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक यांना कर्तव्याच्या गावी मुख्यालयी राहण्याचे वावडे

**हदगाव,दि. ०६ डिसेंबर :** हदगांव वनपरिक्षेत्रातील तामसा, मनाठा, लोहा व हदगांव वन परिमंडळांतर्गत वनपाल, वनरक्षक मुख्यालयी न राहाता नांदेड शहरात वास्तव्यास राहुन ५० ते ६० कि.मी.अंतरावरुन राखीव वनक्षेत्रीचे संरक्षण म्हणजे उंटावरुन शेळ्या राखण्याचे काम होत आहे.वनरक्षक मुख्यालयी राहत असलेल्याचे शासनाकडे वनाबाटी करून दरमहा हजारो रु. घरभाडे घेउन मुख्यालयी न राहता नांदेड किंवा इतर शहरात राहुन वरिष्ठ अधिकाऱ्या प्रमाणे स्वतःच्या चार चाकी वाहन किंव्हा दुचाकी ने मनाला वाटेल तेंव्हा दौऱ्यावर येत असल्याचे जनतेतून बोलले जात असून यावर वन्यप्रेमी कडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रथमदर्शनी वन्यजीवी प्रेमी व नागरिकांतून अशी चर्चा होत आहे की, हे नित्याचेच झाले आसुन अशी परिस्थिती वनक्षेत्रातील चार ही वन परिमंडळात दिसुन येते आहे.तर संबंधित वनक्षेत्रपाल सुध्दा मुख्यालयी वास्तव्यास राहत नसल्याने त्यांची वचक राहिली नसुन तेरी भी चुप मेरी भी चुप अशीच अवस्था झाली आहे . अशा प्रकरणी साहय्यक वनसंरक्षक कारवाई करण्यास हिंमत करीत नाही कारण ते टक्केवारीच्या आर्थिक व्यवहाराने वनक्षेत्रपालांना पाठबळ आसल्याचे समजते तर उपवनसंरक्षक यांना राखीव वनाच्या संगोपणाचे काहिही देणे घेणे नसुन वनविभागातील बोगस कामातुन कोट्यावधी रुपये हजम करण्यात ते सुध्दा मश्गुल आहेत आता या प्रकरणी जनतेने निवडून दिलेल्या लोक प्रतिनीधी आमदार, खासदार,भावी पालकमंत्री,आणि सर्वधित भावी वनमंत्री यांना आता जाब विचारण्याची वेळ आली असुन पर्यावरणाच्या समतोल राखण्यासाठी जानकार कार्यकर्ते व जनतेने आता पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. तर वनपाल,वनरक्षक,यांना नेमुन दिलेल्या वनबिटाच्या गावी मुख्यालयी हे लोक राहत नसल्याचे अनेक गावाच्या ग्रामसभेने तसे ठराव दिले असल्याचे सुद्धा नागरिकांतुन बोलले जात आहे. मुख्यवनसंरक्षक छ. संभाजी नगर यांचे कडे दाखल करून कामचुकार वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल,यांचेवर वरील प्रमाणे कारवाई करणार असल्याची माहिती हाती आली आहे. यामुळे कामचुकारांचे धाबे दणाणले आहे.

## महापरिनिर्वाण दिनी नरसीत महा रक्तदान शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा
नायगाव,दि. ०६ डिसेंबर

नायगांव तालुक्यातील नरसी येथे महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्व संध्येच्या प्रारंभी फुले -शाहु आंबेडकर क्रांती मंचाच्या वतीने येथील मुख्य चौकात महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

नायगांव तालुक्यातील नरसी येथे फुले-शाहु आंबेडकर क्रांती मंचाचे संस्थापकध्यक्ष भास्कर भेदेकरांनी सामाजिक बांधिलकीतून आपण समाजाचे काही देणे लागतो या भावने तून गेल्या पाच वर्षा पासून सातत्याने समाज कार्यात भरीव योगदान देत आले आहेत. त्या अनुषंगानेच आज दि.६ डिसेंबर रोजी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने नायगांव येथील तहसीलदार सौ. धम्मप्रिया गायकवाड, जिल्ह्याचे लोकप्रिय नुतन खासदार रविंद्र वसंत चव्हाण,नरसी नगरीचे पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल यांच्या उपस्थितीत नंदिग्राम ब्लड बँक नांदेडचे प्रदीप कांबळे सहकारी टीमच्या नेतृत्वाखाली नरसीतील



मुख्य चौकात महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सर्व प्रथम नायगांव तालुका दंडाधिकारी सौ.धम्मप्रिया गायकवाड,जिल्ह्याचे लोकप्रिय नुतन खासदार रविंद्र वसंत चव्हाण यांनी महामानवाच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन न केले.तद्नंतर सौ. धम्मप्रिया गायकवाड यांनी अशा महामानवाच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून शाहू-फुले आंबेडकर क्रांती मंचाचे संस्थापक अध्यक्ष भास्कर भेदेकरांनी महारक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजातील तरुणांईत एकआदर्शाचा पायंडा घालून दिला हे वाखाणण्या जोगे कार्य आहे.हे यावेळी भास्कर भेदेकरांची प्रशंशा केली.

सकाळी दहा पासून नंदिग्राम ब्लड बँक नांदेडचे प्रदीप कांबळे व सहकारी टीमच्या नेतृत्वाखाली सकाळी दहा पासून रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली ते दुपारी साडेतीन वाजे पर्यंत जवळपास शंभर हुन अधिक नागरिकांनी रक्तदान केले.तर मानवाच्या जीवनातील सर्वात श्रेष्ठ दान रक्त दान असुन यावेळी रामतीर्थ ठाण्याचे साह्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी देखील रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवून रक्तदान केले. तद्नंतर रक्तदान केलेल्या सर्व व्यक्तीना शाहू,फुले आंबेडकर क्रांती मंचाच्या वतीने भारतीय 'संविधान' या पुस्तके चे वाटप करण्यात आले. या महापरिनिर्वाण दिनी आयोजित केलेल्या महारक्त दान शिबीरा वेळी नागसेन जिगळेकर ,इंद्रजित डुमने ,दिपक कांबळे , सुनील कांबळे ,किरण इंगळे सुर्यकांत भेदे नरसी, संदिप सोनकांबळे, संदिप उमरे,आदिनी अथक परिश्रम घेऊन रक्तदान शिबिर यशस्वी केले.

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# आव्हान पेलण्याचा आनंद

१० वर्षांपूर्वीच्या, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीआधी, 'भाजपाचे महाराष्ट्रातील एक प्रभावी प्रदेशाध्यक्ष' अशी स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या आमदार देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात २०१४ च्या विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची माळ काहीशा अनपेक्षितपणेच पडली होती. ती निवडणूक लढविताना महाराष्ट्र भाजपा 'मोदी लाटे'वरच स्वार होता. मोदींच्या करिष्म्यामुळेच भाजपाला सत्तासंपादनासाठी संख्याबळ जमविता आले असले, तरी 'स्वबळा'चा पक्षाचा आवाज मात्र क्षीणच झाला होता. तेव्हा भारतीय जनता पार्टी केंद्रात मजबुतीने सत्तेवर दाखल झाला होता आणि देशात सर्वत्र मोदीनामाचा उत्स्फूर्त गजर सुरू होता. अशा काहीशा अनपेक्षितपणे भारलेल्या वातावरणातच भाजपाला काहीशा राजकीय कसरतीही कराव्या लागल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अप्रत्यक्ष मदतीमुळे बहुमताच्या पहिल्या परीक्षेत तगलेल्या आणि मागाहून सत्तेत सहभागी झालेल्या शिवसेनेमुळे स्थिरावलेल्या सरकारचा गाडा हाकण्यासाठी महाराष्ट्र भाजपाकडे सक्षम नेतृत्व नाही, अशीच स्थिती असताना भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने फडणवीस यांच्या खांद्यावर सरकारच्या नेतृत्वाची जबाबदारी टाकली, तेव्हा अनेक इच्छुकांच्या भुवया उंचावून वक्रदेखील झाल्या होत्या. अगोदरच सरकारमध्ये सहभागी होऊनही विरोधाची धार परजलेल्या शिवसेनेचे आव्हान आणि त्यात अंतर्गत नाराजीची भर अशा दुहेरी अडथळ्यांचा सामना करण्याचे आव्हानही या जबाबदारीसोबत पक्षाने फडणवीस यांच्यासमोर उभे केले, तेव्हा पुढच्या पाच वर्षांच्या या नवख्या नेत्याची दमछाक होईल, अशा आशेने अनेकांच्या नजरा येणाऱ्या प्रत्येक नव्या दिवसावर खिळल्या होत्या. पण, दिल्लीच्या भक्कम पाठिंब्याच्या जोरावर फडणवीस यांनी ही दोन्ही आव्हाने झेलत मुख्यमंत्रिपदाची पूर्ण पाच वर्षे पार केली. महाराष्ट्राच्या इतिहासात मुख्यमंत्रिपदाची पाच वर्षे पार करण्याची नोंद केवळ वसंतराव नाईक यांच्या नावावर झाली होती. फडणवीस हे या यशाचे दुसरे मानकरी ठरले. आता नव्याने मुख्यमंत्रिपदाची धुरा खांद्यावर घेतल्यानंतर, तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होणारे फडणवीस हे दुसरे नाव असेल. सलग पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या मुख्यमंत्र्यांमध्येही वसंतराव नाईक यांच्यानंतर फडणवीस हेच दुसरे मुख्यमंत्री ठरले आहेत. साहजिकच एवढी चमकदार कामगिरी असलेल्या नेत्यास त्याचा नैसर्गिक हक्क देण्याची न्याय्य भूमिका भाजपा श्रेष्ठींनी पार पाडली. यावरून त्या पक्षाच्या संस्काराची प्रचीती येते. त्यांच्या सलग पाच वर्षांच्या कर्तबगार राज्य कारभाराची पावती म्हणून २०१९ मधील लोकसभा निवडणुकीत 'मुख्यमंत्रिपदाचा चेहरा' म्हणून भाजपाने फडणवीस यांनाच मतदारांसमोर नेले. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा-शिवसेना-रिपाई आणि अन्य काही घटकांनी केलेल्या 'महायुती'स बहुमताचा स्पष्ट जनादेश मिळाला. पण, अगदी अलिकडच्या सगळ्या घटनाक्रम महाराष्ट्राच्या राजकारणास वेगळ्याच वळणावर घेऊन गेला आणि फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदावरून विरोधी पक्षनेतेपदावर बसण्याची वेळ आली. या कालखंडात फडणवीस यांच्या नावावर इतरही अनेक राजकीय विक्रम जमा झाले. २०१९ नंतरच्या निवडणूक निकालानंतरच्या नाट्यमय घडामोडींनी त्यांचा नैसर्गिक हक्क हिरावला गेला आणि ते माजी मुख्यमंत्री ठरले. त्या काळातच अनपेक्षित क्षणी पुन्हा चमत्कार घडवून मुख्यमंत्रिपदाची शपथही त्यांनी घेतली. या प्रसंगामुळे '८० तासांचा मुख्यमंत्री' अशीही नोंद त्यांच्या नावावर झाली.

गेल्या १० वर्षांतील व त्यापैकी मागील पाच वर्षांतील या घडामोडींनी अनेक राजकीय वळणे घेतले. अशाच अनपेक्षित घडामोडी घडवून नव्या सत्तास्थापनेचा अचाट प्रयोग यशस्वीपणे पार पाडल्यानंतर पुन्हा सत्ता हाती येताच उपमुख्यमंत्रिपदावर काम करण्याचा पक्षाचा आदेशही नम्रपणे स्वीकारला. या काळात फडणवीस यांच्या वैयक्तिक राजकीय कारकीर्दीचा आलेखात मोठे चढ-उतार आले आहेत, हे स्पष्ट आहे. म्हणूनच महायुती सरकारचे मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस हे नव्याने पदाची सूत्रे हाती घेत असताना, त्यांच्या कल्पनेतील नवा महाराष्ट्र घडविण्याबाबत त्यांनी याआधी अधोरेखित केलेल्या बाबींचा मागोवा घेणे आवश्यक ठरते. काँग्रेसी सत्तेच्या काळातील अनेक वर्षांचे राज्याचे धोरण पाहिले, तर शहरीकरण हा अभिशाप असल्याच्या भावनेतून शहरांच्या नियोजनाकडे फारसे लक्षच दिले गेले नाही. तरीही शहरीकरण होतच गेले, पण त्याचे नियोजन आपण करू शकलो नाही. परिणामी शहरे बकाल झाली. पण याच शहरांतून देशाचा सर्वाधिक जीडीपी उभा राहतो, वस्तू आणि सेवांची निर्मितीही शहरांकडूनच होते. त्यामुळे शहरांमध्ये संधी अधिक असतात, साहजिकच लोकांचा ओढादेखील शहरांकडेच असतो. म्हणून शहरांचा नियोजनबद्ध विकास होत नाही, तोवर शहरीकरणाला योग्य प्रकारे न्याय देता जाणार नाही, याचे भान फडणवीस यांना आहे. ते त्यांनी अनेकदा बोलूनही दाखविले आहे. शहरीकरण ही एक संधी आहे. केवळ इमारती आणि रस्ते करून शहरे चांगली होणार नाहीत. आता सुविधा आणि त्यांचे सुनियोजित व्यवस्थापन सुरू झाले आहे. पंतप्रधानांच्या स्मार्ट सिटी संकल्पनेच्या गुंतवणुकीत महाराष्ट्र सर्वात पुढे आहे, असे सांगितले जाते. अशा शहरांमध्ये शाश्वत विकास करणे ही गरज आहे. त्यासाठी शहरांमधील गुंतवणूक वाढवावी लागेल. शहरांची वस्तू आणि सेवांची निर्मितीची क्षमता लक्षात सार्वजनिक क्षेत्रांत अधिकाधिक वस्तू व सेवांची निर्मिती होईल, असा प्रयत्न व्हायला हवा. त्यासाठी शहरीकरणाचे व्यवस्थापन करणेही गरजेचे ठरेल. महाराष्ट्रातील औद्योगीकरण फक्त मुंबई-ठाण्यात दिसते. पुण्यात अलिकडे थोडे जास्त दिसते. नाशिकमध्ये हा वेग काहीसा थांबला आहे, तर छत्रपती संभाजीनगरात औद्योगीकरणाचा थोडासा प्रभाव दिसतो. त्या पलीकडे ते फारसे दिसत नाही. मुंबई-पुण्यासारख्या सुविधांचे फायदे राज्याच्या अन्य सर्व जिल्ह्यांना मिळावेत, ही महाराष्ट्राच्या विकासनीतीची अपेक्षा आहे. शेतीच्या व्यवस्थापनासाठीची एक नवी साखळी निर्माण करण्याचा संकल्प फडणवीस सरकारने समृद्धी महामार्गाच्या निर्मिती काळात सोडला होता. गेल्या काही वर्षांत ज्या अनेक कारणांमुळे महाराष्ट्राला काहीशी मरगळ आली, त्यामध्ये सत्तेची साठमारी हे महत्वाचे कारण होते. जनतेने स्पष्ट कौल दिलेल्या पक्षाला सत्तेची संधी मिळाली की सरकार स्थिर असते आणि विकासाच्या तसेच अन्य महत्त्वाच्या धोरणात्मक बाबींवर ठोस निर्णय घेऊ शकते. २०१९ नंतरचा काळ त्या दृष्टीने मोठा अस्थिरतेचा होता. एक तर, सत्तेवर आलेल्यांना सरकार चालविण्याचा जनादेश नसतानाही व परस्परांच्या विरोधात निवडणूक लढवूनही केवळ आकड्यांची गोळाबेरीज शक्य झाल्यामुळे सरकार स्थापन झाले असले, तरी राज्यहितासाठी सत्ता राबविण्याची त्यांची मानसिकताच नव्हती, हे त्या काळात समोर आलेल्या अनेक धक्कादायक, आश्चर्यकारक घडामोडींवरून उघड झाले होते. त्यामुळे विकासाच्या बाबतीत आर्थिक क्षेत्रात पोकळीही निर्माण झाली आणि त्याचा फायदा घेत अन्य राज्यांनी ती पोकळी भरून काढली. महाराष्ट्र मागेच राहिला. तरीही महाराष्ट्र कधीही मागे राहू शकणार नाही. महाराष्ट्र सदैव पुढेच राहायला हवा आणि मुंबईचे महत्त्व कधीही कमी होणार नाही. महाराष्ट्र सदैव पुढेच राहावयास हवा आणि फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील नव्या महायुती सरकारने त्या दृष्टीनेच सतत प्रयत्नशील राहायला हवे. शिक्षण, औद्योगीकरण, प्रकल्पग्रस्तांचे न्याय्य पुनर्वसन, समतोल विकास आणि अनुशेष वा शेतकऱ्यांच्या समस्या अशा अनेक प्रश्नांवर सकारात्मकदृष्ट्या भरीव काम करण्याची संधी संपूर्ण बहुमत असलेल्या स्थिर सरकारला लाभली आहे. राज्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय आणि लक्ष्य आहे, असे देवेंद्र फडणवीस नेहमी सांगत असतात. फडणवीस यांच्याकडे पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपद आले आहे. अगोदरच्या सत्ताकाळात अनेक गुपितेही त्यांच्यासमोर उघडी झाली असतील, यात शंका नाही. त्यांचा वापर करण्याची संधी साधून जुन्या वाटांना पडलेली भगदाडे बुजविण्याची, महाराष्ट्र आता नव्या विश्वासाने पुढे जात आहे, याची ग्वाही देण्याची व 'पक्ष अधिक शक्तिमान झाला आहे' असा विश्वास पक्ष आणि परिवारात पुन्हा रुजविण्याची ज्येष्ठत्वाची भूमिका फडणवीस यांनाच पार पाडावी लागणार आहे. कारण नेतृत्वाच्या आणि राजकारणातील कौशल्य सिद्ध करण्याच्या साऱ्या कसोट्या त्यांनी लीलया पार पाडल्या आहेत.

## दृष्टिक्षेप

विलास पंढरी

# ट्रम्प, मोदी आणि भारत

अंबानी कुटुंबात काही दिवसांपूर्वी झालेल्या लग्नाचे कवित्व अनेक दिवस पूर्ण मीडिया व्यापून राहिले होते. अमेरिका हे तर जगातील सर्वार्थाने शक्तिशाली राष्ट्र, महासत्ता. किती शक्तिशाली तर जीडीपी, दरडोई उत्पन्न, शस्त्रास्त्रे, जगातील सर्वात शक्तिशाली सैन्य अशा महत्त्वपूर्ण क्षेत्रात एक नंबरवर आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था किती मोठी आहे, हे समजण्यासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेची आकडेवारी पाहायला हवी. अलिकडेच भारतीय अर्थव्यवस्था ब्रिटनला मागे टाकून जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. भारताचा २०२३ अखेरचा जीडीपी ३७५५ अब्ज डॉलर्स असून त्याचे दरडोई उत्पन्न २३८९ डॉलर्स होते. अमेरिका ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून तिचा २०२३ अखेरचा जीडीपी तब्बल २६,४६२ डॉलर्स अब्ज इतका होता आणि दरडोई उत्पन्न ८०,३९९ डॉलर्स होते. अशा महाशक्तिशाली देशाच्या प्रमुखपदी दुसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांची चर्चा येत्या कमीत कमी २० जानेवारीपर्यंत तरी सर्व माध्यमातून होतच राहणार आहे. कारण युनायटेड स्टेट्समध्ये दर चार वर्षांनी २० जानेवारी रोजी नवनिर्वाचित अध्यक्षांचा शपथविधी आयोजित केला जातो; जो नवीन राष्ट्रपती पदाच्या कार्यकाळाच्या प्रारंभास सूचित करतो. ट्रम्प यांनी उपाध्यक्ष कमला हॅरिस यांच्यावर निर्णायक विजय मिळवून अमेरिकेच्या अध्यक्षपदावर पुनरागमन केले आहे. त्यांचा अधिकृत शपथविधी सोमवार, २० जानेवारी, २०२५ रोजी वॉशिंग्टन, डीसीमधील यूएस कॅपिटल येथे होईल.

ट्रम्प आणि मोदी दोघेही जगातील लोकसंख्येने मोठ्या लोकशाही देशांचे निवडून आलेले प्रमुख आहेत. दोघांमध्ये चांगली मैत्री असून दोन्ही देशांना त्याचा फायदा नक्कीच होऊ शकतो. २५ डिसेंबर २०१५ रोजी रशिया दौऱ्यावरून परतताना तत्कालीन पाक पंतप्रधान नवाज शरीफांची अचानक घेतलेली भेट, अचानक जाहीर केलेली नोटबंदी, पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी भारतीय जवानांच्या केलेल्या हत्येनंतर पाकिस्तानला धडा शिकवणारा केलेला सर्जिकल आणि एअर स्ट्राईक असे धक्कादायक निर्णय मोदींनी घेतले.

२०१६ साली ट्रम्प यांनी आपल्या कॅबिनेटसाठी मंत्र्यांना निवडले, काहींना मनाला येईल तेव्हा काढले, पुन्हा घेतले. आता ट्रम्प आपल्या समर्थकांनाच निवडत आहेत. ट्रम्प म्हणतील तीच पूर्व दिशा असे म्हणणारी माणसे मंत्रिमंडळात घेतली जात आहेत. विशेष म्हणजे भारतीय वंशाच्या काहींना महत्त्वपूर्ण पदे मिळाली आहेत; याचा मात्र भारताला फायदा होऊ शकतो. मोदी आणि ट्रम्प दोघांनाही जनतेशी थेट संवाद साधण्याची कला अवगत असून मोदींनी तर रॅलीत केलेल्या जोरदार भाषणांनी जनतेशी थेट संवाद प्रस्थापित करण्याचा विक्रमच प्रस्थापित केला आहे. ट्रम्प यांच्याप्रमाणेच मोदींनीही प्रेसकडे दुर्लक्ष केले आहे. मोदींनी आत्तापर्यंत कोणत्याही पत्रकार परिषदेला संबोधित केलेले नाही. काही वृत्तवाहिन्यांशिवाय कोणत्याही पत्रकाराला मुलाखत दिलेली नाही. ट्रम्प आणि मोदी या दोघांनीही धोरणात्मक घोषणा करण्यासाठी, महत्त्वाचे मतप्रदर्शन करण्यासाठी पूर्वीच्या ट्विटर आणि आत्ताच्या एक्स हँडलचा लीलया वापर केल्याचे दिसते. ट्रम्प यांची पृष्ठभूमी अतिश्रीमंत अशी आहे. त्यांचे वडीलही श्रीमंत होते तर स्वतः ट्रम्प फार मोठे उद्योगपती आहेत. मोदींची पृष्ठभूमी अतिशय गरिबीची असून त्यांचे वडील चहा विक्रीचा व्यवसाय करीत होते. मोदी हे भाजपाचे स्पष्टपणे एकमताने निवडलेले पंतप्रधान पदासाठीचे उमेदवार होते. अमेरिकेतील राजकीय प्रणालींमधील फरकामुळे, ट्रम्प आपल्या मंत्रिमंडळासह नवीन नोकरशाहीची भरती करू शकतात. भारतातील प्रणालीनुसार कायमस्वरूपी नोकरशाहीतूनच आपल्याला हवे ते अधिकारी निवडण्याचे मर्यादित स्वातंत्र्य मोदींना आहे. त्यांनी भारताचे माजी परराष्ट्र सचिव एस. जयशंकर यांची परराष्ट्रमंत्री म्हणून केलेली निवड. ते परराष्ट्रमंत्री म्हणून एवढे उत्तम काम करीत आहेत की विरोधकांनासुद्धा त्यांच्यावर टीका करणे शक्य होत नाही.

ट्रम्प यांना आणखी चार वर्षांचाच कार्यकाळ मिळू शकतो. कारण अमेरिकेच्या घटनेने अध्यक्षांना जास्तीत जास्त दोन-चार वर्षांच्या टर्म्सची मर्यादा घातली आहे. मोदींची सध्याच पाच वर्षे असलेली तिसरी टर्म सुरू असून अमेरिकेसारखी कुठलीही मर्यादा आपल्याकडे नाही. मोदींनी आतंकवादाविरुद्ध कडक धोरण अंगीकारण्याचे धैर्य दाखविले आहे, हे दोघांमध्ये साम्य असले, तरी मुस्लिम आतंकवाद असा थेट उल्लेख करण्याचे ते टाळतात. ट्रम्प यांनी निवडणुकीपूर्वीच्या आपल्या सार्वजनिक भाषणात बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन अल्पसंख्यकांवर होत असलेल्या अत्याचारांचा तीव्र निषेध केला असून निवडून आल्यावर बांगलादेशातील युनूस सरकारवर हिंदूंच्या संरक्षणासाठी दबाव आणण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांच्याकडे असलेले सामर्थ्य बघता ते यात यशस्वी होतील, अशी आशा आहे. बांगलादेशातील हिंदूंविषयी ट्रम्प यांनी व्यक्त केलेली काळजी भारत व अमेरिकेतील नव्हे तर साऱ्या जगातील हिंदू समाजाला सुखावणारी होती. त्यांच्या प्रतिस्पर्धी भारतीय वंशाच्या असूनही कमला हॅरिस यांनी मात्र बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारांचा साधा निषेध केला नव्हता.

पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती ट्रम्प राष्ट्रवाद आणि संरक्षण नीतीला बळकटी देण्यात अग्रेसर आहेत. अमेरिकेमध्ये स्थलांतरित लोकांविरुद्ध कडक धोरण ट्रम्प यांनी अवलंबले आहे तसेच मोदी यांनी भारतामध्ये घुसखोरांविरुद्ध कडक पावले उचलली आहेत. ट्रम्प यांच्या स्थलांतरित नागरिकांविरुद्ध धोरणाचा परिणाम हा मुस्लिम समाजावर पडला होता तसेच काहीसे चित्र हे भारतामध्ये पाहायला मिळते. काश्मीरमधून ३७० कलम हटवल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या या निर्णयावर टीका करण्यात आली होती. मात्र, ट्रम्प यांनी या निर्णयाचे स्वागत करत भारत सरकारच्या निर्णयाला समर्थन दिले होते. अमेरिकेमध्ये नरेंद्र मोदी यांच्यासाठी 'हाऊडी मोदी' कार्यक्रमाचे आयोजन केले होते, तर अहमदाबादमध्ये ट्रम्प यांच्यासाठी 'नमस्ते ट्रम्प' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चीन-अमेरिकेचा व्यावसायिक प्रतिस्पर्धी आणि विरोधक असल्याने ट्रम्प यांची चीनविरोधी धोरणे चीनवर दबाव ठेवण्यासाठी भारताला नक्कीच फायदेशीर ठरणार आहेत.

दोघांनाही कमीत कमी पुढील चार वर्षे मिळणार असून भारताची प्रगती वेगाने होईल, अशी अपेक्षा आहे. युक्रेन पूर्णतः अमेरिका आणि नाटो गटातील राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून असल्याने ट्रम्प ही मदत थांबवतील आणि पर्यायाने युद्ध थांबवल्याचे श्रेय लाटतील, पण इस्रायलला मात्र मदत चालू ठेवून ते उघडपणे म्हणत असलेल्या इस्लामी वर्चस्वाला लगाम लावतील असे वाटते.

९८६०६१३८७२

## वेध

विजय पांढरीपांडे

# लाडके विद्यार्थी योजना

कुलगुरू आपल्या दालनात फायली चाळत होते. अर्धा दिवस उलटून गेला, तरी कुणी निवेदन द्यायला आले नाही, मोर्चा घेऊन आले नाही, याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. हे घडले नाही तर कुलगुरूंना चुकल्या चुकल्यासारखं वाटतं. तितक्यात सचिवाने १०-१२ विद्यार्थी आल्याचे सांगितले. नियमाप्रमाणे सुरक्षा गार्ड आधी आत आले. त्यांनी माहिती दिली, मुलांना फक्त निवेदन द्यायचे आहे. तसाही बाहेर आरडाओरडा ऐकू येत नव्हता. त्यामुळे कुलगुरू बिनधास्त होते. त्यांनी मुलांना परवानगी दिली. तसा घोळका आत आला. दोघे-तिघे उपरणे घातलेले... कुठल्या तरी पक्षाचे विद्यार्थी सेनेचे स्वयंघोषित नेते.

''बोला काय काम काढलं? कसली मागणी?''

''निवेदन आहे सर लहानसे. सरकारने लाडकी बहीण, लाडका भाऊ अशा लाडक्या योजना सुरू केल्या आहेत. आमचे म्हणणे एवढेच आहे की, यालाच जोडून 'लाडके विद्यार्थी' अशी योजना सुरू करण्यात यावी.''

''अरे व्वा! छान कल्पना आहे. पण सरकारने करायचं काय?''

''काही जास्त नाही सर. विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घ्यायचे. त्यांच्या अडचणी सोडवायच्या?''

''म्हणजे नेमके काय करायचे?'' कुलगुरूंनी गुगली प्रश्न टाकला.

''सर, अनेक विद्यार्थी फेल होतात. त्यांना काही विषय समजत नाहीत. जड जातात. त्यांना सवलत द्यायची. पुढच्या वर्गात बसू द्यायचे. हजेरी नसली तरी परीक्षेला बसू द्यायचे. फी कमी करायची. होस्टेलमध्ये नोकरी लागेपर्यंत, म्हणजे सरकारी घर मिळेपर्यंत राहू द्यायचे. मेसमध्ये जेवू द्यायचे. सोपे पेपर काढायचे. परीक्षेची भीती वाटते सर सगळ्याच मुलांना. मुलं आत्महत्या करतात मग ताण सहन झाला नाही की!''



''कल्पना छानच आहे की! मलादेखील हे सुचलं नाही इतके दिवस. आपण असे करू. परीक्षाच बंद करू. विद्यापीठाचे लाखो-करोडो रुपये खर्च होतात परीक्षा घेण्यात. पेपर काढा, ते तपासा, निकाल लावा यात प्राध्यापकांचा वेळही वाया जातो. त्यातून निष्पन्न काहीच होत नाही. कारण आपल्या निकालावर कुणी विश्वास ठेवत नाही. प्रत्येक कंपनी पुन्हा वेगळी परीक्षा घेते. पुढील शिक्षण घ्यायचे तर पुन्हा प्रवेश परीक्षा द्या. मग त्या प्रवेश परीक्षांचा घोळ, पेपर फुटणे, निकाल चुकीचे लागणे, वरचा नंबर येण्यासाठी लाच देणे, जुगाड करणे... तुम्हाला, तुमच्या पालकांना नसता त्रास. शिवाय सगळ्यांच्या वेळेचा अपव्यय. त्यापेक्षा आपण परीक्षा विभागच बंद करू. चार वर्षे झाली की 'कोर्स पूर्ण केला' असे सर्टिफिकेट देऊन टाकू. तुम्हालाही ताण नको. आम्हालाही ताण नको. शिवाय त्यामुळे सर्वांचा वेळ वाचेल. प्राध्यापक त्या वेळात संशोधन करतील. त्यामुळे देशाची प्रगती होईल. मुख्य म्हणजे लाखो रुपये वाचतील. ते पैसे आपल्याला, म्हणजे विद्यापीठाला, म्हणजे सरकारला 'लाडके विद्यार्थी योजने'साठी सहज वळते करता येतील! त्यासाठी बजेटमध्ये वेगळी तरतूद करावी लागणार नाही. आता परीक्षाच नाही म्हटले की, विद्यार्थ्यांना ताण नाही. आत्महत्या नाही. सगळेच प्रश्न एकाच दणक्यात सुटतील. मी हे सहज रिकमेंड करतो पुढील कारवाईसाठी...!'' कुलगुरू इतक्या सहजपणे हे सगळे मान्य करतील असे त्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना वाटले नव्हते. त्यांनी नारे लावले... विजय असो... लाडके विद्यार्थी झालेच पाहिजे... वगैरे. मुलांनी निवेदन देताना फोटो काढले. नेते पुढे पुढे झाले अन् नारे देत निघून गेले.

पाचच मिनिटांत त्यातले दोन नेते पुन्हा परत आले. यावेळी ते चक्क कुलगुरूंच्या पाया पडले. म्हणाले,

''सर माफ करा, तुम्ही काहीच ॲक्शन वगैरे घेऊ नका. आम्हाला वरचे नेते सांगतात ते आम्ही करतो. उद्या फक्त फोटोसह बातम्या यायला हव्यात आम्हाला. तुम्ही परीक्षा विभाग बंद करू नका सर. उलट कडक धोरण ठेवा आहे त्यापेक्षा. आपल्या विद्यापीठाचे नाव झाले पाहिजे. रँक वाढली पाहिजे. तुम्हीच ते करू शकता.''

कुलगुरू ओठातल्या ओठात हसले. कुलगुरूसोबत सेल्फी घेऊन नेते हसत निघून गेले. कुलगुरूंनी निवेदन फाईल करण्यासाठी कुलसचिवाकडे पाठवून दिले. एक तरी मोर्चा आल्याने कुलगुरूंना समाधान वाटले. आता लंच ब्रेक घ्यायला हरकत नव्हती.

७६५९०८४५५५

## प्रासंगिक

मोरेश्वर बडगे

# फडणविशी : भाजपाचा भविष्यातील चेहरा!

आखेर सस्पेन्स संपला. तसा तो नव्हताच. मात्र राक्षसी बहुमत मिळून १३ दिवस उलटले. तरीही महायुतीचे सरकार बनत नाही म्हणून लोक अस्वस्थ होते. या विधानसभा निवडणुकीत भाजपाने १३२ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री भाजपाचाच होणार हे स्पष्ट होते. देवेंद्र फडणवीस यांनी एकहाती ही निवडणूक जिंकवून आणली म्हणून मुख्यमंत्री तेच होणार, हे स्पष्ट होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींची मान्यता, संघाचा आग्रह, पाठीशी शंभरावर आमदारांचे सैन्य. असे सारे असतानाही घोळ घातला गेला. अजितदादा त्रास देतील असे अनेकांना वाटले होते; मात्र ज्यांच्यासाठी फडणवीस यांनी अडीच वर्षांपूर्वी 'त्याग' केला, त्या एकनाथ शिंदेंनीच टेन्शन होते. चॅनेलवाल्यांना एवढे दिवस खाद्य मिळाले. ठीक आहे. राजकारणात प्रत्येकाला काही महत्त्वाकांक्षा असतात. शेवट गोड झाला हे महत्त्वाचे. 'मी पुन्हा येईन' असे फडणवीस म्हणाले होते. त्यांनी शब्द निभवला. 'समुद्र पुन्हा येतोय.' त्यामुळे किनाऱ्यावर दुकानं लावू पाहणाऱ्यांची पळापळ सुरू आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्येक पिढी एका नेत्याभोवती फिरते. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील यांच्याकडे महाराष्ट्राचे नेते म्हणून बघितले जायचे. कालपर्यंत हे स्थान शरद पवार अडवून बसले होते. या निकालाने शरद पवारांचे युग पूर्ण संपवले. उद्धव ठाकरे उत्तम फोटोग्राफर आहेत. आता लग्न-मौंजीच्या ऑर्डर घ्यायला ते मोकळे झाले आहेत. काँग्रेस कोमामध्ये आहे. सक्षम विरोधी नेता आहे कुठे? आताच्या पिढीत देवेंद्र फडणवीस हे नाव निर्विवादपणे नंबर एकवर आहे. वयाच्या २२ व्या वर्षी नगरसेवक, २७ व्या वर्षी सर्वात तरुण महापौर, १९९९ पासून सतत सहाव्यांदा आमदार, २०१४ मध्ये मुख्यमंत्री, पुढे पहाटेच्या शपथविधीच्या ७२ तासांचे मुख्यमंत्री आणि आता तिसऱ्यांदा मुख्यमंत्री. राजकारणातील ही 'फडणविशी' आहे. त्यांच्या सोबत राजकारण सुरू करणारे बहुतेक नेते विस्मृतीत गेले. देवेंद्र धावताहेत. त्यांच्याकडे वय आहे, विकासाचा आश्वासक चेहरा आहे, क्षमता आहे, संघ परिवाराच्या संस्कारात वाढले आहेत; आणखी २५ वर्षे धावतील. संयमी, सुसंस्कृत पण पक्षहितासाठी विरोधकांवर तुटून पडणारा भाजपाचा हा नेता उद्याचे 'पीएम मटेरियल' आहे. एकही मराठी नेता पंतप्रधान झाला नाही, याची महाराष्ट्राला खंत आहे. फडणवीस ती दूर करू शकतात. शपथविधीला त्यामुळेच महत्त्व आहे.

देवेंद्र फडणवीसांनी असे काय केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांचा 'परममित्र' म्हणून उल्लेख करतात, असा प्रश्न बहुतेकांना पडतो. त्याच्या उत्तरासाठी १० वर्षे मागे जावे लागेल... २०१४ च्या निवडणुकीच्या धामधुमीचा तो काळ होता. भाजपाने मोदींना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून जाहीर केले होते. देश जिंकायचा तर महाराष्ट्र जिंकणे आवश्यक आहे, हे मोदींच्या चाणाक्ष नजरेने हेरले होते. मोदी नव्या चेहऱ्याच्या शोधात होते. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची खुबी, कुठलाही अहंकार नाही, मात्र प्रचंड आत्मविश्वास या गुणांवर एक तरुण मोदींच्या मनात भरला. निवडणूक प्रचाराच्या नागपूरच्या सभेत मोदी म्हणाले होते, ''हा तरुण नागपूरने महाराष्ट्राला दिलेला हिरा आहे.'' हा तोच हिरा आहे ज्याने सध्या विरोधकांची झोप उडवली आहे. शरद पवारांचे ५० वर्षांचे घरफोडी राजकारण संपवले आहे. 'मी राहीन किंवा तू राहशील' अशा भाषेत ललकारणाऱ्या उद्धव ठाकरेंना घरी बसवले आहे. फडणवीसांनी मग काय वेगळे केले? चोवीस तास राजकारण करणाऱ्या नेत्याने जे करायला हवे, तेच फडणवीसांनी केले. मोदी युगात राजकारण हा पार्ट टाईम जॉब नाही. प्रचंड परिश्रम घेऊन टार्गेटचा पिच्छा करायचा हा भाजपाच्या आजच्या यशाचा मंत्र आहे. फडणवीसांनी आपल्या नेत्यांचे 'वर्क कल्चर' स्वीकारले, त्यावर स्वतःचा 'तडका' मारला. फडणवीसांचे आजचे जे नेतृत्व तुम्हाला दिसते, ती गेल्या १० वर्षांतील त्यांची कमाई आहे. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्या तालमीत तयार होताना त्यांनी भाजपाच्या प्रदेशाध्यक्षापर्यंत धडक मारली. थेट नरेंद्र मोदींशी संपर्क आला. मोदींनी संधी दिली आणि फडणवीसांनी त्या संधीचे सोने केले. मोदींनी त्यांना कुठलेही जास्तीचे अधिकार दिले नव्हते. पण तल्लख बुद्धी, समयसूचकता आणि आत्मविश्वासाने घेतलेले निर्णय प्रत्यक्षात उतरवताना फडणवीसांनी दाखवलेली धमक कौतुकाचा विषय झाली. या निवडणुकीची लढाई तर त्यांनी एकहाती लढली. सामाजिक समीकरणांना छेद देत केवळ स्वतःलाच नव्हे, तर भाजपालाही सिद्ध केले. त्यामुळेच मोदी छायेतल्या अनेक बड्या नेत्यांना मागे सारून स्वतःला महाराष्ट्राचा निर्विवाद नेता म्हणून मोठी झेप घेतली. समृद्धी महामार्ग, जलयुक्त शिवार, मेट्रो रेल्वेचे जाळे, मुंबईचा कोस्टल रोड, विकासाचे अनेक प्रकल्प सांगता येतील. आत्मविश्वास असेल तर नेते स्वयंप्रेरणेने काम करू शकतात, हे दाखवून देताना फडणवीसांनी स्वतःची निर्णय क्षमता सिद्ध केली आहे. २०१४ पासून सलग पाच वर्षे देवेंद्र मुख्यमंत्री होते. या आधी वसंतराव नाईक सलग ११ वर्षे मुख्यमंत्री राहिले आहेत. शरद पवार चारदा मुख्यमंत्री होते. मात्र, त्यांनाही सलग पाच वर्षे मुख्यमंत्रिपद टिकवता आले नव्हते. पवारांना जमले नाही ते फडणवीसांनी करून दाखवले. राज्य चालवण्याचा कुठलाही अनुभव नसताना फडणवीसांना हे कसे जमते, असा प्रश्न तुम्हालाही पडत असणार. तीच फडणवीसांची खासियत आहे. त्यांची एक खुबी आहे. ते विरोधकांना चूक करू देण्याची वाट बघतात. त्यांच्याशी पंगे घेणाऱ्या अनेक नेत्यांनी शरणागती पत्करली. 'कल का छोकरा' म्हणत एकनाथ खडसेंनी फडणवीसांशी पंगा घेतला. त्या नादात खडसे केव्हा संपले ते त्यांनाही कळले नाही. अनेक नेत्यांवर घोटाळ्याचे आरोप झाले. मात्र फडणवीसांवर कुठला आरोप करण्याचे धाडस विरोधकांना झाले नाही, हे विशेष. राजकारणात फक्त 'गॉडफादर' असून भागत नसते. त्याने दिलेल्या संधीचे सोने करण्यासाठी कष्ट उपसावे लागतात. त्यांनी ते उपसले. १८-१८ तास काम करून त्यांनी स्वतःची जागा निर्माण केली. ती जागाच आज त्यांना तिसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून खुणावते आहे.



२०१९ ची निवडणूक भाजपा आणि शिवसेना यांनी युती करून लढवली होती. युतीला बहुमतही मिळाले होते. पण उद्धव ठाकरेंनी दगा दिला. मुख्यमंत्री व्हायच्या नादात शरद पवारांच्या जाळ्यात अडकले. त्या धुंदीत हिंदुत्व सोडले. पवार म्हणा की उद्धव म्हणा, दोघांनीही फडणवीसांना टार्गेट केले होते. फडणवीसांना रोखले नाही तर आपले राजकारण संपणार, हे ओळखून पवारांनी उद्धव ठाकरेंना पुढे केले होते. उद्धव बिनकामाचे निघाले हे खुद्द पवारांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे. तरीही फडणवीसांना संपवण्यासाठी त्यांनी महाविकास आघाडीचे भूत उभे केले होते. फडणवीसद्वेष हाच त्यांचा अजेंडा होता. भाजपाच्या विकास कामांना स्थगिती देण्यापलीकडे यांनी काही केले नाही. अडीच वर्षांतच ठाकरे सरकार कोसळले तेव्हा पवारांनी मराठा आरक्षणाच्या बहाण्याने फडणवीसांना घेरू पाहिले. या आधुनिक अभिमन्यूने तेही चक्रव्यूह भेदले. कुठल्याही नेत्यावर एवढे हल्ले झाले नसतील जेवढे प्रहार फडणवीसांनी झेलले आहेत. फडणवीसांनी आपल्या कारकीर्दीत मराठा आरक्षण करून घेतलं होतं. हायकोर्टात ते टिकवूनही दाखवलं. २०१९ मध्ये त्यांचे सरकार राहिले असते तर ते त्यांनी सुप्रीम कोर्टातही टिकवलं असतं. मात्र ते शरद पवारांना नको होतं. समाजाचा एक नेता सर्व जातींचा नेता होतो, हे पवारांच्या डोळ्यात खुपत होतं. मनोज जरांगे पाटलांना कोणी उचकवलं? ते आता बाहेर येत आहे. पण आता जरांगे हंगामा करू शकणार नाहीत. आपला माणूस कोण हे आता मराठ्यांनाही उमगले आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### सनातनची आनंददायी स्वभावदोष निर्मूलन प्रक्रिया

सद्यस्थितीत आपण पाहतो की, आपले जीवन धकाधकीचे झाले आहे. जीवन जगण्यासाठी खूप धडपड करावी लागत आहे. अशा परिस्थितीत निराशा आणि ताणतणावाचे वातावरण निर्माण होते; ज्यामुळे मानसिक अडचणींनाही सामोरे जावे लागते. सर्वप्रथम मानसिक आरोग्य चांगले ठेवणे, निरोगी राहणे आणि जीवनातील अडचणींना सामोरे जाणे ही आपली प्राथमिक गरज बनली आहे. बाहेर कितीही प्रतिकूल वातावरण असले, तरी आपले मन शांत, स्थिर आणि सुदृढ कसे राहील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मन शांत ठेवण्यासाठी आपल्यातील दोष ओळखणे आणि त्यावर मात करणे महत्त्वाचे आहे. आपल्यामध्ये अतिविचार करणे, आत्मकेंद्रितपणा असे अनेक अहंभाव, न्यूनगंड, नकारात्मकता किंवा ऐकण्याची वृत्ती नसणे असे दोष कमी-अधिक प्रमाणात दिसून येतात; ज्यामुळे आपण मानसिक स्वास्थ्य गमावून बसतो. यातून बाहेर पडण्यासाठी नेमके काय करावे, असे विचार मनात येत असताना सनातन संस्थेचा स्वभावदोष आणि अहं निर्मूलन प्रक्रिया हा ग्रंथ वाचण्यात आला. या ग्रंथात इंद्रियांवर ताबा कसा मिळवायचा यासाठी शास्त्रशुद्ध पद्धत सांगण्यात आली आहे. मनाला योग्य त्या स्वयं-सूचना दिल्यास त्याच्या सैरभैरतेला आळा घालता येतो. अशा स्वयं-सूचना दिल्याने मन आणि इंद्रियांवर ताबा मिळवता येतो, याची अनेक उदाहरणे या ग्रंथात दिली आहेत. याव्यतिरिक्त संस्थेद्वारे निर्मित अन्य ग्रंथांचे वाचन करण्यात आले. भावी पिढीला अध्यात्मातील विविध विषयांवरील ज्ञान मिळावे, या उदात्त हेतूने या ग्रंथांची निर्मिती झाली आहे. आनंदमय जीवनासाठी या ग्रंथांचा लाभ घेता येईल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

### देवाभाऊंचे अभिनंदन

'मैं समंदर हूं, लौटकर जरूर आऊंगा...' अशा आत्मविश्वासाने, सत्तेसाठी तत्त्वांना तिलांजली देणाऱ्या धोकेबाजांना आव्हान देणारे देवेंद्र गंगाधर फडणवीस आता परत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार, हे स्पष्ट झाल्याची बातमी भाजपा आमदारांच्या मुंबईतील सभेनंतर येताच देशभर आनंदाची लाट पसरली आहे. 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' या प्रश्नांचे उत्तर त्यांना मिळाले असेलच. या अभूतपूर्व यशाबद्दल देवाभाऊंचे हार्दिक अभिनंदन!

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

●● ●●

## वाचक पत्रे

### मनाच्या श्रीमंतीची किमया

व्यक्तिजीवनात धनापेक्षा मन महत्त्वाचे असते. धन हे सर्व प्रकारचे सुख, संपन्नता, समाधान, संतुष्टता, ऐश्वर्य वैभव इत्यादी सर्व देऊ शकते. पण हेच धन, मनःशांती, मनसंपन्नता, मनप्रसन्नता देऊ शकत नाही. मनाच्या शांतीसाठी, मनातील वेदना निवारण्यासाठी, मनातील दुःख हे सर्व दूर करण्यासाठी या सर्वांचे निराकरण करण्यासाठी मनापासून मनांपर्यंत जोडलेली माणसचं उपयुक्त ठरतात हे कदापिही विसरता कामा नये. जोडलेली मनच शांती देऊ शकतात. म्हणून म्हटले जाते की, धनाच्या श्रीमंतीमुळे कमावलेली माणसे, धन असेपर्यंतच साथ देतात, संगत ठेवतात व धन संपले की दूर जातात. परंतु मनाच्या श्रीमंतीमुळे कमावलेली माणसे, आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत साथ देतात, सोबत समाजातील सर्व व्यक्तींनी आपले मन सदैव स्वच्छ, निर्मळ, निकोप ठेवून मनं जोडावी. धनाच्या श्रीमंतीपेक्षा मनाची श्रीमंती ही जगात सर्वश्रेष्ठ आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

### भाजपाचा नांदेड लोकसभा, झारखंड पराभव!

महाराष्ट्राच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत महायुतीतल्या भाजपा १३२, शिवसेना ५७ व राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागा जिंकल्या तर महाविकास आघाडीतील काँग्रेस १६, उबाठा २० व शरद पवार गटाने १० जागा जिंकल्या. एकूण ४६ म्हणजे विरोधी पक्षनेत्यासाठी आवश्यक आकड्यालाही या तिन्ही पक्षातील कोणीही गाठू शकले नाही. एवढी दयनीय आणि नामुष्कीची वेळ आघाडीतील या पक्षांवर सुज्ञ मतदारांनी आणली. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार रवींद्र चव्हाण यांनी भाजपाचे डॉ. संतुक हंबर्डे यांचा फेरमोजणीत अवघ्या १४५७ मतांनी पराभव केला. या पराभवाचे शल्य निश्चित बोचणारे आहे. येथे विजय झाला असता तर भाजपाचे लोकसभेतील संख्याबळ एकने वाढून ते २४१ झाले असते. महाराष्ट्रात ते १० आणि महायुतीच्या विजयी खासदारांची संख्या १८ झाली असती. सार्वत्रिक पोटनिवडणुकीतही भाजपा उमेदवाराचा येथून पराभव झाला होता. तिकडे झारखंडमध्ये भाजपा नेत्यांनी एक्सपायरी डेट झालेल्यांना पक्षात सामावून घेत आयाराम गयारामावर भिस्त ठेवली. झारखंड मुक्ती मोर्चातून आलेल्या चम्पई सोरेन व इतरही जनाधार नसलेल्यांना उमेदवारी देत त्यांनी पराभवावर शिक्कामोर्तब केले. परिणामी पूर्वी होत्या तेवढ्या २५ जागाही भाजपा राखू शकली नाही. घुसखोरीचा मुद्दा हेमंत सोरेन यांच्या आदिवासी एक है तो सेफ है पुढे पुरता निष्प्रभ ठरला आणि भ्रष्टाचारासाठी त्यांना तुम्ही जेलमध्ये टाकल्यावरही तुमच्या नाकावर टिच्चून ते सहकाऱ्यांसह परत सत्तेत परतले.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आ.नमिता मुंदडा यांनी दिलेले आश्वासन पूर्ण केले

## ओबीसी समाजातील भोई, वडार,नाभिक व कैकाडी समाजाला स्मशान भूमी साठी जागा उपलब्ध करून दिली

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ डिसेंबर**

आ.नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे ओबीसी घटकांतील भोई,वडार,नाभिक व कैकाडी समाजाला स्मशान भूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली असून काल ५ डिसेंबर गुरुवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातून तसा आदेश निर्गमित करण्यात आला आहे.आ.नमिता मुंदडा यांनी दिलेले आश्वासन पूर्ण केल्याने त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे.



थोडक्यात माहिती अशी की, गेल्या अनेक दिवसांपासून ओबीसी समाजातील बारा बलुतेदार व अठरा अलूतेदार घटकांच्या अनेक मागण्यांबाबत आमदार नमिता मुंदडा यांना निवेदने देऊन मागणी करण्यात आली होती.सदरील मागण्यांबाबत आ.नमिता मुंदडा यांनी शासन दरबारी पाठपुरावा करीत दिलेले आश्वासन पूर्ण केले.काल दिनांक ५/१२/२०२४ रोजी निवासी बीड उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या आदेशावरून भोई, वडार,नाभिक व कैकाडी समाजाला स्मशान भूमीसाठी जागा निर्गमित करून देण्याचे आदेश देण्यात आले आहे.

भोई समाजाला सर्वे नंबर ६२१/३ मधील १५ गुंटे, वडार समाजाला सर्वे नंबर ६२१/२ ,मधील २० गुंटे,नाभिक समाजास सर्वे नंबर ६२२/२ मधील २२ गुंटे, कैकाडी समाजास सर्वे नंबर ६२१/२ मधील १५ गुंटे जागा निर्गमित करण्यात आली आहे.

वरील नाभिक समाजासाठी मधुकर सुरवसे यांनी शासनाकडे मागणी केली होती तर भोई, वडार व कैकाडी समाजास स्मशान भूमी साठी आ.नमिता मुंदडा यांनी स्वतःच पाठपुरावा करून दिलेले आश्वासन पूर्ण केल्याने आ.मुंदडा यांचे भोई समाजातील पत्रकार बालाजी खैरमौडे, बालाजी चांदण भुजंगे,सुशांत खैरमोडे,श्रावण गवते, आदींनी अभिनंदन केले आहे.

# लोकमान्य टिळक विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ डिसेंबर**

पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात दि.०६ डिसेंबर २०२४ शुक्रवार रोजी महामानव,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक संजयराव विभूते यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



इ.८वीतील कु.नेहा वाघमारे हिने भीम वंदना सादर केली.याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश मातेकर यांनी आपल्या मार्गदशनातून डॉ.आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित व शोषीत समाजातील लोकांसाठी आपले आयुष्य वेचले.तसेच सामाजिक,आर्थिक व राजकिय अशा सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून, भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे.त्यांनी समाजाला शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला होता.शोषित समाजासाठी शिक्षणसंस्था व समाज जागृतीसाठी वृत्तपत्रे काढली.भारतीय राज्यघटना निर्मितीत मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून देखील त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करून त्यांच्यातील सामाजिक समरसतेच्या गुणांचा अंगीकार करावा असे सांगितले.

मुख्याध्यापक विभुते यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आज देशाला खरी गरज आहे म्हणून महापरीनिर्वाण दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी चांगले संकल्प करावेत असे आवाहन केले. विद्यार्थी मनोगतामध्ये इ.१०वीतील कु.सुप्रिया साळवे हिने डॉ.आंबेडकर यांचे सामाजिक तथा शैक्षणिक क्षेत्रातील योगदान यावर ओघवत्या शैलीत विचार व्यक्त केले. यादिनाचे औचित्य साधून विद्यालयातील इ.८वी ते १०वी वर्गातील विद्यार्थ्यांचा वर्गनिहाय प्रत्येकी १ तास साखळी पद्धतीने मुकवाचन उपक्रम घेण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राकेश मोरे यांनी केले.याप्रसंगी सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

# रा.कॉ.च्या वतीने रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ डिसेंबर**

रा. कॉ.च्या वतीने रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच पानगाव येथे जाणाऱ्या आंबेडकरी अनुयायांच्या भेटी घेतल्या.



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परळीच्या वतीने रेल्वे स्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख, उपनगराध्यक्ष आय्युबभाई पठाण, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस अनंत इंगळे, माजी नगरसेवक अजिज कच्छी, रवि मुळे, राज हजारे, सचिन मराठे, संतोष घोडके ,सोपानराव रोडे,अलीभाई,सखाराम आदोडे,मंगेश मुंडे, विठ्ठल लोंढे,सुरज उपाडे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज रोटरीचा अनोखा उपक्रम, वाहनांना रिफ्लेक्टर लावून केली जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.६ डिसेंबर**

केज शहरात व परिसरात रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचा उपक्रम रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने राबवण्यात आला. यावेळी शंभरहून अधिक वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले.



केज तालुका व परिसरातील असंख्य वाहनांच्या पाठीमागील बाजूस रिफ्लेक्टर नसल्याने अशा वाहनांची स्थिती किंवा गती लक्षात न आल्याने या वाहनाला पाठिमागील बाजूस धडक दिल्याने अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनल्याने याबाबत वाहनधारक, वाहनचालक व नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने दरवर्षी मुख्य महामार्गावर जनजागृती करून 'रिफ्लेक्टर जागृती अभियान राबवले जाते.

याही वर्षी केज रोटरीच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक व भवानी चौक (धारूर चौक) येथे ६ डिसेंबर रोजी सकाळी रिफ्लेक्टर अभियान राबविण्यात आले.

याशिवाय केज विकास संघर्ष समितीच्या वतीने केज तालुका तहसीलदार व पोलीस स्टेशन यांना निवेदन देऊन रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनावर कठोर कार्यवाही करावी. केज तालुका व परिसरातील साखर कारखाना प्रशासनाला विशेष पत्र लिहून त्यांच्या कक्षेत ऊसवाहतुकीचे काम करणाऱ्या सर्व बैलगाड्या आणि वाहनांना पाठीमागून रिफ्लेक्टर फलक किंवा रिफ्लेक्टर पेपर्स स्टिकर्स सक्तीचे करावेत अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाने कार्यवाही न केल्यास जनतेच्या सहभागाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा केज विकास संघर्ष समितीने दिला आहे.

या उपक्रमात केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, प्रोजेक्ट चेअरमन असरार कुरेशी, को-चेअरमन बापुराव सिंगण, हनुमंत भोसले, सूर्यकांत चवरे, दादा जमाले पाटील, अरुण अंजाण, विजय जॅकेटिया इत्यादी रोटरी सदस्य व नागरिक सहभागी होते.

# प्रशासकीय अडचण असल्यास सरळ मला फोन करा : तहसीलदार चंद्रकांत शेळके

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ डिसेंबर**

शुक्रवार दिनांक ०६ डिसेंबर रोजी पारगाव सिरस मंडळाची मंडळ स्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली . प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला.




या बैठकीला मंडळातील नागरिक , शेतकरी , मंडळ अधिकारी , तलाठी , ग्रामसेवक , कृषी सहायक , बी एल ओ , पोलीस पाटील , स्वस्त धान्य दुकानदार , अंगणवाडी सेविका इ उपस्थित होते . सर्वप्रथम तहसीलदार शेळके यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व बैठकीस सुरुवात केली . पारगाव सिरसच्या मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ व गावकरी यांच्या वतीने शाल , श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले . बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी सांगत असतात की तहसीलदार यांनी प्रत्यक्ष गावकऱ्यांशी चर्चा करून अडचणी सोडविल्या पाहिजेत . त्यास अनुसरून शेळके यांनी बैठकीस सुरुवातीस मंडळातील उपस्थित शेतकरी , सर्वसामान्य लोकांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत तहसीलदारांनी संबंधित अधिकारी कर्मचारी यांना सूचना दिल्या . गावातच तहसीलदार यांनी स्वतः अडचणी ऐकून घेतल्या व निराकरण करण्याचा प्रयत्न केला म्हणून गावाकऱ्यांनी समाधान व्यक्त केले . त्यानंतर कृषी विभागाचे कृषी सहाय्यक यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन शेतकऱ्यांपर्यंत योजना लवकरात लवकर पोचवाव्यात , पारदर्शकपणे शेतकऱ्यांची कामे करावी अशा सूचना तहसीलदार यांनी केल्या . त्यांनतर उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा तहसीलदार शेळके यांनी घेतला . ग्रामपंचायत अधिकारी यांनी नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या पाहिजेत त्यांना सोयी सुविधा पुरविल्या पाहिजेत वसुली वेळेवर केली पाहिजे इत्यादी सूचना यावेळी दिल्या.

# मौजे सासुरा ता. केज येथे दत्त जयंती निमित्त गोकुळ उगले यांच्याकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.६ डिसेंबर**

सासुरा ता.केज येथील गोकुळ उगले यांनी स्वखर्चातून उभारलेल्या दत्त मंदिरात दत्त जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे यामध्ये दि.७-१२-२४ रोजी सकाळी रुद्राभिषेक व अखंड हवन प्रज्वलन तसेच दुपारी ५-०० वाजता श्री गुरुचरित्राचे सामूहिक पारायण संकल्प ,व पूजा दि.९-१२-२४ रोजी सकाळी १०-०० दत्तयाग व दत्तमाला मंत्राच्या आहुतीचे आयोजन केले आहे दि.१४-१२-२४ रोजी सकाळी ६-०दत्तगुरुंना अभिषेक व आरती१० ते १२ह.भ.प.श्री केशव महाराज गीते शास्त्री (एकनाथ महाराज मठ संस्थान सासुरा) यांचे सुश्राव्य कीर्तन व दुपारी १२-०० नंतर महाप्रसाद.



संध्याकाळी ६-०० दत्तगुरूंचा अवतार सोहळा, पाळणा गीत, फटाक्याची नयनरम्य आतिषबाजी व आरती संध्याकाळी ७-०० वाजता दत्त भक्तांना सेवा करत असताना आलेल्या स्व अनुभवाचे कथन, रात्री ८-०० ते ११ वेळेस गोपीचंद शास्त्री महाराज (गणेश नाथ आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था सासरा) यांचे सुश्राव्य कीर्तन होईल यादरम्यान सकाळी ७-३० ते८-०० या वेळेत दत्तप्रभू ची आरती होईल. तरी वरील कार्यक्रमास उपस्थित राहून महाप्रसादाचा व दर्शनाचा लाभ घ्यावा असे आव्हान गोकुळ उगले व परिवार सासुरा त्यांनी केले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही प्रेरणादायी-प्रकाश दुगड

## सिद्धेश्वर महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ डिसेंबर**

डॉ.बाबाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही प्रेरणादायी असुन महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने महाविद्यालयात रक्तदान शिबिर हा उपक्रम स्तुत्य आहे असे मत भाशिप्र संस्थेचे केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड यांनी वक्त केले.



महापरिनिर्वाण दिनानिमित्त सिद्धेश्वर महाविद्यालय व एच.डी.एफ.सी. बँक यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ते बोलत होते. यावेळी एच.डी.एफ.सी. बँकेचे आशिष शर्मा, प्राचार्य सुहास मोराळे, कार्यवाह विश्वास जोशी, अभय कोकड, स्था. अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांची उपस्थिती होती. महाविद्यालयात रक्तदान शिबीर उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अनोख्या पदतीने त्यांना विनम्र अभिवादन केले जाते असे प्राचार्य सुहास मोराळे यांनी सांगितले. प्रास्ताविक डॉ. सुनील पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. गवते यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना यांनी मानले. या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील प्राध्यापक आणि अनेक विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. उपप्राचार्य प्रा.अंकुश साबळे, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, प्राध्यापक कर्मचारी,एच. डी. एफ.सी. बँकेचे मॅनेजर प्रसाद देशमुख,उपशाखा अधिकारी आशिष शर्मा, भक्ती साडेगावकर, आरती माळी, नागेश थावरे, अभिजित देशमुख तसेच जीवनदायी ब्लड सेंटर बीडचे बाळू पवार व कर्मचारी स्टाफ उपस्थित होता.

# देश का प्रकृती परीक्षण अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे-डॉ.विजय कट्टे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ डिसेंबर**

भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग दिल्ली व आयुष मंत्रालय भारत सरकार यांच्या आदेशानुसार देश का प्रकृती परीक्षण अभियान दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ ते २५ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये राबवण्यात येत आहे या अभियानांतर्गत प.पु.गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे कॉलेज माजलगाव येथील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ६/१२/२०२४ रोजी ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे भेट देऊन रुग्ण तसेच इतर व्यक्तीची प्रकृती परीक्षण केले रुग्णालय अधीक्षक डॉ.विजय कट्टे यांनी प्रकृती परीक्षण करून या अभियानाची सुरुवात केली लोकांच्या प्रकृतीनुसार त्यांच्या शरीरासाठी आवश्यक अशी दिनचर्या व आरोग्य सल्ले लोकांना या अभियानाद्वारे माहित होणार असल्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी प्रकृती परीक्षण करून घ्यावे व आरोग्या विषयी जनजागृती व्हावी यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.विजय कट्टे यांनी केले



यावेळी डॉ.रुद्रावर साहेब महाविद्यालयाचे डॉ.चव्हाण डॉ.लुगडे उपस्थित होते.

# संविधानाचे पालन करणे हीच खरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली-पो.नि.सुर्यतळ

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ डिसेंबर**

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला राज्यघटना व कायदा दिला आहे. समाज बांधवांनी संविधान व कायद्याचे पालन करून आपले जिवन जगावे हीच खरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली असेल असे प्रतिपादन शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त श्रावस्ती बुध्द विहार येथे बोलताना व्यक्त केले.



काल ६ डिसेंबर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन येथील श्रावस्ती बुध्द विहार येथे सद्धम सेवा संघाने आयोजित केला होता. कार्यक्रमाला पो.नि राहुल सुर्यतळ यांच्या हस्ते महामानव च्या प्रतिमेचे पूजन करून बौद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ म्हणाले की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपणाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार घटनेने व कायद्याने दिला आहे सर्व समाज आज बाबासाहेब मुळे अतिशय चांगले जीवन जगत आहे. मी त्यांच्या मुळेच या पदावर आहे.समाजातील मुला, मुलींने उच्चशिक्षित होवून अधिकारी झाले पाहिजे तशी व्यवस्था राज्यघटनेत करुन ठेवली आहे त्याचा फायदा शिक्षण घेऊन केला पाहिजे. तसेच आपण राज्यघटनेचे व कायद्याचे पालन करुन जिवन जगणे हीच खरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आज च्या दिनी खरी आदरांजली असेल असे प्रतिपादन पोनि राहुल सुर्यतळ यांनी केले.

यावेळी मकसरे मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले तर जि.एन.घनघाव सर यांनी शौक गीत गायले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष भालेराव सर यांनी केले तर सुत्रसंचलन दशरथ मकसरे यांनी केले. आभार प्रदर्शन शिनगारे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पत्रकार रविकांत उघडे,बळीबा चांदमारे सर,सोपान उजगरे, यादी परिश्रम घेतले कार्यक्रमाला बहुसंख्येने बौध्द उपासक, उपासींका उपस्थित होत्या

# कलश सिड्स कंपनीकडून ग्रामपंचायतीच्या सार्वजनीक विहीरीजवळ दुसरी विहीर खोदण्याचा प्रयत्न; गावकऱ्यांचा तिव्र विरोध

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील गोलापांगरी येथील गावकर्यांना पाणी पुरवठा करणार्या सार्वजनिक विहीरीजवळ कलश या खाजगी कंपनीने विहीर खोदून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताला बाधा निर्माण केल्याने गावकर्यांनी त्या विहीरीला तिव्र विरोध केलाय. त्यामुळे गावकर्यांनी गुरुवार दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता निवासी उप जिल्हाधिकारी यांना निवेदन दिलंय.

गोलापांगरी येथील गावकर्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी एक सार्वजनी विहीर असून त्या विहीरी शेजारीच कशल सिड्स या खाजगी कंपनीने शेतजमीन खरेदी करुन त्यात विहीर खोदण्यास सुरुवात केली. त्या विहीरीमुळे सार्वजनीक



विहीरीच्या पाण्यावर परिणाम होत असल्याचे गावकर्यांनी म्हटलंय. सदरील विहीरीचे काम थांबविण्यात यावे यासाठी ग्रामपंचायतीने विरोध केला असून जिल्हा प्रशासनाला या पुर्वीच पत्र दिले होते. तरीही कंपनीकडून विहीर खोदण्याचा प्रयत्न सुरुच आहे. कलश सिड्स कंपनीने ग्रामपंचायत आणि गावकर्यांनाही जुमानले नसल्याचे तक्रारीत म्हटलंय. कलश सिड्स कंपनीने विहीर खोदून गावकर्यांच्या पिण्याच्या पाण्यास बाधा निर्माण केल्याने ग्रामपंचायत आणि गावकर्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून खाजगी कंपनीच्या विहीरीचे काम रोखण्याची मागणी केली.

यावेळी सरपंच आसराबाई खडेकर, संतोष खडेकर, विनोद खरात, मन्सुर पठाण, अरुण जाधव, रामेश्वर जर्हाड, रुपेश उमप, अन्वर शेख यांच्यासह महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### भोकरदन येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महपरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवारी ६ डिसेंबर रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

सकाळी १० वाजेच्या सुमारास सिल्लोड रोड वरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास प. पूज्य बो. डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, सम्राट अशोक नवयुवक मित्रमंडळ, सुजाता महिला मंडळच्या वतीने संयुक्तपणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रथम सामूहिक त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले तसेच सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी स्मारक समितीचे सर्वेसर्वा सचिन पारखे, सम्राट अशोक नवयुवक मित्रमंडळाचे प्रदीप जोगदंडे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष विशाल मिसाळ, वंचितचे युवा नेते मंगेश पगारे, पत्रकार सुरेश बनकर, पत्रकार कमलकिशोर जोगदंडे, पत्रकार युवराज पगारे,शामराव दांडगे,शेख नजीर,अनिल देशपांडे,रोहित पारखे ,सिद्धार्थ काळे,रमेश बिरारे,रवि मोरे,भगवान बोर्डे,पोपट जोगदंडे,मंगलदीप पगारे,प्रभाकर दाभाडे,उत्तम पालवे,अशोक बनकर,सिद्धार्थ सोनवणे,संजय इंगळे, सुमित जाधव, कैलास जाधव यांच्या सह बौद्ध उपासक-उपासिका,समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### इब्राहिमपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महपरिनिर्वाण दिनानिमित्त दिनांक ६ डिसेंबर शुक्रवार रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी सकाळी नऊ वाजता बुद्ध उपासक व उपाशीका व समाज बांधवांच्या वतीने विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, यावेळी प्रथम सामूहिक त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले तसेच सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी झालेल्या कार्यक्रमास दिलीप साळवे, उत्तम सोनावणे,शंकर पगारे, पत्रकार युवराज पगारे, अनिल पगारे, साहेबराव पगारे,भीमराव पगारे,रोहित पगारे,संजय पगारे , सचिन पगारे, राजू पगारे,अमोल पगारे विजय हिवराळे विकास पगारे, काकासाहेब पगारे, साहेबराव पगारे, धनु पगारे,प्रकाश पगारे यांच्या सह बौद्ध उपासक-उपासिका,समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### सुखलालजी कुंकलोळ यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

येथील प्रतिष्ठीत तथा ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी सुखलालजी फत्तेलालजी कुंकलोळ (जैन) यांचे आज संथारा निधन झाले. ते ८९ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, कचरुलाल व कुशल ही दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी सुखलालजी कुंकलोळ (जैन) यांच्या निधनाचे वृत्त कळताच जिल्हाधिकारी कार्यालयातील रिता मेत्रेवार आणि तहसीलदार छाया पवार यांनी त्यांच्या निवासस्थानी येऊन त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. श्री. सुखलालजी जैन यांनी स्वातंत्र्य सैनिक, श्री स्थानकवासी जैन श्रावक संघ, गुरु गणेश अंध विद्यालय. भारत स्काऊट गाईड, रेड स्वस्तिक सोसायटीसह अनेक पदावर पदाधिकारी राहिलेल्या सुखलालजी जैन समाजाचे मोठे योगदान राहिलेले आहे. आज मंगळवारी सकाळी ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी सुखलालजी कुंकलोळ (जैन) यांची अंत्ययात्रा निघाली त्यावेळी राजकीय, पत्रकार, वकील, डॉक्टरांसह विविध स्तरातील नामवंताबरोबरच सामान्य नागरीकांची देखील मोठी उपस्थिती होती. श्री. सुखलालजी जैन यांच्या निधनाबद्दल सर्वस्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## उद्यानपंडित अभयकुमार काळुंके मिलेनिअर फार्मर ऑफ इंडिया २०२४ या पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

भारतीय कृषी संशोधन परिषद ,पुसा व कृषी जागरण यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली येथे सोमवारी (ता.२) आयोजित तीन दिवसीय सोहळ्यामध्ये अभय नर्सरी व छत्रपती हॉर्टिकल्चर नर्सरी चे सर्वेसर्वा उद्यानपंडित अभयकुमार बाजीराव काळुंके यांना मिलेनिअर फार्मर ऑफ इंडिया २०२४ या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सोहळा माननीय केंद्रीय कृषी राज्यमंत्री भागीरथ चौधरी, केंद्रीय मंत्री रस्ते विकास आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी , भारतीय कृषी संशोधन परिषदेचे डायरेक्ट व प्रमुख शास्त्रज्ञ यांच्या उपस्थितीत १ते ३ डिसेंबर रोजी पार पडला.

तीन दिवसीय ग्लोबल फार्मर्स बिझनेस नेटवर्क व इंडियन कौन्सिल ऑफ ग्रीकल्चर रिसर्च ग्राउंड पुसा नवी दिल्ली येथे हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी फळपीक उत्पादन व रोपवाटिका क्षेत्रात केलेल्या



उल्लेखनीय कार्याबद्दल काळुंके यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी भारतासह जगभरातील शास्त्रज्ञ, प्रगतशील शेतकरी, जगभरातील लोकप्रतिनिधी, विविध कंपन्यांचे सीईओ उपस्थित होते. उद्यान पंडित अभयकुमार काळुंके यांना हा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

## सपोनि.आशिष खांडेकर यांचा जिल्हा पोलिस अधिक्षकांनी केला गौरव

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक सन – २०२४ च्या अनुषंगाने गोंदी पोलीस ठाणे हद्दीमध्ये आपण व आपल्या अधिपत्याखालील अधिकारी, अंमलदार यांनी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध जुगार - ०४ मध्ये एकुण २२,४९० /- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त, अवैध दारुबंदी १९ केसेस करुन १५,६९५ /- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त, अवैध गुटखा - ०२ केसेस करुन १२,३३० /- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त, आर्म अॅक्ट - ०१ मध्ये २,०००/- रु किंमतीची तलवार जप्त, ०२ पाहीजे आरोपी शोधुन कमी केले. अवैध वाळू उपशा-०७ केसेस करुन ६४,२५,०००/- (६ ट्रॅक्टर ६ लोखंडी केनी + ०१ हायवा व ५ ब्रास वाळु ) अं. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. ड्ब्ढ पॉईट शहगड ०१ कारवाई एकुण जप्त मुद्देमाल १,८८,००० /- रु रोख रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. एकत्रीत प्रतिबंधात्मक कार्यवाही एकुण ८४ केलेल्या आहेत. याप्रमाणे कार्यवाही करुन आपले कर्तव्य चोख पणे पार पाडुन लोकशाहीच्या सार्वत्रिक उत्सवात आपला उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवुन त्यांनी बहुमोल योगदान दिले आहे. तसेच आपल्या पोलीस स्टेशन हद्दी मध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु दिला नाही. आपण व आपल्या अधिपत्याखालील अधिकारी, अंमलदार यांच्या अथक परिश्रमा मुळे जालना जिल्हयातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुक सन-२०२४ शांततेत पार पाडण्यास मोठा हातभार लागलेला आहे. आपण केलेल्या कामगिरीचा जालना पोलीस दलास अतिशय आनंद आणि अभिमान आहे. याबाबत आपले व आपले अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांचे मनपूर्वक अभिनंदन आपण भविष्यात देखील पोलीस दलात अशाच प्रकारची उल्लेखनिय कामगिरी करुन पोलीस दलाची प्रतिमा उज्वल करावी म्हणून आपणास हे प्रशस्तीपत्र देवून स.पो.नि.आशिष खांडेकर यांचा जिल्हा पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांच हस्ते गौरविण्यात आले. यावेळी अप्पर पोलिस अधिक्षक आयुष नोपानी यांच्या पोलिस दलातील कर्मचारी उपस्थित होते.

## भीम आर्मीच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन एक वही, एक पेन वाटप करुन अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरात भीम आर्मी भोकरदन तालुका कमिटी तर्फे ९ वर्षा पासुन एक वही एक पेन शाल्य विद्यार्थी यांना ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी व शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पित करुण जि प प्राथमिक शाळा नवे भोकरदन व जि प प्रशाल उर्दू नवे भोकरदन येथे एक वही एक पेन वाटप करण्यात आला.

यावेळी भीम आर्मी भोकरदन तालुका प्रमुख समाज भुषण अनिलभाऊ पगारे, जेष्ठ वक्ते मार्गदर्शन माजी नगरसेवक श्रावण कुमार आक्से,आम आदमी पार्टी चे शहर अध्यक्ष महेजाद भाई, फारुक भाई,पंडित बिरसोनेशहर अध्यक्ष,साबेर शेख,योगेश आरके,शब्बीर मंसुरी तालुका संघटक,सुखदेव साळवे,कूष्णा साळवे, शोयेब भाई,अमान भाई,विलास नाड़े,काझी भाई,गाझी भाई, वाजिद भाई,जमिल भाई कादरी,विलास हिवाळे,बाबर भाई,मुदस्सिर शेख़, हाफिज बिलाल,मियां भाई,फोरोज पठान,रोहित सुरडकर शाखा अध्यक्ष जैनपुर कोठारा,कृष्णा अशोक सुरडकर शाखा उपाध्यक्ष, जनार्दन सोलुके आप तालुका अध्यक्ष, योगेश जाधव,दिपक राऊत,राजू जाईबाहर,हरीभाऊ राहूल सुरडकर,गणेश सुरडकर,रमेश सुरडकर,दिपक सुरडकर,विनोद राऊत,विकास राऊत,रावसाहेब राऊत,प्रकाश सुरडकर ,समाधान सुरडकर,साईनाथ सुरडकर,अमोल सुरडकर ,मिलिंद सुरडकर,स्वप्नील सुरडकर,वैभव सुरडकर,गौरव सुरडकर,रितेश सुरडकर,अमोल सुरडकर,बाबासाहेब सुरडकर,किरण सुरडकर,भीमराव सुरडकर,राजू सुरडकर,समाधान सुरडकर,पियूष सुरडकर,सुजित सुरडकरसह व समाजिक कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त भाजपाच्या वतीने अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस भारतीय जनता पार्टी, जालनाच्या वतीने भाजपा जिल्हा कार्यालय व मस्तगड येथे भाजपा जालना महानगराध्यक्ष सतीष जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत विनम्र अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी महान-गराध्यक्ष सतीष जाधव म्हणाले की, भारतातील असमानतेच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे भरीव योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. सर्वांना शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात यासाठी सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा त्यांच्या साहित्य, कार्य आणि संविधानरुपात संपूर्ण देश जपतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही जगण्याच्या एक नवा दृष्टिकोन व दिशा देतात. आजच्या महापरिनिर्वाणदिनी या ज्ञानसूर्यास कोटी कोटी वंदन. याप्रसंगी भाजपा जालना महानगराध्यक्ष सतीष जाधव, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, सिद्धेश्वर हजबे, महेश निकम, सुनील पवार, सुभाष सले, सुमीत सुरडकर, रामलाल जाधव, राजू गवई, अभिजित अंभोरे, शरद सोनुने, जगदीश येनगुपटला, सागर वाहुळकर, स्वीय सहायक गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी, मुकेश राठोड, महेश मुळे, मदन गवारे, कैलास सोळुंके, गोवर्धन उबाळे, शाम उगले, गोविंद चौरे, लक्ष्मण वर्मा, विठ्ठल नरवडे, व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मत्स्योदरी मंदिर डोंगराच्या पथमार्गात अडथळा आणल्यास होणार कारवाई

### तहसीलदार चव्हाण यांचा इशारा; कामाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड पथ मार्गाची पाहणी करताना संस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार विजय चव्हाण, नायब तहसीलदार महेंद्र गिरगे, गीता विलास कुंठेफळकर येथील श्री मत्स्योदरी देवी मंदिराच्या संपूर्ण डोंगराच्या पथ मार्गाचे काम २० नोव्हेंबरपासून सुरु करण्यात आले आहे. डोंगराच्या पाठीमागील नगरपालिकेच्या अग्निशामक दलापर्यंत या पथमार्गाचे खोदकामही झाले आहे. परंतु, डोंगराच्या पाठीमागच्या बाजूला काही अतिक्रमणधारकांनी सदर काम अडविले आहे. त्यामुळे या कामात अडथळा आणणाऱ्यांवर कारवाई करून पो-लीस बंदोबस्तात अतिक्रमण काढण्यात येईल तसेच सरकारी कामात अडथळा आणल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा संस्थानचे अध्यक्ष तथा तहसिलदार विजय चव्हाण यांनी दिला आहे. देवी मंदिराच्या संपूर्ण डोंगराच्या पथ मार्गाचे काम झाल्यास संबंधित अतिक्रमण धारकाचे म्हणणे आहे की, तुमचा हा पथ मार्ग झाल्यास आमच्या घरात पाणी जाईल. त्याचप्रमाणे काही अतिक्रमण धारकांचे घर असल्यामुळे त्यांनी या पथमार्गाचे काम बंद केले आहे. या बाबतची माहिती देवी संस्थानचे अध्यक्ष तथा तहसिलदार विजय चव्हाण आणि संस्थान सचिव तथा नायब तहसीलदार महेंद्र गिरगे यांना कळली असता, त्यांनी मंगळवारी मंदिराच्या संपूर्ण डोंगराला प्रदक्षिणा घातली. यावेळी सदर बाब त्यांच्या निदर्शनास आली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष तथा तहसिलदार विजय चव्हाण यांनी जे अतिक्रमण धारक या पथ मार्गाच्या कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न करतील, त्यांच्यावर कारवाई करून पोलीस बंदोबस्तात संबंधित अतिक्रमण काढण्यात येईल. त्याचप्रमाणे सरकारी कामात अडथळा आणल्यास त्यावरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अतिक्रमण धारकाकडे जागेच्या मालकीबाबत काही रेकॉर्ड असल्यास त्यांनी ते तहसील कार्यालयात दाखल करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी संस्थानचे सचिव तथा नायब तहसीलदार महेंद्र गिरगे, संस्थान विश्वस्त पुजारी गीता विलास कुंठेफळकर, संस्थानचे व्यवस्थापक कैलास शिंदे व संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

### आ.बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून परतूर विधानसभा मतदारसंघात रमाई आवास योजनेतून २१६० घरकुल होणार मंजूर

## रमाई आवास योजने करिता पात्र असलेला एकही लाभार्थी सदरील योजनेपासून वंचित राहू नये -आ.बबनराव लोणीकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या बेघर व्यक्तींना निवारा उपलब्ध व्हावा या हेतूने रमाई आवास योजना (ग्रामीण) ही महत्त्वकांक्षी योजना महाराष्ट्र राज्यभरात राज्य सरकार राबवत आहे. या योजनेच्या लाभापासून एकही लाभार्थी वंचित राहणार नाही यांची दक्षता म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतूर विधानसभा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी मंठा परतूर व तहसील कार्यालयात आढावा बैठकी घेऊन परतूर विधानसभा मतदार संघातील मंठा परतूर व जालना तालुक्यातील मंठा परतूर व जालना या तिन्ही पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांसह गाव-गावातील ग्रामसेवकांना सूचना देऊन आपापल्या गावातील प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले होते. या बाबतीत जिल्हाधिकारी जालना यांच्या जालनातही आढावा बैठक घेऊन संबंधित योजना जिल्हाभरात अतिशय प्रभावीपणे राबविण्याकरिता याबाबतचा शासनाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याचा आग्रह आमदार लोणीकर यांनी धरला होता. आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नाने रमाई आवास योजनेतल्या मंजूर उद्दिष्टांपैकी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे जालना तालुक्यातील नेर सेवली सर्कल मधील १२० मंठा तालुक्यातील ८४० तर परतूर तालुक्यातील १२०० रमाई आवास योजनेतील घरकुलाची मागणी करण्यात आली होती. झालेल्या सदर मागणीप्रमाणे उद्दिष्ट मंजूर करण्यात आली असल्याची माहिती. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यालयातून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात दिली आहे. रमाई आवास योजने करिता पात्र असलेला परतुर विधानसभा मतदारसंघातील कोणीही लाभार्थी सदरील योजनेप-ासून वंचित राहू नये. याकरिता गावागावातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वतः लक्ष घालून ग्रामसभा घेऊन पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याचे आवाहन देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com





नांदेड- विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमीत्त त्यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी अनूयायांची गर्दी झाली होती. (छाया करणसिंग बैस)

सचखंड गुरुद्वारा येथील सोने दागिने वितळण्याचे प्रकरण

# उच्च न्यायालयाची राज्य शासनाला १८ डिसेंबरची मुदत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ डिसेंबर**

सचखंड गुरुद्वारामधील सोन्या-चांदीचे दागिने वितळवून मोठा भ्रष्टाचार केल्याच्या आरोपा संदर्भातील याचिकेबाबत चौकशीचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्यासाठी राज्याचे महसूल सचिव आणि नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांना छ.संभाजीनगर खंडपीठाने दि.१८ डिसेंबर २०२४ पर्यंत शेवटची संधी दिली असल्याची माहिती याचिकाकर्ते रणजीतसिंघ गिल व राजिंदरसिंघ पुजारी यांनी दिली आहे.

सदर याचिकेवर मंगळवार दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी सुनावणी झाली असता सरकारी वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, खंडपीठाचे न्या. मंगेश पाटील व न्या. प्रफूल्ल खुबाळकर यांच्या खंडपीठाने दोन्ही आदेश दिले होते. परंतू आदेशाच्या अंमलबजावणीसाठी वेळ वाढवून देण्याची विनंती केली होती. गुरुद्वारा येथील सन १९७१ ते २०२० दरम्यान दानाच्या माध्यमातून मिळालेल्या सोन्या-चांदीच्या सुमारे ९४ किलो वजनाचे दागिने वितळून बिस्कीट तयार करण्याचे काम गुरुद्वारा बोडचे तत्कालीन सचिव रवींद्रसिंघ बुंगई यांनी शासनाची परवानगी न घेता सारंग ज्वेलर्सचे मालक संतोष वर्मा यांना दिले होते. त्यांनी शुद्ध सोन्या - चांदीऐवजी ५० किलो भेसळयुक्त सोन्या चांदी दिल्या असल्याचा आरोप आहे

रणजितसिंघ गिल व राजिंदरद्रसिंघ पुजारी यांनी याबाबत दाखल केलेल्या याचिकेत सचखंड गुरुद्वारा येथे दरवर्षी जगभरातून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. श्रद्धेपोटी भाविक गुरुद्वाराला हिरे, मोती, सोने आणि चांदीचे दागिने भेट स्वरूपात दान करतात. सदर दागिने वितळून शुद्ध सोन्या-चांदीऐवजी भेसळयुक्त सोन्या-चांदीची बिस्किटे तयार करून मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप याचिकेत केला आहे. तत्कालीन प्रशासक डॉ. परविंदरसिंघ पसरिचा यांनी दखल घेऊन राज्य शासनाला याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली होती. याचिकाकर्त्यांची बाजू ॲड. शेख वासिफ सलीम' यांनी मांडली.

## संक्षिप्त वृत्त

### ह .भ प प्रशांत महाराज खानापूरकर यांचे आज शेलगावात कीर्तन



**उमरी**-महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप प्रशांत महाराज खानापूरकर यांचे उमरी तालुक्यातील शेलगाव येथे दिनांक सात डिसेंबर रोज शनिवारी रात्री ८ ते ११ या वेळात हरीकिर्तन होणार आहे. उमरी तालुक्यातील शेलगाव येथे श्री महारुद्र हनुमान, श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री गणेश, श्री महादेव मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून गेल्या तीन दिवसापासून सुप्रसिद्ध भागवत कथाकार केशव महाराज उखळीकर यांची श्रीमद् भागवत कथा होत आहे. दरम्यान आयोजित किर्तन महोत्सव आयोजित करण्यात आले असून शनिवारची कीर्तन सेवा हभप प्रशांत महाराज खानापूरकर यांची असल्याने या कीर्तनाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन शेलगाव येथील संयोजक मंडळीच्या वतीने करण्यात आले आहे.

### सिडकोत महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**नवीन नांदेड**-महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सिडको हाडकोत ठिक ठिकानच्या बुद्ध विहारात दिनांक ६ डिसेंबर रोजी पंती ज्योती रॅलीसह विविध उपक्रमांद्वारे अभिवादन करण्यात आले. सिडको हाडको परिसरातील सर्वच बुद्ध विहारात महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त पुष्पहार अर्पण व मेणबत्ती प्रज्वलित करून तसेच समाज बांधवांच्या वतीने सायंकाळी पंती ज्योती रॅली काढून महामानस अभिवादन करण्यात आले्.आज रोजी नंदिग्राम बुद्ध विहार, नागलोक बुद्ध विहार, नालंदा बुद्ध विहार, त्रिशरण बुद्ध विहार, जेतवन बुद्ध विहार, प्रबुद्ध बुद्ध विहार, दीक्षा बुद्ध विहार, चंद्रमुनी बुद्ध विहार, रमाई बुद्ध विहार,पंचशील बुद्ध विहार, त्रिरत्न बुद्ध विहार ,श्रावस्ती बुद्ध विहार, विश्वशांती बुद्ध विहार, कुशीनारा बुद्ध विहार, सम्राट बुद्ध विहार, सुभेदार रामजी आंबेडकर बुद्ध विहार इत्यादी बुद्ध विहारावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व मेणबत्ती प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सिडको हडको परिसरातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचवेळी सायंकाळी सिडको हडको येथील प्रमुख रस्त्याने पंती ज्योती रॅली काढून महामानवास अभिवादन करण्यात आले. या पंती ज्योती रॅलीत बालक ,बालीकासह महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### जि. प. कें. प्रा. शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**माहूर**-येथील जि. प. च्या के. प्रा.शाळेत दि.६ डिसें.रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र आदरांजली वाहण्यात आली.यावेळी शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अपील बेलखोडे,वसंत कपाटे,नंदकुमार जोशी, विजय आमले, संजय बनसोडे यांची उपस्थिती होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्राची कुळकर्णी, श्रेया एडतकर,अपेक्षा भरणे,सलोनी दूधकावले, राजलक्ष्मी दुधे, विद्या वर्मा, शौर्य बनसोड या विद्यार्थ्यांसह ये.आर. गोलहर,मुख्याध्यापक संजय वाठोरे व नंदकुमार जोशी यांनी आपल्या मनोगतातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला.यावेळी के. बी. कदम, डी. पी.उघडे, एस. के.देशपांडे, म.मुजळोद्दिन मुजफरोद्दिन एल. पी.कुळकर्णी, एम. एस.मानकर या शिक्षकांसह विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक डी. पी.उघडे यांनी सूत्रसंचलन एम. एस.मानकर यांनी केले. देशपांडे यांनी आभार मानले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०६ डिसेंबर**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लोहा शहरात ठिकठिकाणी अनेक संस्था, संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त लोहा शहरातील मध्यवर्ती बसस्थानक लगत क्रांतीसुर्य बुद्ध विहारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अनेक मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रारंभी त्रिशरण पंचशील व बुद्ध पूजापाठ विधी भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष बापूसाहेब कापुरे, जिल्हा पर्यटन सचिव रत्नाकर महाबळे, महासभेचे केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभुरे यांनी घेतला. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी लोहा शहर तसेच तालुक्यातील आंबेडकरी अनुयायांनी गर्दी केली होती. यावेळी पुतळा समितीच्या अध्यक्षा पुष्पलता कापुरे, माजी नगराध्यक्षा त्रिशलाबाई कांबळे, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, सामाजिक कार्यकर्ता बालाजी खिल्लारे, ई. जे. बनसोडे, व्ही. के. कांबळे, वाय. बी. महाबळे, नगरसेवक पंचशील कांबळे, पोलिस पाटील श्रीरंग महाबळे, संभाजी कापुरे, स्वच्छ्तादुत राजीव तिडके, अरपीआय चे तालुकाध्यक्ष सुरेश महाबळे, काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष डी. एन. कांबळे, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पवार, नगरसेवक प्रतिनिधी केतन खिल्लारे, लक्ष्मणराव महाबळे, रवी कापुरे, भिमकिर्तीराज कलांबरकर, दिलीप धुतमल, संजय भोळे सह महिलांची बहुसंख्येने उपस्थितीती होती. याप्रसंगी पोलिस ठाण्याचे अधिकारी सुभाष पाटील नेवाळे आणि पोलिस कर्मचारी सदाशिव जामकर, प्रदीप शेंबाळे यांनीही बाबासाहेबाना अभिवादन केले.

# खुनाच्या खटल्यातील सात आरोपींची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०६ डिसेंबर**

तालुक्यातील मौजे बदकलवाडी येथे २ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या हत्या प्रकरणातील सात आरोपींना नांदेड जिल्हा सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. सदरील खटला सहा वर्षे चालला होता.

मुदखेड पोलिस ठाण्यात भादंवि कलम ३०२, ४५२, १४३, १४७, १४८, १४९, ५०६, ५०४ तसेच हत्यार कायदा ४/२५ अंतर्गत गुन्हा नोंदवून सात आरोपींना अटक करण्यात आली होती. या खटल्यात सरकारी पक्षाने १३ साक्षीदार तपासले, मात्र आरोपींविरुद्ध कोणताही सबळ पुरावा सादर करण्यात अपयश आले. पुराव्याअभावी गुन्हा सिद्ध न झाल्याने जिल्हा सत्र न्यायाधीश-१ यांनी ३ डिसेंबर २०२४ रोजी सातही आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

खटल्याचा महत्त्वाचा भाग म्हणजे आरोपींचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाने देखील नामंजूर केला होता. त्यामुळे सर्व आरोपींचा खटला कारागृहातून (अंडर ट्रायल) चालला. आरोपिंची बाजू ऍड. माधव हटकर व ॲड. नितीन सोनकांबळे यांनी प्रभावीपणे मांडली. त्यांना ॲड के.ए. पंडित, ॲड एस.एन. इजळीकर, ॲड ए.एम. भुरे, ॲड सुबोध कोकरे, ॲड व्ही.एस. गरजे, आणि ॲड तेजस्विनी मुंगल यांनी सहकार्य केले. सरकारी पक्षाचे सर्व आरोप फेटाळून लावत त्यांनी आरोपी निर्दोष असल्याचे सिद्ध केले.

# किनवट-माहूरचे औद्योगिक मागासलेपण दूर करण्यासाठी आ. भिमराव केराम यांना मंत्रिपदाच्या लाल दिव्याची गरज!

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि.०६ डिसेंबर**

गत पंचवार्षिक कालावधीत भाजपाचे आमदार भीमराव केराम यांनी केवळ आमदार एवढीच ओळख असूनही मुंबई दरबारी आपले राजकीय वजन वापरून तब्बल २५०० कोटी रुपयांचा निधी खेचून आणत अभूतपूर्व अशी विकासकामे केली.परंतू,या दोन्ही तालुक्याची मागासलेपणाची दुर्दैवी ओळख पुसण्यासाठी ती पुरेशी ठरणारी नसून,मुख्यत्वे या भागाचे औद्योगिक मागासलेपण कायमच असल्याने ते दूर करण्यासाठी राज्याचे नुतन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केराम यांच्या आमदार या बिरुदावलीचे आता नामदार मध्ये रुपांतर करण्याची खरी गरज व हिच योग्य वेळ आहे. किनवट माहूर या आदिवासी बहुल तालुक्याचा सर्वांगीण विकास करुन चेहरामोहरा बदलण्यासाठी या भागास लालबत्तीची गरज असून,अधिक राजकीय अधिकार अधिक आर्थिक बळ प्राप्तीसाठी मंत्रीमंडळात एखाद्या खात्याचे मंत्रीपदी वर्णी लावण्याची मागणी विधानसभा निवडणुकीत भीमराव केराम यांना निवडून आणण्यास झटलेल्या प्रमुख शिलेदारांपैकी विजयाचे एक मुख्य मुख शिलेदार ठरलेले भाजपाचे नगरसेवक गोपू उर्फ सागर महामुने यांनी दै.तरुण भारतच्या माध्यमातून केली आहे.

किनवट विधानसभा मतदारसंघ - ८३ हा महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या २८८ मतदारसंघांपैकी एक आहे. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश, २००८ नुसार केलेल्या मतदारसंघांच्या रचनेनुसार, किनवट मतदारसंघात नांदेड जिल्ह्यातील माहूर आणि किनवट या दोन तालुक्यांचा समावेश होतो. किनवट हा विधानसभा मतदारसंघ हिंगोली लोकसभा मतदारसंघात मोडतो. प्रशासकीय दृष्ट्या जिल्हास्थळ आणि रचनेनुसार लोकसभा मतदारसंघ वेगवेगळे असल्याने समन्वयाच्या अभाव व प्रचंड राजकीय अनास्थेमुळे मागील वीस वर्षात किनवट/ माहूर तालुक्याचा व्हायला पाहिजे होता तसा विकास झालेला नव्हता. परंतु,गत पंचवार्षिक कालावधीत भाजपाचे आमदार भीमराव केराम यांनी मुंबई दरबारी आपले राजकीय वजन वापरून तब्बल २५०० कोटी रुपयांचा निधी खेचून आणत अभूतपूर्व अशी विकासकामे केली.

ज्यामध्ये किनवट आणि माहूर तालुक्यातील ग्रामीण भागातील खेडे गावचे रस्ते राष्ट्रीय महामार्गाला जोडने, शेतकऱ्यांच्या अर्थिक उन्नतीसाठी मनिरामखेड जलाशयातून कुपनलीकेद्वारे शेती सिंचनाचे स्त्रोत, उच्च पातळी बंधारे, व्यवसाय व व्यापार वाढीसाठी दळणवळणाची सुविधा म्हणून विदर्भ-मराठवाडा जोडणारे रस्ते, पैनगंगा नदीवर पुल बांधकाम, माहूर शहराचा ज्वलंत पाणी पुरवठा कायम निकाली काढण्यासाठी धनोडा येथे २२२ कोटी रुपयांचा उच्च पातळी बंधारा, पैनगंगा नदीकाठावर भाविकांसाठी स्नान घाट,गडावर जाण्यासाठी प्रशस्त रस्ते, अनेक ठिकाणी ,आदी विविध विकास कामे आ.केराम यांनी आपल्या २०१९ ते २०२४ च्या कार्यकाळात मार्गी लावली आहे.

किनवट विधानसभा मतदार संघ हा मराठवाड्यातील सर्वाधिक वनक्षेत्र असलेला हा मतदारसंघ आहे.येथे नैसर्गिक साधन संपत्ती विपुल प्रमाणात उपलब्ध असली तरी, त्या मानाने भागाचा विकास झालेला नाही. जिल्हा मुख्यालयापासून जवळपास २०० किलोमीटर लांब असल्याने स्थानिक प्रशासनाच्या दृष्टीनेही हा भाग दुर्लक्षित राहिला. जंगलांचीही अपरिमित हानी झाली. किनवटला उपजिल्हा रुग्णालय असले तरी किनवटसह माहूर तालुक्यातील गंभीर अत्यवस्थ रुग्णांना यवतमाळ किंवा आदिलाबादला हलवावे लागते. माहूर हे राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ जागृत पीठ असल्याने येथे दैनंदिन हजारो व वार्षिक लाखोंच्या संख्येने देवदर्शनाला येणाऱ्या भाविकांना व पर्यटकांना राहण्यासाठी निवासाच्या व्यवस्था नाहीत. लालूप्रसाद यादव यांनी माहूर-किनवट या रेल्वे मार्गाला मान्यता दिली. परंतु तो कागदावरच आहे. या भागाचे औद्योगिक मागासलेपण कायमच असल्याने,या भागातील बेरोजगार तरुणांना रोजगारासाठी शेजारच्या तेलंगणा राज्यात जावे लागते.शेती हाच मुख्य व्यवसाय आहे मात्र सिंचनाच्या मुबलक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निर्माण केला जाणारा निम्न पैनगंगा धरण शासन-प्रशासन विरुद्ध प्रकल्प बाधित नागरिक व शेतकरी उभे ठाकल्याने तीस वर्षांपासून अधांतरी लटकलेल्या अवस्थेत आहे. तर उच्च शिक्षणासाठी कोणत्याही सोई सुविधा याठिकाणी उपलब्ध नसल्याने गोरगरीब विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थिती अभावी उच्च शिक्षणाला मुकावे लागते.

# चार वर्षांपासून विश्रामगृहाचे बांधकाम अर्धवट

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. ०६ डिसेंबर**

तालुक्याचा दर्जा असलेल्या हिमायतनगर शहरांमध्ये अनेक महत्त्वाच्या शासकीय इमारतीचे पुनर्वसन करण्यात आले असले तरीही नव्यानेच मंजूर झालेल्या विश्रामगृहाच्या इमारतीचे काम एका बड्या गुत्तेदारांच्या नावाखाली चालू असून गेल्या चार वर्षापासून हे काम पूर्णत्वाकडे अद्याप गेले नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यामागे संबंधित विभागाचे बडे अधिकारी कर्मचारी व लोकप्रतिनिधीचा संबंधित गुत्तेदारांना अभयाचा वाटा असल्यामुळे हे काम संत गतीने चालवून काम न करताच शासनाचा निधी हडप करण्याचा बेत गुत्तेदारांचा असल्याचे नागरिकांच्या तोंडून बोलल्या जात आहे.



हिमायतनगर शहरांमध्ये नव्यानेच दिवाणी न्यायालय तहसील विभाग पाणीपुरवठा योजना पंचायत समिती विभाग अशा शासकीय महत्त्वाच्या स्वतंत्र इमारती होऊन शहरांमध्ये विकास कामात भर झाला आहे. त्याचबरोबर शहरातील गुत्तेदार असलेल्या व्यक्तींनी येथील अंदाजीत दोन कोटी रुपयांच्या विश्रामगृहाच्या कामाचे टेंडर आपल्या नावी घेऊन गेल्या अनेक दिवसापासून कामाला सुरुवात केली परंतु चार वर्षाचा कार्यकाळ होत आला असला तरीही या दोन कोटी रुपयाचे काम पूर्णत्वाकडे अद्याप वाटचाल झाली नाही. मात्र अधिकारी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून संबंधित गुत्तेदारांनी शासनाच्या निधीवर अपुरे काम करून मोठ्या प्रमाणात निधी उचलून घेतला आहे. आणि उर्वरित राहिलेले काम मात्र अद्याप पर्यंत पूर्णत्वाकडे गेले नसून काम पूर्ण करण्याचा कालावधी निघून गेला असला तरी हे विश्रामगृहाचे काम मात्र अडगळीला पडले आहे. याकडे संबंधित लोकप्रतिनिधी अधिकारी कर्मचारी हे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग अंतर्गत असलेल्या उपविभाग हिमायतनगर यांच्या कार्यक्षेत्रातील हे काम असून बडे अधिकारी कर्मचारी हे संबंधित गुत्तेदारांच्या हातातील खेळणे बनले आहे. त्यामुळे गुत्तेदार आपला मनमानी कारभार करून या कामाकरिता शासनाने दिलेला मोठा निधी विश्रामगृहाचे काम अपूर्ण करून शासनाचा असलेला एकंदरीत मोठा निधी हडपण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु या बाबतीत अधिकाऱ्यांबरोबरच लोकप्रतिनिधी हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे नागरिकांतून बोलल्या जात आहे. संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंत अधीक्षक अभियंता यांनी या बाबीकडे लक्ष देऊन संबंधित बड्या गुत्तेदारांनी विश्रामगृहाच्या केलेल्या अपुऱ्या कामाबद्दल तातडीने कामे पूर्ण करून घेण्यासंबंधी तंबी द्यावी व कामाच्या उचललेल्या देयकाबद्दल सखोल चौकशी करून कामाचा कार्यकाळामध्ये पूर्ण न करण्याचे कारण खुलासे करावे अशि ओरड नागरिकांना ऐकावयास मिळत आहे.

## कलाल गौड समाजाचा वर-वधू परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०६ डिसेंबर**



कलाल गौड समाजाचा वर-वधू परिचय मेळावा वाई येथे ८ डिसेंबर रोजी आयोजित केला असून या परिचय मेळाव्यास समाजातील सर्व घटकांनी येण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. समाजामधील समस्या आणि वर्तमान काळातील मार्गक्रमण कसे करावे यावर मंथन करण्यात येणार आहे. मेळाव्याचे अध्यक्ष नितीन कन्नलवार असून स्वागताध्यक्ष म्हणून किनवट तालुका कलाल संघटनेचे तालुकाध्यक्ष विजय कन्नलवार आहेत. सदरील मेळाव्याचा फायदा सर्व समाजातील घटकांनी घेऊन येणाऱ्या काळात किनवट येथे होणाऱ्या विवाह मेळाव्यास आपण सर्वांनी तन-मन-धनाने उपस्थित राहून इतर समाजासमोर आदर्श निर्माण करण्याचे आवाहन विजय कन्नलवार व नितीन कन्नलवार यांनी केले आहे.

# कै.बाळासाहेब किशनराव देशमुख यांच्या सातव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हाणेगाव ,दि. ०६ डिसेंबर**

देगलूर तालुक्यातील तीन राज्याच्या सीमेवर वसलेल्या हाणेगाव या गावाला धार्मिक सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रात एक मोठी ओळख निर्माण करून देणारे कै. बाळासाहेब किशनराव देशमुख यांच्या सातव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध प्रकारचे सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून अभिवादन करण्यात आले आहे.

कै.बाळासाहेब देशमुख यांनी हाणेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती,नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक,सेवा सहकार सोसायटीचे चेअरमन व आनेक वर्ष ग्रामपंचायतीचे बिनविरोध सरपंच अशी अनेक पदे उपभोगून एक लोकनेता जननायक समाजसेवक विकास पुरुष असे आनेक



उपाधी घेण्याचा मान त्यांनी मिळविला अशा या महान लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी त्यांचे चिरंजीव विजयसिंह बाळासाहेब देशमुख, प्रीतम बाळासाहेब देशमुख, प्रशांत बाळासाहेब देशमुख, प्रणव बाळासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दि.३ रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन अभिवादन करण्यात आले यात मंगळवारी सकाळी ११ वाजता कै.बाळासाहेब किशनराव देशमुख यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी अभिवादन सभा घेण्यात आली यावेळी आनेक मान्यवरांनीं हजेरी लावुन लोकनेत्यास अभिवादन केले तर दुपारी अन्नदान करण्यात आले व मंगळवार रोजी रात्री समाजप्रबोनकार महाराष्ट्र भुषण हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे भव्य कीर्तण व भजन करुन पुण्यस्मरण करण्यात आले यावेळी असंख्य लोकांची गर्दी होती हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देशमुख परिवार व गावातील देशमुख मित्रमंडळानी मोलाचे सहकार्य केले आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०६ डिसेंबर**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कृतीशिल अभिवादन करण्यासाठी व २६/११ च्या आतंकी हल्लूयात शहीद झालेल्या पोलीस, वीर-जवानांना रक्तदान करून अभिवादन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ शुक्रवारी(दि.६) सकाळी १० वाजता रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.यात दुपारी दोन वाजेपर्यंत ५० च्या वर रक्तदात्यांनी रक्तदान केले.सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा आकडा ७५ त्यावर पोहचेल अशी माहिती माहिती युवा पँथर संघटनेचे अध्यक्ष सम्राट सर्पे व सचिव निखिल कावळे यांनी दिली.



## ५० च्या वर रक्तदात्यांनी केले रक्तदान

शिबिराचे हे ७ वे वर्षे आहे. शिबिराचे आयोजन युवा नेते राहुल सर्पे यांच्या सौजन्याने करण्यात आले आहे.प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सकाळी १० च्या सुमारास अनेक मान्यवरांच्या हस्ते डॉ.आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अनिल उमरे व महेंद्र नरवाडे यांनी सामुदायिकरित्या वंदना घेतली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष अभियंता प्रशांत ठमके, पीरिपा चे जिल्हाध्यक्ष विनोद भरणे, प्राचार्या शुभांगीताई ठमके, माजी नगराध्यक्ष के.मुर्ती, सेक्युलर मुव्हमेंट चे जिल्हाध्यक्ष मिलिंद सर्पे, गंगुबाई परेकार, सुजाता कोल्हे, दशरथ पवार, प्रा.रविकांत सर्पे, क्रांती शरण केराम, बाळकृष्ण कदम, सुनिल येरेकार, गोकुळ भवरे, राजेश पाटील, पोलीस निरीक्षक सुनिल बिर्ला, रवि कांबळे, सम्यक सर्पे, विनोद कदम, आनंद भालेराव, फसीभाई, विवेक ओंकार, भीमराव पाटील, विनोद कदम यांच्यासह विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# परभणी जिल्हयात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनानिमित्त विनम्र अभिवादन




**परभणी,/प्रतिनिधी:** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या महापरिनिर्वान दिना निमित्ताने पाथरी येथील भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळास पाथरी पोलिस निरिक्षक पाटील व कार्यक्रमाचे अध्यक्ष टि.एम.शेळके आदी सहित उपस्थीत मान्यवरांच्या हास्ते पुष्पहार आर्पन करुन विनंम्रअभिवादन करण्यात आले सविस्तर वृत्त आसे कि भारतीय बौध्द महासभेचे माजी तालुका अध्यक्ष तथा बौध्दाचार्य शुध्दोधन शिंदे व माजी तालुका अध्यक्ष बि.एन.वाघमारे यांच्या मार्गदर्शनात दि.०६/१२/२०२४ रोजी सकाळी १०:३० वा.भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या महापरिनिर्वान दिनाच्या निमित्ताने पाथरी येथील भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळास पाथरी पोलिस स्टेशनचे पोलीस निरिक्षक पाटील यांच्या हास्ते पुष्पहार आर्पन करुन विनंम्रअभिवादन करण्यात आले सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौध्द महासभेचे माजी तालुका अध्यक्ष टि.एम.शेळके हे होते या प्रसंगीप.स.चे माजी सभापती डॉ.घोक्षे,दिलीप ढवळे,दिलीप मोरे,समाधान अवसलमोल,रघुनाथ दादा शिंदे,पत्रकार आवडाजी ढवळे,पत्रकार एल.आर.कदम,बि.एन.घागरमाळे,माजी न.प.स.सतीष वाकडे,माजी न.प.स.लक्ष्मन कांबळे,गोदावरीताई कांबळे,मधुकर ढवळे,संभाजी ढवळे,आशोक मरिबा ढवळे,के.पी.पांढरे,ॲ.दिपक कदम,गंगाधर पोटभरे,बालाजी मकरंद,लिंबाजी ढवळे,विठ्ठल आवचार लोणी,आश्रोबा ढवळे,राजु लांडगे,सीताराम ढवळे,प्रमोद ढवळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थीत होती तर पि.एस.आय. आशोक उजगरे,सचिन डोंगरे,त्रिंबक घुगे,मारोतराव जाधव,भदर्गेताई,पार्वती लांडगे,पदमिनबाई ढवळे,वामन साळवे,जीवाजी ढवळे,सुरेश घागरमाळे,बंन्सी धनले,के.पी.पांढरे,राहुल कांबळे,विजय लांडगे,विमलबाई ढवळे,शारदाबाई कांबळे,शिला वाकळे,शिला डाके आदीचे अमुल्य योगदान लाभले

सदर कार्यक्रमा प्रसंगी बौध्दाचार्य शुध्दोधन शिंदे,बौध्दाचार्य टि.एम. शेळके यांनी बुध्द वंदनेचे पठन केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पत्राकार आवडाजी ढवळे यांनी केले सदर कार्यक्रमा प्रसंगी मोठ्या संख्येने भिम अनुयायी उपस्थीत होते.

### गंगाखेडात महामानव बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वान दिन साजरा

गंगाखेड शहरातील मुख्य चौक असलेल्या भगवती मंदिर शिवाजी चौक येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

आपल्या अफाट बौद्धिक कौशल्य आणि बुद्धिमत्तेच्या बळावर सबंध मानव जातीचे भारतीयांचे जीवन बदलण्याची क्रांती या महामानवांनी केली त्यांच्या विचारांचा जागर झाला पाहिजे यासाठी सर्व महापुरुष जयंती समितीचे सदस्य यांनी जयंती साजरी केली. महापुरुष जयंती समितीच्या वतीने सर्व महापुरुषांची जयंती, स्मृतीदिन साजरी करण्याच्या पाठीमागे असलेला उद्देश म्हणजे जनसामान्यांमध्ये समतेची बिजे रुजावीत, सर्वांनी बंधूभावाने वागावे व समरसता निर्माण व्हावी हा उद्देश ठेवून महापुरुष जयंती समितीच्या वतीने महामानव भारतरत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

यावेळी उपस्थित महापुरुष जयंती समितीचे संकल्पक तथा भारतीय किसान संघाचे तालुका अध्यक्ष माधवराव चव्हाण, बंजारा समाजाचे ज्येष्ठ नेते तथा भाजपा ज्येष्ठ नेते बाबुरावजी पवार मामा , वाघलगावचे मा. सरपंच नारायणराव घनवटे, मालेवाडी चे माजी सरपंच श्रीकांतजी गायकवाड, बालासाहेब यादव, डिगांबर यादव,, डॉक्टर सचिन सुपेकर, सागरभाऊ गोरे, नेमीचंद नखत जैन, पोलीस बांधव यांच्यासह महापुरुष जयंती समितीचेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, शहरातील व्यापारी बांधव व नागरीक उपस्थित होते.



परभणी- भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालया समोरील भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, तहसीलदार संदीप राजपुरे, मंडळ अधिकारी मिलिंद विटेकर, ग्राम महसूल अधिकारी रविकांत काळे, प्रदीप वावळे, अरुणकुमार लेमाडे आदी दिसत आहेत.

## पूर्णेत भाजपाच्या कार्यकर्त्यांनी शपथविधीनंतर केला मोठा जल्लोष



**पूर्णा,/प्रतिनिधी-** मुंबई येथे आझाद मैदानावरील शानदार सोहळ्यात ५ डिसेंबर गुरुवार रोजी सायंकाळी नियोजित वेळेत भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्रजी फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची तर शिवसेना नेते एकनाथजी शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते अजित दादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताच पूर्णा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात भाजपाचे तथा महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सायंकाळी आकाशात जोरदार फटाकेची आतिषबाजी करत एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सवाचा जल्लोष साजरा केला.

तत्पुर्वी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. यावेळी भाजपाचे लक्ष्मीकांत कदम,नरहरी ढोणे, विलास कदम ,डॉ अजय ठाकूर, बळीराम कदम,प्रशांत कापसे, बालाजी कदम,राम चापके, संजय अंभोरे, मधूकर मुळे, चंद्रकांत टाकळकर सह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## बांगलादेशात हिंदू बांधवावरील अत्याचार थांबवा- अन्यथा आंदोलन उभारणार- आ.डॉ.राहुल पाटील

**परभणी,/प्रतिनिधी :** बांगलादेशात हिंदू बांधवावर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात केंद्र सरकारने तातडीने पावले उचलावीत नसता आंदोलन उभारूअसा इशारा आमदार डॉ.राहुल पाटील यांनी दिला आहे.

बांगलादेशामध्ये अल्पसंख्यांक हिंदू, शिख, बौद्ध अशा समाजावर सातत्याने आक्रमक हल्ले होऊन हिंदू बांधवांवर अन्यायकारक हल्ले, अत्याचार होत आहेत, स्वामी चिन्मयानंद प्रभू यांच्यावर देखील बेकायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे केंद्र सरकारने यामध्ये तात्काळ हस्तक्षेप करून हि कारवाई थांबव्हावी तसेच केंद्र सरकारने



तातडीने आक्रमक पाऊल उचलून बांगलादेशातील हिंदू बांधवांवरील हल्ले, अत्याचार थांबवण्यासाठी उपाययोजना कराव्यात अन्यथा या विरोधात मोठे जन आंदोलन करू असा इशारा आमदार डॉ. पाटील यांनी दिला आहे. यावेळी शिवसेना,युवासेना पदाधिकारी,कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

## सशस्त्र सेना ध्वजदिनी निधी संकलन कार्यक्रमाचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** सशस्त्र सेना ध्वजदिन निधी-२०२४ संकलन शुभारंभ कार्यक्रम जिल्हा ध्वजदिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०:१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृह, येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमामध्ये जिल्ह्यातील शहीदांच्या वीर पती/वीर माता यांचा सन्मान, विविध कार्यालयांनी गत वर्ष २०२३ मध्ये उत्कृष्ट ध्वजदिन निधी संकलन केल्याबद्दल प्रशस्तीपत्र वाटप, १० वी आणि १२ वी मध्ये गौरव पुरस्कार प्राप्त माजी सैनिक यांच्या पाल्यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरव तसेच ध्वजदिन निधी २०२४ संकलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व वीर पती, वीर माता/पिता तसेच माजी सैनिक/माजी सैनिक विधवा पती यांनी दि. १० डिसेंबर, २०२४ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हाधिकाऱ्यांव्दारे महामानवास अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी-** महामानव भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी स्टेशन रोड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी तहसीलदार संदीप राजपुरे, मंडळ अधिकारी मिलिंद विटेकर, ग्राम महसूल अधिकारी रविकांत काळे, प्रदीप वावळे, अरुणकुमार लेमाडे आदी यावेळी उपस्थित होते.

### मोटारसायकलस्वारांची दबंगगीरी; महिलेस शिवीगाळ

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील वसमत रस्त्याावर विष्णू नगराच्या कॉर्नरजवळील किसान बेकरी कारला कट मारणाऱ्या मोटारसायकलस्वारानेच चार-सहा मित्रांच्या सहाय्याने कारमधील महिलेस शिवीगाळ करीत कारची तोडफोड केली. गुरुवारी सायंकाळी पावणे सहा वाजेच्या समारास ही घटना घडली.

दोघा मोटारसायकलस्वारांनी कारला कट मारुन पुढे जाण्याचा प्रयत केला. त्याावेळी कारमधील महिलेने त्याा मोटारसायकल स्वारांना जाब विचारला अन् सूनावले. तेव्हा मोटारसायकलस्वाराने चार-दोन मित्र बोलावून त्याा महिलेस शिवीगाळ करीत धक्काबुक्की केली व कारची तोडफोड केली. तेथून हे मोटारसायकलस्वार फरार झाले. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेवून तपास सुरु केला.

### शिक्षणाशिवाय समाज परिवर्तन नाही अभिजीत कोरान्ने : मराठवाडा हायस्कूलमध्ये अभिवादन कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेळोवेळी शिक्षणाचे महत्व पटवून सांगितलेले आहे. त्याामुळे शिक्षणाशिवाय समाज परिर्वन होणे शक्य नाही, असे मत अभिजित कोरान्ने यांनी व्यक्त केले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवारी (दि.०६) येथील नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूल शिवाजी नगर शाखेत अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना कोरान्ने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण विषयक विचारांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक बाळकृष्णा कपरे यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्याहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. त्याांना वर्गशिक्षिका सौ. सुरेखा गीते यांचे मार्गदर्शन लाभले.

### परभणी जिल्हयातून थंडी झाली गायबच

**परभणी,/प्रतिनिधी :** गेल्या तीन ते चार दिवसापासून परभणी जिल्हयात जणू थंडीच गायबच झाली आहे. सध्या जिल्हयात चांगलीच गरमी होत असल्याचे दिसत आहे. नागरिकांना मागील आठवडयात चांगलीच थंडू जाणवू लागली होती. परंतू अचानक झालेल्या ढगाळ वातावरणामुळे जिल्हयातून थंडी गायब झाली आहे. या ढगाळ वातावरणाचा परिणाम हरभरा, तुर, गहू, हळद या नगदी पिकांवर पडत असून पिकांना किट लागली असल्याचेही दिसत आहे. एकंदर हे वातावरण अत्यंत खराब आहे असे काही तज्ञ जाणकरातून बोलतांना व्यक्त होत आहे.



**मानवत- तालूक्यातील टाकळी नीलवर्ण ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी ज्योतीताई मुकुंदराव देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सन्माननीय सदस्य कल्पना मयूर देशमुख सुनीताबाई जनार्दनराव नारळे भास्करराव नारळे पांडुरंग कनकुटे यांनी या प्रसंगी मोलाची सहकार्य केले. निवडीचे ग्रामस्थामधून कौतूक होत आहे.**

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ ममाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे थाटात उदघाटन- तरुणाईचा मोठा जल्लोष

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्घाटन बी. रघुनाथ सभागृह परभणी येथे उत्साहात संपन्न झाले. जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये सांस्कृतिक स्पर्धा अंतर्गत समूह लोकनृत्या व लोकगीत, कौशल्य विकास स्पर्धा अंतर्गत चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा कविता वाचन, कथालेखन, मोबाईल फोटोग्राफी तर संकल्पना आधारित स्पर्धेमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नव संकल्पना, इत्यादी विविध प्रकारात स्पर्धा संपन्न झाली.

या प्रसंगी जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक यशवंत काळे, जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे, नेहरू युवा केंद्राचे शशांक राउला, राज्य युवा पुरस्कारार्थी काजल भुसारे आदी उपस्थित होते. महोत्सवाचे उद्घाटन अपर पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांच्या हस्ते झाले. त्यांनी सहभागी युवांना प्रोत्साहन देऊन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सोबतच युवकांनी या संधीचा फायदा घेऊन जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा. मोठ्या प्रमाणात स्पर्धा भरवण्याचा प्रयत जिल्ह्यात केला गेला आहे. युवकांनी सोशल मीडियाचा वापर कसा करावा त्याचे होणारे चांगले वाईट परिणाम याबाबतचे माहिती युवकांना दिली. तसेच हे कार्यक्रम तालुका स्तरावर राबविले पाहिजे, जेणेकरून युवकांमध्ये आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होईल, असे सांगितले. प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी केले. देशाचं युवा धोरण पहिल्यांदा महाराष्ट्र राज्याने तयार केले. युवा धोरण ठरवणारे आपले राज्य प्रथम याचा सार्थ अभिमान वाटतो. युवा महोत्सवाच्या निमित्ताने अनेक कलाकारांना मोठे व्यासपीठ मिळते. सांस्कृतिक कौशल्य विकास संकल्पना आधारित सायन्स क्षेत्रातील नाव, संकल्पना यामध्ये १५ ते २९ वर्ष वयोगटातील मुलांना या ठिकाणी सहभाग नोंदवता येतो. राज्यामध्ये सर्व जिल्ह्यात उत्साहाने हा महोत्सव साजरा केला जातो. नेहरू युवा केंद्राचे जिल्हाप्रमुख शशांक राउला यांनी युवकांसाठी या स्पर्धेमार्फत युवकांमध्ये देशप्रेम जागृत होते असे व्यासपीठ सतत युवकांना मिळावे, असा संदेश दिला. कार्यक्रमास परीक्षक प्रा.डॉ. आनंद मनोहर, प्रा.डॉ. भीमराव खाडे, प्रा.डॉ. सुरेश शेळके, प्रा.डॉ. सुरेश शेवाळे, डॉ. पंकज खेडकर, डॉ. मिलिंद बामणीकर, रवी पंडित, लक्ष्मी लहाने, समीर सौदागर हे उपस्थित होते. या स्पर्धे अंतर्गत विविध स्टॉल लावण्यात आले होते. त्यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान याचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. सूत्रसंचालन हे श्रीकांत लासुरकर व वैष्णवी शर्मा यांनी केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील रोहन दांडेकर, सुरेश नाटकर, प्रकाश पंडित, धीरज नाईकवाडे व नेहरू युवा केंद्र मार्फत गौतम ढगे कार्यालयातील इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## अ.भा.मराठा महासंघाच्या सभेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : दिनांक ०६ डिसेंबर रविवार रोजी अखिल भारतीय मराठा महासंघाची राज्यव्यापी मध्यवर्ती राष्ट्रीय कार्यकारणीची सभा छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी ११ते ५ या कालावधीत होणार असुन अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोंढरे राष्ट्रीय उपाध्यक्ष नरेंद्र पाटील (अध्यक्ष अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मुंबई) प्रकाश देशमुख सरचिटणीस हे उपस्थितीत राहणार आहेत. सभेमध्ये मराठा समाज उन्नतीची दिशा व कार्य यावर संवाद व मार्गदर्शन होणार आहे. या सभेचे ठिकाण गोविंदभाई श्रॉफ कला अकॅडमी सभागृह, एस. बी. कॉलेज, औरंगपुरा बसस्टॉप समोर, छत्रपती संभाजीनगर असे आहे.

या सभेस जास्तीत जास्त समाजबांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# डोंगरगाव फाटा ते मोहरा रस्त्याचे काम सुरू

## दैनिक तरुण भारत बातमीचा परिणाम -सरपंच ग्रामस्थांनी मानले आभार

तभा वृत्तसेवा

नाचनवेल :दि.६. डिसेंबर- कन्नड तालुक्यातील डोंगरगाव फाटा ते मोहरा प्रमुख मार्ग क्रमांक ४६ या दोन किमी रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली होती. रस्त्यात खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले होते. त्यामुळे छोटे मोठे अपघाताचे प्रमाण वाढले होते व वाहनधारक व्यावसायिक संताप व्यक्त करीत होते. त्यानंतर या समस्येची दखल घेऊन ग्रामपंचायतने निवेदन देऊन पाठपुरावा केला होता तसेच (दैनिक तरुण भारत) ने बातमी प्रसारित केली होती त्यानंतर या रस्त्याचे साईड पंखे साफ करून तात्पुरत्या स्वरूपाचे खड्डे बुजवण्यात आले होते .त्यानंतर



मोहरा ते डोंगरगाव फाटा रस्त्याचे काम सुरू पाहणी करताना सरपंच व ग्रामस्थ. छाया – देविदास थोरात

पावसाळा संपताच रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. सदरील मोहरा ,डोंगरगाव रस्ता क्रमांक ४६ या रस्त्याचे नवीन काम दोन-तीन दिवसांपासून सुरू असून ग्रामस्थ सरपंच यांनी रस्त्याचे काम चांगल्या स्वरूपाचे सुरू आहे की नाही याची पाहणी देखील केली आहे. ग्रामस्थांनी( दैनिक तरुण भारत) व प्रशासनाचे दखल घेऊन काम सुरू केल्याबद्दल आभार व्यक्त केले आहे. रस्त्याचे काम दर्जेदार व चांगले स्वरूपाचे




करण्यात यावी असे मत सरपंच समाधान गाडेकर यांनी व्यक्त केले आहे निकृष्ट दर्जाचे काम केल्यास आम्ही ग्रामस्थ आंदोलन करू असे देखील मत त्यांनी व्यक्त केले आहे प्रशासनाने या रस्त्याच्या कामाकडे व्यवस्थित लक्ष द्यावे ही मागणी देखील केली आहे.

# जिरेमाळी समाज मंगल कार्यालयाच्या मुख्य द्वाराचे लोकार्पण सोहळा संपन्न



पिशोर दि.६ (प्रतिनिधी) कन्नड तालुक्यातील शफेपुर येथील जिरेमाळी समाज मंगल कार्यालय. येथील अखंड हरिनाम साप्ताहाच्या माध्यमातून ट्रॅक्टर ग्रुपच्या सदस्यांनी पाच लोखंडी गेटसह सिमेंटच्या बांधकामाचे मुख्य प्रवेशद्वार बांधून लोकार्पण करणयात आले आहे. पाच गेटसह मुख्य प्रवेशद्वाराचा (दि.४) बुधवार रोजी सकाळी ९.०० वाजता येथील पंच मंडळी व प्रतिष्ठित व्यक्तीच्या उपस्थितीत महापूजा,लोकार्पणासह ट्रॅक्टर ग्रुपच्या सदस्याचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

येथील समाज बांधवानी एकत्रित रक्कम जमा करून जिरे माळी समाज मंगल कार्यालयासाठी भव्य अशी जागा खरीदी केली आहे. येथील शफेपुर भागात मागील ५३ वर्षाची परंपारीक अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.

गेल्या दोन वर्षांपासून ट्रॅक्टर ग्रुप मित्र मंडळाच्या माध्यमातून लोकसहभागातून वर्गणी करून सप्ताहचा खर्च करून उर्वरित रकमेतून पाच लोखंडी गेटसह सिमेंटी कमान उभारली आल्याने समाज बांधवाकडून ट्रॅक्टर ग्रुपचे कौतुक करण्यात येत आहे. ट्रॅक्टर चालक मालक ग्रुपचे अध्यक्ष कृष्णा दवंगे ग्रुपच्या सदस्यांचा पंच कमिटी अध्यक्ष धोंडू बाबा मोकासे, किसन मोकासे, येसूबा मोकासे, शावकुबा दवंगे, पांडुरंग दवंगे यांच्या हस्ते शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच पि.एम. डहाके, केतन काजे, माजी उपसरपंच नारायण जाधव, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी सूर्यभान दवंगे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र मोकासे, ग्रा.पं.सदस्य धिरज शेजवळ, बबलू मोकासे, तुळशीराम मोकासे, राजू मोकासे, राजू डहाके, रवी वाघ,शिवाजी मिस्तरी, अशोक मोकासे, शंकर मोकासे, सुरेश मोकासे, सुभाष भोरकडे, रमेश मोकासे, गणेश मोकासे आदीसह पंच मंडळ, ट्रॅक्टर ग्रुपचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## सायलेन्सर बहाद्दर बुलेटस्वारावर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर : सार्वजनिक ठिकाणी रेस वाढवून सायलेन्सर द्वारे मोठ मोठ्याने आवाज काढणाऱ्या बुलेट स्वरावर उस्मानपुरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हर्षल राजू आमराव रा. कोकणवाडी जय टावर जवळ व कार्तिक रवी कांबळे रा. आदर्श महिला बँकेसमोर क्रांतीनगर अशी आरोपींची नावे आहेत.

याप्रकरणी पोलीस अंमलदार सागर कचरू पांढरे यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ४ डिसेंबर रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास आरोपी बुलेट मोटरसायकलचे रेस वाढवून सायलेन्सर द्वारे मोठमोठे आवाज करून सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालत होते. तर पाठीमागे बसलेला आरोपी त्याला प्रोत्साहन देत होता. सायलेन्सरचा आवाज काढू नका असे वारंवार सांगूनही त्यांनी ऐकले नाही. याप्रकरणी उस्मानपुरा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# अमृत व एमसीईडी यांच्यात सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्यात अमृत-सूर्यमित्र प्रशिक्षण योजना, अमृत-आयात निर्यात प्रशिक्षण योजना आणि अमृत बेकरी प्रशिक्षण या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सामंजस्य करार करण्यात आला.याप्रसंगी अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रचे कार्यकारी संचालक बी. टी. येशवंते यांनी या सामंज्यस्य करारावर स्वाक्षरी केली.

उद्योग क्षेत्राची कमी माहिती आणि आत्मविश्वासाचा अभाव यामुळे अनेकजण उद्योजकतेकडे वळण्यात मागे पडतात. त्यामुळे अमृत लक्षित गटातील युबक, युवतींमध्ये उद्योजकतेचे प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेऊन अमृत संस्थेने हे महत्वकांक्षी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले आहे. अमृत संस्थेच्या सोलर पी.व्ही. इंस्टॉलेशन, आयात-निर्यात आणि अमृत-बेकरी प्रशिक्षण योजना या तिन्ही निवासी प्रशिक्षण योजनांचा कालावधी १८ दिवसांचा आहे. यात ८०% तांत्रिक प्रशिक्षण व २०% उद्योजकता विकास यावर भर देण्यात येईल. आयात-निर्यात प्रशिक्षण यामध्ये आयात-निर्यात प्रक्रिया, परकीय व्यापार धोरण, डीजीएफटी, एपीईडीए याबद्दल मार्गदर्शन केले जाईल. सूर्यमित्र प्रशिक्षण, अमृत-बेकरी प्रशिक्षण योजनेत फक्त तांत्रिक ज्ञानच मिळणार नसून उद्योग दिली जाईल.

# कर्णपुरा येथील बारा माता मंदिरात महाआरती उत्साहात संपन्न

## दर्शनासाठी भाविकांची मोठया संख्येने उपस्थिती, १४ वा वर्धापन दिवसा निमीत्त हजारो भाविकांनी घेतले दर्शन

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबाजार अंतर्गत श्री.सर्वतोभद्र पार्श्वनाथ जैन मंदिर, व १२ कुलदेवी माता मंदिर कर्णपुरा येथे मंदिराचा १४ वा वर्धापन दिन मोठया भक्ती भावाने व उत्साहात साजरा करण्यात आला.मंदिरात शेकडो भाविकांची दर्शनासाठी सकाळपासुनच भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सर्व प्रथम सकाळी मंदिरात श्री.सर्वतोभद्र भगवंताचा अभिषेक ग्रुपच्यावतीने महाशांतीधारा (अभिषेक) करण्यात आला. यावेळी धर्म ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी नित्यनियम अभिषेक कर्ता डॉ.प्रकाश पापडीवाल अशोक कासलीवाल,डॉ.शैलेश चांदीवाल, सचिन पाटणी, राहुल ठोले, धरनेंद्र दगडा, अमित जैन, मयुर



कासलीवाल, धिरज पाटणी,मंदिराचे अध्यक्ष सचिव विश्वस्थ , सुनिल पांडे, प्रकाशचंद कासलीवाल, दिनेश ठोले, सपना पाटणी, आशा कासलीवाल आदी मान्यवरांच्या हस्ते धर्मध्वजारोहन करण्यात आले. यांच्यासह विश्वस्थ कार्यकारणी मंडळ व समाज बांधवांची मोठी उपस्थिती होती. यावेळी धीरज धरमचंद चेतन चिराग सुभाषचंद मयूर पाटनी परिवार प्रसादीचे वाटप करण्यात आले.

तदनंत संध्याकाळी श्री.सर्वतोभद्र पार्श्वनाथ भगवान व कुलदेवी मातांची महाआरती १०८ दिपकांनी व णमोकार भक्तीमंडळाच्या साग्र संगीतामध्ये भजन संध्या करण्यात आली. या प्रसंगी णमोकार भक्ती मंडळाने विविध धार्मिक भजनाने वातावरण संगीतमय केले. वर्धापनदिवसा निमीत्त संपुर्ण मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. कार्यकम यशस्वी करण्यासाठी विश्वस्थ व कार्यकारणी मंडळासह मंदिर समितीने विशेष परिश्रम घेतले. यावेळी सुत्रसंचालन प्रास्ताविक महामंत्री यांनी सांगीतले की, आचार्य सुमतीसागरजी महाराज यांची समाधी ०२/०९/१९५५ रोजी झाली होती. सेठ कचरदास बाकलीवाल परिवाराने हि जागा खंडेलवाल दिगंबर जैन पंचायतला मदिरासाठी दान दिली होती. प्रज्ञायोगी आचार्य गुप्तीनंदी गुरैदेव यांच्या आर्शिवादाने १२ कुलदेवी मातेचे मंदिर भारतामध्यये प्रथमच बनले आहे. व ३०/११/२०१० मध्ये प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तसेच यावेळी सर्वतोभद्र पार्श्वनाथ भगवांची प्रतिमा स्व.लिलाबाई इंदरचद गंगवाल परिवार तर्फे देवुन अंतर्मना आचार्य प्रसन्नसागरजी महाराज यांच्या आर्शिवादाने २०१५ मध्ये मुर्तीची प्रतिष्ठा करण्यात आली. तसेच या मंदिरामध्ये मुनि सुमतीसागरजी महाराज,मुनि बुध्दीसागरजी महाराज,आर्यिका राजश्री माताजी व आर्यिका सरलश्री माताजी यांची सुध्दा चरण पादुका आहे. यावेळी संपुर्ण समाजा बांधवांना चुदडीची गांधी टोपी परिधान करैन भगवंताची महाआरती केली. यावेळेस १२ महिन्याचा बोली घेतलेल्या दांनदाताचा व अतिथी चा पंचायत वतीने अभिनंदन व सत्कार केला

या प्रसंगी अरिहंतनगर,बालाजीनगर,सिडको,हडको,छावणी, राजाबजार चितामणी कॉलनी,मोहनलालनगर,आदी परिसरातील भाविकांची मोठया संख्येने उपस्थिती होती. अशी माहिति प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

## इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर : अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या २१ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची घटना सिडको एन ५ परिसरात घडली. शुभमभाऊ ज्ञानेश्वर वहाटूळे (रा. पिंपळगाव वळण, ता. फुलंब्री) असे त्याचे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. पोलिसांनी त्याचा मोबाइल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार इंजिनिअरिंग इलेक्ट्रिकल शुभम एका कॉलेजमध्ये अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात शिकत होता. सकाळी नऊच्या सुमारास त्याचा मोठा भाऊ गावाकडून शहरात आला होता. त्याने आईने दिलेला डबा शुभमला दिला. मला गावाकडे तुझ्या दुचाकीवरून यायचे आहे, असे त्याने भावाला सांगितले. मी शहरातील कामे आटोपून आल्यानंतर आपण गावी जाऊ, असे सांगून मोठा भाऊ निघून गेल्याचे नातेवाइकांनी सांगितले. तो अभ्यासात हुशार होता. पहिल्या वर्षाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण झाला होता, असे त्याच्या भावाने सांगितले.

# एमजीएम विद्यापीठास दिली लीभेर कंपनीच्या शिष्टमंडळाने भेट

छत्रपती संभाजीनगर, दि.५ : लीभेर अप्लायन्सेस प्रा.लि. कंपनीच्या शिष्टमंडळाने मंगळवार, दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी महात्मा गांधी मिशन विद्यापीठास भेट दिली. या शिष्टमंडळामध्ये कंपनीच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक ओबेररलॅकर थॉमस, गणेश फिरके, असीम अमीर, दिनेश कटारिया आदि मान्यवर सहभागी होते. एमजीएम विद्यापीठाकडून कुलपती अंकुशराव कदम, डॉ. सुधीर गव्हाणे, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच.एच.शिंदे, संचालक डॉ.रणीत किशोर, संचालक परमिंदर कौर धिंग्रा, संचालक डॉ.अण्णासाहेब खेमनर, डॉ.भक्ती बनवसकर देशमुख, प्राध्यापक व सर्व संबंधित उपस्थित होते.

एमजीएम विद्यापीठ आणि लीभेर अप्लायन्सेस प्रा.लि.मध्ये काही महिन्यांपूर्वी सामंजस्य



करार करण्यात आला होता. याच काराराचा भाग म्हणून या शिष्टमंडळाने विद्यापीठास भेट देऊन अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. एमजीएम विद्यापीठ आणि लीभेर अप्लायन्सेस या दोन्ही संस्था एकत्रित येत काही विशेष प्रकल्पावर काम करीत असून यावरती एमजीएम विद्यापीठात संशोधन सुरू आहे. विद्यापीठाचे प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व सर्व संबंधित या प्रकल्पावर काम करीत आहेत.

यावेळी बोलताना एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, एमजीएम विद्यापीठ आणि लीभेर अप्लायन्सेस प्रा.लि. या दोन संस्थांमध्ये झालेल्या या सामंजस्य कराराच्या माध्यमातून दोन्ही संस्थांना याचा फायदा होणार आहे. आंतरवासिता, अभ्यासक्रम निर्मिती, प्रशिक्षण, प्रकल्प भेट, संशोधन, नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे नवीन संशोधनास या माध्यमातून चालना मिळणार आहे. तसेच प्रकल्पाधारित शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास, प्रकल्पाधारित शिक्षण, नाविन्यता, स्टार्टअप्स यासाठी या सामंजस्य कराराचा फायदा होणार आहे. त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाची देवाणघेवाण होत असताना विद्यार्थ्यांना स्वत:च्या क्षमतांना आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांना न्याय देण्यासाठी वाव मिळणार आहे. या दोन्ही संस्था एकाच व्यासपीठावर येऊन काम करीत असल्यामुळे येत्या काळामध्ये निश्चितपणे समाजोपयोगी काम या माध्यमातून उभे राहील, असा मला विश्वास आहे.

एमजीएम विद्यापीठास भेट देऊन आज मला मनापासून आनंद झाला आहे. एमजीएम विद्यापीठ आणि लीभेर अप्लायन्सेस प्रा.लि. या दोन्ही संस्था एकत्र आल्यामुळे खूप महत्वपूर्ण संशोधन आम्ही करीत आहोत. एमजीएम विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या माध्यमातून संशोधन प्रकल्पावर काम करण्याची संधी उलब्ध करून दिली असल्याचे व्यवस्थापकीय संचालक ओबेररलॅकर थॉमस यांनी यावेळी सांगितले.

# गंगापूर वकील संघाकडून राष्ट्रीय वकील दिन उत्साहात साजरा

गंगापूर दि.६ डिसेंबर : गंगापूर वकील संघातर्फे राष्ट्रीय वकील दिनानिमित्त गंगापूर न्यायालयाच्या सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या वेळी न्यायाधीश एस. एस. अग्रवाल,सी. बी. पाटील,ए. बी. इंगोले,एस.वाय. वाकचौरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वकील आणि कायदेशीर व्यावसायिकांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी वकिलदिन साजरा केला जातो. त्याचबरोबर, भारताचे पहिले राष्ट्रपती तसेच वकील असलेले डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३ डिसेंबर रोजी वकील समुदायातर्फे वकील दिन साजरा केला जातो.

या वेळी न्यायाधीश एस एस अग्रवाल,सी बी पाटील,ए बी इंगोले,एस.वाय.वाकचौरे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले.



वकील संघाचे अध्यक्ष किशोर कराळे यांच्या संकल्पनेतून गंगापूर न्यायालयातील जेष्ठ विधिज्ञांचा सत्कार करण्यात आला या वेळी वकील संघाचे अध्यक्ष ड. किशोर कराळे सचिव व्ही एस काळे,प्रशांत जोशी ज्येष्ठविधीतज्ञ विठ्ठल राव साबणे अविनाश कुलकर्णी संजय कुमार जोशी ,भानुदास जोशी,एम बी राजपूत, दत्तात्रय साबणे अशोक पारधे, अमरसिंग राजपूत, भारतसिंग राजपूत,श्रीरंग पदार,दत्ता तारू,अझर पठाण,योगेश जाधव,अनिल इंगळे,रविराज दारुंटे,गोरखनाथ चव्हाण,अप्पासाहेब झोजे,सरकारी वकील वैष्णव,गोविंद कुलकर्णी,आफताब शेख यांच्यासह गंगापूर न्यायालयातील वकील मोठ्या संख्येनं उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचालन वाल्मिक मनोरकर यांनी तर विठ्ठल काळे यांनी आभार मानले.

# नामशेष होत असलेल्या पारंपरिक दगडी ज्वारीच्या लागवडीने बहुलीत वारसा होतोय जतन

## दगडी ज्वारीत लपलंय दीर्घ आयुष्याचे रहस्य,घातक फ्री रॅडिकल थांबवते : डॉ. संतोष पाटील यांचे संशोधन

तभा वृत्तसेवा

नाचनवेल दि.६. डिसेंबर-

हायब्रीड ने उत्पनाची सरासरी वाढली मात्र आयुष्याची सरासरी घटली.दाणे पक्क झाल्या वर दगडा सारखे कडक बनते म्हणून दगडी हे नावं पडले.या ज्वारीत फोलेट व लोह अधिक असल्यामुळे दाणे दगडी बनतात.

ज्वारी हे भरड धान्य मूळ भारतीय आहे . ज्वारीत सद्या हायब्रीड वाणच पेरले जाते ते तितके सकस नाही. दगडी, चिकणी, झिपरी, कावळी या ज्वारी च्या पारंपरिक जाती हायब्रीड जमान्यात नष्ट झाल्या. दगडी ही अत्यंत सकस व पोषक वाण ही राज्यातून गायब झाले मात्र भारतीय वनस्पती जतनाचे

**दगडी ठेवणार तरुण**

**रक्त वाढवणारे लोह व रक्त पुरवठा (ब्लड सर्क्यू लेशन) सुरळीत ठेवणारे तांबे, तसेच सेलिनीयम हे या प्राचीन ज्वारीत खुप असल्यामुळे वार्धक्य लांबते. आयुष्यामान वाढते. मात्रेवाडीच्या दगडीला नुकतेच जि. आय. मानांकन मिळाले आहे.**

**- डॉ संतोष पाटील, पर्यावरण संवर्धक, संशोधक, सिल्लोड.**

कार्य करणारे सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. संतोष पाटील यांनी जालना जिल्ह्यातील मात्रेवाडी येथून दगडी ज्वारीचे वाण जमा करून ते बहुली येथील २ शेतकऱ्यांना मोफत देवून त्याची लागवड





करण्यात आली आहे.हे शेतकरी पुढील वर्षी इतरांना हे वाण मोफत देतील व वाण प्रसार होईल.या ज्वारीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यास पाणी द्यायची जास्त गरज नसून फक्त हवेतील ओलाव्या वर पीक येते. खत द्यावे लागत नसल्याने सेंद्रिय उत्पादन आहे.

दगडी ज्वारीच्या भाकरीची महिमा – या दगडीत हानिकारक ग्लुटेन नसल्याने वजन वाढत नाही. फायबर अधिक असल्याने पाचन शक्ती सुधारते. जीवनसत्व अ, ई व झिंक अधिक असल्यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते. घातक

**काय आहे डॉ. संतोष पाटील यांचे दगडी वरचे संशोधन**


**सोलापूर भागातील बार्शी, मंगळवेढा व मात्रेवाडी भागातील जे लोकं फक्त दगडी ज्वारीच सेवन करतात, त्यांच्यात डायबेटीस, संधिवात, त्वचेवर होणारा पांढरा डाग ( कोड),आतडीचा आय. बी. एस. हा आजार अजिबात आढलळा नाही. कोकणात फक्त भाताची भाकर खाणाऱ्या लोकांमध्ये कोडं चे प्रमाण १00 लोकांतून ५ इतके अधिक सापडले आहे. मानवी शरीरात पेशिंची झिज करणारे फ्री रॅडिकल हे घातक घटक ज्यास प्रदूषण, प्लॅस्टिक, जंक फूड,आहारात जाणारे रसायने हे कारण आहे, ते फ्री रॅडिकल नष्ट करणारे अँटी ऑक्सिडंट दगडी ज्वारीत भरपूर आढळले आहेत.**

एल डी एल कोलेस्टेरोल कमी करते. ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे डायबेटीस च्या व्यक्तींना योग्य आहार आहे. शाळू ज्वारीत साखर अधिक असते ती तितकी आरोग्यदायी नाही.

**गहू हानिकारक**

गहू हे पीक मूळचे अमेरिकन. गहू वातकारक व पचनास जाड असून त्यात ग्लुटेन घटक जास्त असतो, त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स अधिक असून तो डायबेटीस, साखर वाढवण्यास कारक आहे. गव्हाने आतड्यांचे विकार वाढता .

## अनुराधा तुंगार यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : निवृत्त न्यायाधीश कै. कुलदीपक तुंगार यांच्या धर्मपत्नी व निखिलेश तुंगार यांच्या मातोश्री अनुराधा तुंगार वय वर्ष ७० यांचे दि .५ डिसेंबर रोजी सकाळी ४ वाजता संभाजीनगर येथे राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले . त्यांच्यावर सकाळी ११.३० वाजता एमजीएम जवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जीवनात यशस्वी होण्यासाठी वेळेचे महत्त्व ओळखा : युवराज पडीयाल



तभा वृत्तसेवा बिडकीन दि ६ डिसेंबर वेळ कधीही कोणासाठी थांबत नाही.तेव्हा विद्यार्थ्यांना जर जीवनात ख-या अर्थाने यशस्वी व्हायचे असेल तर वेळेचे महत्त्व ओळखा. सतत नवीन काही तरी करण्याचा प्रयत्न करा. या जगात फक्त बुद्धीच्या जोरावरच मनुष्य प्रगती करु शकतो, तेव्हा खूप मेहनत करा, अवांतर वाचन करा अहोरात्र अभ्यास करून आपल्या बापाच्या ऋणातून मुक्त व्हा. त्याच्या कष्टाची जाणीव ठेवा असे प्रतिपादन सहाय्यक कामगार आयुक्त युवराज पडीयाल यांनी केले.

पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुणे ते बोलत होते.यावेळी समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ मिलिंद कोनार्डे, कार्यकारी अभियंता अतुल चव्हाण, सहाय्यक कामगार आयुक्त युवराज पडीयाल,शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले शालेय समितीचे जेष्ठ सदस्य मच्छिंद्र पाटील हाडे , नंदकुमार वैद्य, डॉ.अंताराम धरपळे , किशोर कुलकर्णी उपमुख्याध्यापक युवराज पाडळे, प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे, अविनाश खैरे, विद्यार्थी संसद अध्यक्ष वरद शिंदे यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रशालेच्या संगीत शिक्षिका संध्या शिंदे व स.भु. गीत मंच यांनी स्वागत गीत सादर केले.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले यांनी केले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे कार्यकारी अभियंता अतुल चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शाळेचा सिंहांचा वाटा असतो. गुरुजनांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थी योग्य प्रगती करु शकतो. आम्ही सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन चे माजी विद्यार्थी आहोत याचा आम्हाला अभिमान आहे असे सांगितले.संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य तथा समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ मिलिंद कोनार्डे यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्या मेहनतीने प्रशालेची आज सर्वांगीण प्रगती होत आहे याबद्दल समाधान व्यक्त करुन अपयश यश हे चालू असते,त्याचा विचार न करता सतत प्रयत्नरत रहा असे आवाहन केले. यावेळी प्रमुख अतिथी यांच्या हस्ते कला, क्रिडा, सांस्कृतिक स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना व आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुरेखा जैन, सुजाता तोष्णीवाल, राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत तृतीय पारितोषिक विजेती कल्याणी नरवडे,अटल स्पर्धेत भारतातून निवड झालेल्या चंचल सेंधवकर, श्रावणी म्हैसमाळे, राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेतील सहभागी विद्यार्थीनी प्रचिता कळसकर व स्नेहसंमेलन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते वैशाली लोंढे व त्र्यंबक गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेशा नेहते व माधवी चव्हाण यांनी तयार केलेल्या दैनिक सारस्वत विशेष अंकाचे विमोचन करण्यात आले.बक्षिसांचे वाचन अविनाश वाघचौरे, वैशाली लोंढे, लक्ष्मीकांत जोशी, मच्छिंद्र पाटील, अनिल कांबळे , मोहम्मद आसिफ शेख यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन अतिशय खुमासदार शैलीत मच्छिंद्र पाटील,ईश्वरी चाटुपळे, स्नेहल फासाटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी संसदेचे लक्ष्मीकांत जोशी, जगन्नाथ राऊत, वैशाली लोंढे,छाया डुबे, सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख सुनिती बाविस्कर, किर्ती सनेर, जयश्री महाजन, सुजाता तोष्णीवाल,एन सी सी अधिकारी बाबासाहेब सोकटकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अमृता काळे,तुषार अहिरे,एन सी सी चे विद्यार्थी, सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.प्रमुख पाहुणे यांचा परीचय राजू शिंदे व ज्ञानेश्वर चाटुपळे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल लोंढे यांनी तर आभारप्रदर्शन उपमुख्याध्यापक युवराज पाडळे यांनी केले.

# रांजणगाव येथील एटीएम फोडणारे चोरटे २४ तासांत जेरबंद

## वाळूज एमआयडीसी पोलिसांची कामगिरी







वाळूज महानगर: वाळूज महानगर : रांजणगाव शेणपूंजी येथील बाळकृष्ण पेट्रोलपंपच्या समोरील एचडीएफसी बँकेचे एटीएम फोडून आतील लाखो रुपयांची रोकड पळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्या विरोधात एमआयडीसी वाळूज पोलिसांत गुरूवारी गुन्हा दाखल झाला होता, याप्रकरणाचा पोलिसांनी जलतगतीने तपास करत अवघ्या २४ तासांच्या आत एटीएम फोडणाऱ्या दोघा चोरट्यांना ताब्यात घेऊन जेरबंद केले. झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न बघणारे दोघेजन उत्तर प्रदेश राज्यातून वाळूजमध्ये चोरीच्या उद्देशाने आले होते, वाळूजमध्ये एखादा 'बडा हाथ' मारून रातोरात उत्तरप्रदेश येथे फरार होण्याचा त्यांचा 'प्लॅन' होत अशी कबुली चोरट्यांनी पोलिसांकडे दिली.

रांजणगाव येथील बाळकृष्ण पेट्रोल पंपाच्या समोरून औद्योगिक परिसराकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर एचडीएफसी बँकेचे एटीएम मशिन आहे. २ डिसेंबर रोजी मशिनमध्ये सुमारे १२ लाख ३९ हजार ६०० रूपयांची रोकड टाकण्यात आली होती. दरम्यान ३ डिसेंबर मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास दोन चोरटे एटीएम मशिनमध्ये दगडाच्या मदतीने छेडछाड करत असल्याचा प्रकार एटीएम ऑफीसरच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ स्थानिक पोलिसांना माहिती दिली. माहितीचे गांभिर्य लक्षात घेऊन पोनि कृष्णा शिंदे यांनी त्यांच्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली, परंतू पोलिस येत असल्याची चाहूल लागल्याने चोरटे पसार झाले होते. दुसऱ्या दिवशी पो.नि.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि विनोद आबुज, पोउपनि विलास वैष्णव, पोह बाबासाहेब काकडे, बाळासाहेब आंधळे, पोअं. सुरेश भिसे, प्रशांत सोनवणे, अनिल भाले, राजाभाऊ कोल्हे यांच्या पथकाने प्रयत्न करून चोरट्यांना ताब्यात घेतले. २४ तासांच्या आत एमआयडीसी पोलिसांनी चोरट्यांच्या मुसक्या आवळल्याने ग्रामस्थांतून एमआयडीसी वाळूज पोलिसांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून कौतूकही होत आहे.

# बांगलादेशात हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात तहसीलदारांना निवेदन



तभा वृत्तसेवा
गंगापूर दि.६ डिसेंबर


बांगलादेशात हिंदूवर अमानुष अत्याचार होत असून अशा धर्मांध लोकांवर कारवाई करण्यात यावी या मागणीची निवेदन सकल हिंदू समाज गंगापूरच्या वतीने येथील तहसीलदार नवनाथ वगवाड यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

बांगलादेश येथे होत असलेल्या हिंदु धर्मातील लोकांवर जिवघेण्या मारहाण व अमानुष छळ होत आहे.इ. स. १९७१ ला भारताच्या दया आणि कृपा आशीर्वादाने अस्तित्वात आलेल्या बांगलादेशात, हिंदू समाजावर धर्मांध आणि जिहादी मानसिकतेच्या लोकांकडून सातत्याने अन्याय, अत्याचार होत आहे. बांगलादेशात हिंदू बांधववार होत असलेल्या अन्याय, अत्याचारामुळे देशभरात बांगलादेश विरोधात संतापाची लाट असून, या धर्माध,

जिहादी मानसिकतेला वठनीवर आणण्यासाठी भारत सरकारने निर्णायक भूमिका घेत याप्रकरणात हस्तक्षेप करून बांगलादेशातील अल्पसंख्यक हिंदू समाजाच्या सुरक्षेसाठी कठोर अणि त्वरित पावले उचलावी. त्याच बरोबर, संयुक्त राष्ट्रसंघात हा मुद्दा उपस्थित करून

आंतरराष्ट्रीय समुदायाने या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी प्रयत्न करावेत. अशी सकल हिंदू समाजाच्या वतीने निवेदनात करण्यात आली आहे.

# चिंतामणी कॉलनी येथे आचार्य विरागसागरजी महाराज ४२ वा मुनिदिक्षा दिवस निमीत्त धार्मिक कार्यकमांचे आयोजन : मुनिश्री विशेषसागर महाराज ससंघाची उपस्थिती



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – श्री.१००८ खंडेलवाल दिंगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार अंतर्गत श्री.१००८ चंद्रप्रभु दिंगबर जैन मंदिर चिंतामणी कॉलनी येथे प.पु.समाधी सम्राट भारत गौरव गणाचार्य १०८ विरागसागरजी महाराज यांच्या ४२ वा दिक्षा दिवस व ४२ भक्तांचा विशेष सन्मान समारोह प.पु.श्रमणमुनि, विशेषसागरजी महाराज व प.पु. विश्वदक्ष सागरजी महाराज व क्षुल्लकश्री विश्वोतीर्णसागरजी महाराज यांच्या सानिध्यात कार्यकम आयोजीत करण्यात आला आहे.

सर्व प्रथम दिनांक ०८ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता भगवंताचा अभिषेक, ८ वाजता ध्वजारोहन, मंडप उदघाटन, स्वागत गित, मंगला चरण व आचार्य विरागसागरजी महाराज यांची पुजन विनयांजली व मुनिश्रींचे प्रवचन तदनंतर ४२ गुरैभक्तांचा सन्मान समारोह होणार आहे. तसेच यावेळी ११ ते २ या वेळेस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. संध्याकाळी ६ वाजता गुरैभक्ती व महाआरती होणार आहे. संध्याकाळी ७.१५ वाजता श्रमणसंस्कृती उननायक आचार्य विरागसागरजी महाराजांच्या जीवनावर आधारीत हिंदी चित्रपट दाखविण्यात येणार आहे. दिनांक ०९ डिसेंबर रोजी सकाळी भगवंताचा अभिषेक, शांतीधारा, पुजन, आचार्य विमलसागरजी महाराज यांचे विधान व विनयांजली व मुनिश्रींचे प्रवचन संध्यकाळी ६ वाजता गुरैभक्ती आरती व आनंद यात्रा आयोजीत करण्यात आली आहे. कार्यकमासाठी पंडित अथर्व जैन मुलावा हे लाभले आहे.

संपुर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी आयोजक व नियोजक श्री.१००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर चितामणी कॉलनी व सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर परिश्रम घेत आहे. तरी समाज बांधवांनी वरील कार्यकमास मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# जागतिक मृदा दिवस साजरा

## माती नमुना कसे घ्याल याबद्दल केली जागृती

तभा वृत्तसेवा

कन्नड – दि.०६ डिसेंबर – जागतिक मृदा दिना निमित्त जवाहर नवोदय विद्यालय अंतर्गत स्कूल सॉईल हेल्थ प्रोग्राम अंतर्गत कन्नड कृषी कार्यालयाकडून विद्यार्थ्यांना मातीचे नमुने कसे काढावे याबाबत दि.०५ रोजी मार्गदर्शन करण्यात आले

तालुक्यातील अंधानेर शिवारातील मातीचे नमुने घेण्यात आले,मातीचे नमुने कसे घ्यावे त्याची गुणवत्ता कशी तपासणी होते याबाबत विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांनी माहिती देण्यात आली याचवेळी मृद आरोग्य पत्रिका वाटप करण्यात आले तर शेतकरी बांधवांनी मृद आरोग्य पत्रिकेनुसार खताचा वापर कसा करावा याबाबत सखोल माहिती देण्यात आली,सदर जनजागृती कार्यक्रम तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला यावेळी प्राध्यापक राजेश दिघे, कृषी सहायक अनिल गुरव, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक आनंद राहणे, सह विद्यार्थी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय तालुक्यात अव्वल

तभा वृत्तसेवा

कन्नड – दि.०६ डिसेंबर – महाराष्ट्र शासनाने शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा'अभियानात सन २०२४ या शैक्षणिक वर्षातील खाजगी माध्यमिक गटात तालुकास्तरावर कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांकाचे तीन लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविल्याची माहिती जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर कृष्णराव जाधव व मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांनी दिली.

कन्नड तालुक्यातील सर्वांगीण शिक्षण देणारी नावलौकिक मिळविलेल्या या शाळेने गुणवत्ता राखत 'मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा' या अभियानात बाजी मारली आहे.या अभियानात विद्यालयात उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता,अध्ययन,अध्यापन,प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर,पर्यावरण संवर्धनाची जाणीव,सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता,चांगले आरोग्य,राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठीचे प्रयत्न, व्यवसाय शिक्षणाची तोंडओळख,अंगभूत सांस्कृतिक– कला–क्रीडागुणांचा विकास,अशा अनेक निकषांचा अंतर्भाव करण्यात आला होता. हे सर्व निकष पूर्ण करीत शाळेने यश संपादित केले व तालुकास्तरावर प्रथम क्रमांकाचे तीन लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले.शाळेत गुणवत्ता विकासवाढीसाठी सर्वच परीक्षांमध्ये विक्रमी यश संपादन केले आहे.

शाळेच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ,शिक्षण विस्ताराधिकारी टी डी शिंदे, केंद्रप्रमुख दिलीप गायकवाड केंद्रप्रमुख बाजीराव ताठे,नितिन वाघ यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# खादगावाची तूर पीकपद्धती जिल्ह्यासाठी आदर्श

## कृषिशास्त्रज्ञ डॉ- सूर्यकांत पवार यांचे यांचे मत

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

गोदावरी वाणाचे तुरीचे गाव म्हटले की खादगाव (ता. पैठण) या गावाचा हमखास उल्लेख करावा लागेल. या गावात ७०० ते ८०० एकर क्षेत्रात हे पीक गावातील शेतकऱ्यांनी उत्तम व्यवस्थापन केल्याने बहरले आहे, असे मत तूर शेतीदिन कार्यक्रमात कृषिशास्त्रज्ञ डॉ. सूर्यकांत पवार यांनी गुरुवारी, ५ डिसेंबर रोजी व्यक्त केले.

खादगाव येथील प्रगतशील तूर उत्पादक शेतकरी भागवतराव डाके यांच्या शेतात तूर वाण गोदावरी शेतीदिन संपन्न झाला. यावेळी तूर उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वर्षी गोदावरी वाणामुळे आमच्या गाव शिवाराचे नक्कीच उत्पादन वाढेल, असे शेतकरी आनंदाने सांगत होते. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे गोदावरी वाण आम्हाला पसंत पडल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. खादगावचे शेतकरी मागील सात वर्षांपासून कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या तूर वाणाची लागवड करतात. पहिले चार वर्षे बीडीएन–७११ आणि मागील तीन वर्षांपासून गोदावरी या बागायती वाणाची शेतकरी लागवड करीत आहेत, अशी माहिती रामेश्वर ठोंबरे यांनी शास्त्रज्ञांना दिली. या वाणापासून आम्हाला चांगले उत्पादन मिळत आहे, अशी माहिती शेतकरी बांधवांनी आम्हाला कळविली असल्याचे ठोंबरे म्हणाले.

कडधान्य पैदासकार डॉ. दीपक पाटील म्हणाले, विद्यापीठाला एक वाण निर्मिती करण्यासाठी मोठा कालावधी खर्च करावा लागतो, तो वेगवेगळ्या अंगाने तपासला जातो. त्याला चारही कृषी विद्यापीठांची अनुमती लागते, तेव्हा तो वाण तुमच्यापर्यंत येतो. थोडक्यात विद्यापीठ कोणताही वाण शेतकरी बांधवांना देण्यापूर्वी खूप काळजी घेते म्हणून विद्यापीठ निर्मित वाणावर राज्यातील शेतकऱ्याचा विश्वास आहे. हा विश्वास आणखी दृढ होण्यासाठी आणखी जोमाने काम करू, असे म्हणाले. सध्या ढगाळ वातारणामुळे तूर पिकावर अरिष्ट आले असल्यामुळे फुलगळ होईल आणि शेंगमाशीचा प्रादुर्भावही होऊ शकतो. त्यासाठी फुलोरा व वादी अवस्थेतील तूर पिकाची काळजी घ्यावी लागेल. फुलगळ होऊ नये, यासाठी पलानोफिक्स २ मिली १० लिटर पाण्यात फवारणी करावी. शिवाय शेंग माशीसाठी किटकनाशकाची फवारणी करावी. आपण सर्व शेतकरी बांधवांनी कष्टपूर्वक या वाणाचे महत्व इतर शेतकऱ्याच्या नजरेत आणल्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांचे विद्यापीठाच्या वतीने अभिनंदन करतो. या वेळी गटचर्चेत सोपानराव डाके, सुदाम डाके, भरत जाधव, धनंजय डाके, डॉ. अप्पासाहेब डाके यांनी उपस्थित केलेल्या समस्यांचे शास्त्रज्ञांनी निराकरण केले. शिवारफेरीत डॉ. अप्पासाहेब डाके, सोपानराव डाके, सुदाम डाके, ज्ञानेश्वर डाके आदी गोदावरी वाण उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतात पाहणी करून समाधान व्यक्त केले.

# डिसेंबर उजाडला, जि.प.चे अनेक कामे प्रलंबित; मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले मुदतीत कार्यवाहीचे निर्देश

## विविध कामांचा सोयगावला आढावा बैठक.

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.५ डिसेंबर

डिसेंबर महिना उजाडला तरीही अद्याप सोयगाव पंचायत समितीच्या अनेक विभागांच्या कामे अपूर्ण आहे काही कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. हे बाब गंभीर आहे.त्यामुळे कार्यवाही तत्काळ पूर्ण करून विकासकामे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास मीना यांनी गुरूवारी सोयगाव पंचायत समितीच्या आढावा बैठकीत विभागप्रमुखांना दिले.

तालुका विविध विकास कामांचा आढावा बैठक बचत भवनात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली,त्यावेळी ते बोलत होते.यावेळी गटविकास अधिकारी दादाराव अहिरे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गितेश चावडा,गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव,बांधकाम अभियंता राजगुरू,मोघडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी,तालुक्यातील ग्रामसेवक उपस्थित होते.मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मीना म्हणाले की,तालुक्यातील मंजूर जलजीवन मिशनची कामे तातडीने पूर्ण करून ग्रामपंचायतला सुपूर्द करा,ग्रामपंचायत ची वसुली डिसेंबर अखेर पर्यंत ७० टक्के करून मार्च अखेरीस पर्यंत वसुली ९५ टक्क्यांपर्यंत झाली पाहिजे अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या दरम्यान तालुक्यातील रोहयो अंतर्गत झालेल्या मंजूर कामांची डिसेंबर पर्यंत पूर्ण करावे तसेच नवीन रोहयो ची कामे मंजूर करावी अशा सूचना यावेळी डॉ. मीना यांनी देऊन ग्रामपंचायत निहाय ग्रामसेवक यांचेकडून योजना निहाय कामांचा आढावा घेतला यावेळी आरोग्य, शिक्षण,रोहयो,बांधकाम विभाग आदी योजना निहाय कामांचा आढावा घेवून तातडीने अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी डिसेंबर अखेर ची डेड लाईन देण्यात आली.

चौकट;–दरम्यान गुरुवारी आयोजित विविध कामांच्या आढावा बैठकी पासून प्रसार माध्यमांना तालुका प्रशासन कडून दूर ठेवण्यात आले होते यासाठी स्वतंत्र पंचायत समिती चे शिपाई माध्यमांवर बाहेर नजर ठेवून होते त्यामुळे तालुका प्रशासनाचा हा सावळा गोंधळ कशा साठी होता याचे रहस्य मात्र कळाले नव्हते.

# राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेचा समारोप





छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

४ ते ६ डिसेंबर २०२४ या दरम्यान महात्मा गांधी मिशन विद्यापीठ येथे राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेची शनिवारी सांगता होत आहे. आयर्न मॅन नितीन घोरपडे, शिवछत्रपती पुरस्कारार्थी अजित पाटील, संदीप तरटे, तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण, दिनेश वंजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धा सुरू आहे.

निवड समिती सदस्य म्हणून शरद तरटे, आशिष जोगदंड, छबुराव काळे, अक्षय साळुंखे, यश साळुंखे, शिरीष थत्ते, गीता म्हस्के तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, सचिन पुरी, सदानंद सवळे, क्रीडा अधिकारी गणेश पाळवदे, राम मायंदे, खंडू यादवराव, लता लोंढे, सचिन बोर्डे, सोमनाथ सूर्यवंशी, वैभव सुगावे यांचा समावेश आहे.

एअर रायफल ओपन साईट, एअर रायफल वेबसाईट या प्रकारांमध्ये १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुले व मुलींमध्ये स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघाची निवड होणार आहे.

१७ वर्षांखालील मुले व मुली यातील विजेते प्रथम तीन क्रमांकाचे खेळाडू यांची इंदोर येथे २० ते २४ डिसेंबर या कालावधीमध्ये राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड होणार आहे. तसेच १४ व १९ वर्षांखालील मुले व मुली यांची भोपाळ येथे २ ते ७ जानेवारी २०२५ या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड होणार आहे.

सर्व विजेत्या खेळाडूंना मेडल देऊन सन्मानि करण्यात आले. सूत्रसंचालन गणेश पाळवदे यांनी केले.

१४ वर्षाखालील मुले ओपन साईट एअर रायफल (अनुक्रमे प्रथम द्वितीय तृतीय ) : आर्यन कुंभार (कोल्हापूर विभाग), उत्कर्ष अनिल बाहेकर (अमरावती विभाग), सिद्धार्थ खैरनार (नाशिक विभाग), १४ वर्षे मुली ओपन साईट एअर रायफल (अनुक्रमे प्रथम द्वितीय तृतीय): तनुष्का शिंदे (नाशिक विभाग), निर्वाणी नरवाडे (अमरावती विभाग), नव्या गोयंका (मुंबई विभाग),

१७ वर्षाखालील मुले ओपन साईट एअर रायफल (अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय) : आदित्य शेळके (अमरावती विभाग), पृथ्वीराज साळक (अमरावती विभाग), स्वरुप चव्हाण (पुणे विभाग ), १७ वर्षाखालील मुली ओपन साईट एअर रायफल (अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय) : नंदिनी सर्वगोड (पुणे विभाग), सई पाटील (कोल्हापूर विभाग), असावरी मेळवणे, (कोल्हापूर विभाग), १९ वर्षांखालील मुले ओपन साईट एअर रायफल (अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय), साहिल सोनुने (पुणे विभाग), कार्तिक कोल्हे (पुणे विभाग), प्रणव मुकुंद पवार( कोल्हापूर विभाग), १९ वर्षांखालील मुली ओपन साईट एअर रायफल (अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय), निकिता रोकडे (पुणे विभाग), श्रुती बडे (अमरावती विभाग), समीक्षा खोत (कोल्हापूर विभाग).

यावेळी सोमीनाथ शिराणे, विठ्ठल देवकर, श्रीधर झरेकर, लक्ष्मण सोलट, सुभाष पारखे, आबा चव्हाण, श्रीधर दसपुते, किरण नरवडे, सुशील धोंगडे, विशाल धुमाळ, विक्रम धुमाळ, विजय धुमाळ, दिलीप दांडेकर, संतोष सावजे, दीपक दांडेकर, शुभम पारखे, रामेश्वर शिंदे, अंकुश सोलट, विठ्ठल नरवडे, संतोष पळसकर, संतांष सोलट, दिगंबर झरेकर, अरविंद लांडे पाटील आदींसह सातारा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठिकठिकाणी महापरीनिर्वाण दिना निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**बिडकीन येथील भगवती विद्यालय**

बिडकीन दि. ६ डिसेंबर पैठण तालुक्यांतील बिडकीन येथील भगवती विद्यालय,बिडकीन येथे महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा करण्यात आला शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ राशिनकर यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले, विद्यार्थ्यांनी महामानवाच्या जीवनावर प्रकाश टाकला. प्रथम क्र. राजकन्या मंडाळ द्वितीय क्र. वैष्णवी पुदाट तृतीय क्र. जिकरा शेख हिने पटकवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचल रामनाथ धनवे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन खुशाल चव्हाण यानी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रायभान रकटे , श्रीधर जऱ्हाड , सुनील पवार,अप्पासाहेब किसवे, आशुतोष झारगड , श्रीम.विश्रान्ती सलगरे, सुभाष राठोड, अशोक डूबे, यांनी सहकार्य केले. संविधान वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली



**बिडकीन पोलीस ठाणे**

बिडकीन दि ६ डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्यात महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, स्थानिक गुन्हा शाखेचे एस एस कदम, सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे, अशोक सोकटकर, महादेव निकाळजे, आप्पासाहेब माळी,संजय चव्हाण, दिलीप साळवे, होमगार्ड, महिला पोलीस आदींसह सर्व पोलीस कर्मचारी यांची उपस्थिती होती.



**बिडकीन ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल**

बिडकीन दि ६ डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्लू माउंटन प्री स्कुल मध्ये महापरिनिर्वाण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे संचालक श्री. सतीश तोतला सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून प्रेरणादायी भाषण केले. आपल्या भाषणात त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचे महत्व, शिक्षणाचे सामर्थ्य, आणि समतेच्या मूल्यांवर भर दिला.तसेच कार्यक्रमात शाळेतील काही विद्यार्थ्यांनी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर भाषणे सादर केली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोनाली खोंड यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी,यांनी या दिवसाचे औचित्य साधत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.



**ग्रुप ग्रामपंचायत वेरुळ येथील कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मा.सरपंच प्रकाश पाटील मिसाळ, ग्रामपंचायत सदस्य चंदु राठौड, नामदेव बकाल , हंसराज चव्हाण , लिपिक शेख नईमोद्दीन, मिलिंद जाधव वेरुळकर**



**सोयगाव,दि.६ डिसेंबर : जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी समाजसेवक राजू कुडके,सुनिल निकम, पालक संतोष इंगळे,मुख्याध्यापक किरण पाटील, सहशिक्षक गोपाल चौधरी, प्रशिक्षित शिक्षक शुभम देसले, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.**



**खैरगाव(म.) ता. अर्धापूर जि. नांदेड येथील अंगणवाडी मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी अभिवादन करण्यात आले यावेळी अंगणवाडी सेविका व मदतनीस मीना थोरात दिसत आहेत.**



**अहिल्यानगर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना प्रभारी आयुक्त प्रशांत खांडके, कर प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, हरियालीचे सुरेश खामकर, प्रशांत रामदिन, प्रशांत चांदणे आदी उपस्थित होते.**









वाळूज महानगर (प्रतिनिधी) : आज पद्मपाणी बुध्द विहार बजाज नगर मध्ये डॉं.बाबासाहेब आंबेडकर यांना ६८व्या महापरीनिर्वाण दिनी अभिवादन करण्यात आले.

आम्रपाली बौद्ध विहार येथील कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विहारचे अध्यक्ष एल.एल.गायकवाड , एम.एस. ओव्हाळ ,सुभाष कोसरे,यू.के.मोरे विकास रामटेके, ड. नामदेव सांवत, एस.हीवराळे, राजेश शेंडे, आप्पासाहेब जाधव, रमेश मगरे ,अशोक होळकर ,एन.एम,बगाटे ,रमेश दांडगे, मिलिंद गवळी, उध्दव सुंगधे,सुरेश गनकवार,हनूमंत भवरे आदींची उपस्थिती होती.

**जैन नॅशनल पब्लिक स्कूल**

येथील कार्यक्रमात चिमुकल्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजा करण्यात आली. यावेळी मुख्यध्यापिका माधुरी सिंह भाटी , शिक्षिका सोनाली महाजन , सवीत्रा थिटे , ललिता प्रजापत , रंजना मोर्य आदी उपस्थित होते.

**संकल्प शिक्षण प्रतिष्ठान**

संकल्प शिक्षण व सांस्कृतिक प्रतिष्ठान संचलित यशश्री प्राथमिक व माध्यमिक विद्यालय स्पिरिट इंटरनॅशनल आर्ट कॉमर्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज सिडको महानगर -१ येथे महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

प्रसंगी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक विभागाच्या प्राचार्य संध्या जाधव मॅडम व विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक भिमराज गायकवाड होते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक लक्ष्मण हिवाळे हे होते . यावेळी कमलाकर दौंड, अरुण शिंदे , निलेश राजपूत , योगेश धनेधर, मोहिनी शिरसाठ, पंकज महामुनीम , ज्योती मुंडे , माहेश्वरी महाजन आदींची उपस्थिती होती.

**श्री गजानन विद्यामंदिर**

येथील कार्यक्रमात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले तसेच याप्रसंगी शाळेत १८ तास अभ्यासिका महावाचन व शांतता रॅली चे शाळेपासून ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत आयोजन करण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . यावेळी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष आय.जी. जाधव, संस्थेचे सचिव हारीष जाधव, प्राथमिक मुख्याध्यापिका सुरेखा बस्वदे, माध्यमिक मुख्याध्यापक हनुमंत जाधव , उपमुख्याध्यापक शहाजी मंगनाळे, मनीषा नवथर, इंग्रजी माध्यम मुख्याध्यापक भाऊसाहेब शिरसाठ, रेखा बिदरकर . आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गुलाब मोहिते तर आभार प्रदर्शन परमेश्वर गीते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक तारडे, कल्याण कुलकर्णी,विशाल जाधव,स्वाती सूर्यवंशी, उज्वला सवई, गंगासागर बोराडे, सुनील शिंदे, उल्हास वाघ, शेख साजिद , दिपक पठारे, पूजा गिरी, रोहिणी शेळके, अश्विनी कुलकर्णी, जब्बार पठाण, विनय अवसरमोल ,सोनी कुमारी, पूजा खोतकर, अस्मिता तायडे, अर्चना बुर्जे, प्रिती नरवाडे, पूजा ठाकूर आदीनी परिश्रम घेतले.

**जि. प. साजापूर**

साजापूर येथील जिल्हा परिषद शाळेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.. यावेळी मुख्याध्यापक लोहाडे सर यांच्यासह भास्कर गोपाळ, अनिल जाधव, धनंजय नागमवाड, सुनिता गवई, अलकनंदा घुगे, रेणुका शिंदे, प्रिती गंगवाल, अश्विनी मोरे, रेशवाल, काळे ,रहाणे आदींची उपस्थिती होती. यावेळी आरती गाढे, प्रतीक शिर्के,रणवीर म्हस्के या मुलांनी भाषणे केली.

**शहीद भगतसिंह हायस्कूल,बजाजनगर**

येथील कार्यक्रमात भारतरत्न, बोधीसत्व, महामानव, युगपुरूष,घटनापती,बहुजननायक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक गौतम शिंदे व प्रमुख पाहुणे म्हणून रामा चोपडे , हरिश्चंद्र गवळी हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या उपस्थितीत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.या वेळी वर्षा जाधव, रामा चोपडे, महादेव लाखे, वैभव ढेपे, रोहिणी पवार, भरत बोडखे,शहाजी भुकन,जितेंद्र बरंजाळेकर,सुनीता साक्रूडकर,सुनंदा गायकवाड, सोनल पाटील,हरिश्चंद्र गवळी,आतिष डोईफोडे,गोपाळ आधाने,अंबिका साळवे, ज्योती बाणेदार, सुनील बर्डे, विनोद म्हस्के,भाऊसाहेब कोळी,शैलेंद्र रसाळ आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**पँथर्स रिपब्लिकन पार्टी**

पँथर्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळेस महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सर्जेराव मनोरे, साहेबराव नवतूरे मराठवाडा संघटक, जिल्हा अध्यक्ष विजय दिवेकर, जिल्हा कार्याध्यक्ष सोमनाथ महापुरे, , पश्चिम शहराध्यक्ष संदीप काळे, जिल्हा सचिव राकेश साबळे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मोरे, सिद्धार्थ पवार, सचिन पवार आदींची उपस्थिती होती.



कन्नड :- दि.०६ डिसेंबर - महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयात विनम्र अभिवादन करण्यात आले,

विद्यालयाचे मुख्यध्यापक प्रदीप भोकन यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले यावेळी शालेय विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणाद्वारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आजारामर कार्याविषयी महती व्यक्त केली.यावेळी दत्तात्रय गायके जगमोहन मुंडवाडकर दीपक जाधव ज्ञानेश्वर नायकुडे लक्ष्मण पांडव योगेश कुमावत सुरज हिरे सुनिता दाबके सुनिता बाविस्कर सीमा राठोड योगिता काळे यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश जंजाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन भगवान म्हैसमाळे यांनी केले.



**बालज्ञान मंदिर सातारा परिसर छत्रपती संभाजी नगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यात आले.**

**दगडोजीराव देशमुख कला महाविद्यालयात व्याख्यान**

वाळूज महानगर (प्रतिनिधी) येथील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले होते. व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. सुनील सोनवणे, (समाजशास्त्री विभाग) यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ संजय सांभाळकर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ युवराज दबडगे हजर होते.



यावेळी डॉ. सुनील सोनवणे म्हणाले की परंपरेने ज्या समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच नाकारण्यात आला होता त्यांच्या उद्धारासाठी, स्त्री शिक्षण आणि वंचित घटकांच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अनमोल आहे. शिक्षण हे आपल्या उद्धाराचे माध्यम असून, शिक्षणाने आपल्या येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्याचे निर्माण करता येते. म्हणून आपण कोणत्याही परिस्थितीमध्ये शिक्षण घेतलं पाहिजे असं बाबासाहेबांनी म्हटले आहे. संपूर्ण जग बाबासाहेबांना नॉलेज ऑफ सिम्बॉल म्हणून मानतात. यासारख्या कितीतरी उपाध्या बाबासाहेबांना दिल्या जातात ते केवळ त्यांच्या विद्वत्तेच्या जोरावर. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रमेश जायभाये प्रा. सिंधू हळदे व महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी हजर होते.



कन्नड :- दि.०६ डिसेंबर - शहरात डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिना निमित्त कन्नड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्दानात अभिवादन सभा घेण्यात आली.

यावेळी श्रामणेर संघ भंते काश्यप, भंते गयाकाश्यप, भंते नदिकाश्यप यानीं बुध्दवंदना घेतली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन सभेचे प्रास्ताविक कन्नड कारखान्याचे माजी संचालक अनिल सिरसाट यानीं तर मनोगत प्राचार्य अरविंद कांबळे, रिपब्लिकन सेना तालुका अध्यक्ष अशोक महाले, रिपाई तालुका अध्यक्ष संदीप सातदिवे तर अध्यक्षीय समारोप बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक राजेन्द्र पगारे यांनी केला.

सुत्र संचालन कडुबा पवार यांनी तर आभार पप्पू सातदिवे यानीं मानले. या प्रसंगी कॉग्रेस सेल चे तालुका अध्यक्ष मोगल वाघ, भिमशक्ती चे तालुका अध्यक्ष समुद्र मोरे, भिमशक्ती चे जिल्हा योगेश अंभोरे, पँथर चे शहर अध्यक्ष दिपक सिरसाट, युथ पँथर तालुका अध्यक्ष राहुल सातदिवे, वंचित बहुजन आघाडी चे बापुसाहेब मोरे, नितिन बोर्डे, नानासाहेब थोरात, केरूबा पगारे, गौतम जाधव, बंटी सातदिवे, प्रविण गायकवाड़, राहुल देवरे, हसन पठाण, नारायण कनगरे, सिद्धार्थ बनकर, जितेंद्र साठे, स्वप्नील निकम, लगड सर, पोलिस हेडकोस्टबल संदीप कनकुटे स महिला पोलीस हेडकॉन्सटेबल सुकेशनी कांबळे, शकुंतला देहाडे, माया जाधव, जनाबाई जाधव, सुशीला पवार, देहाडे मावशी, सिद्धार्थ निकाळजे, कारभारी सिरसाट, शांताराम गायकवाड़, पांडुरंगबाबा सिरसाट अदीसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

## भाजपच्या केंद्र व राज्य सरकारचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर कार्य: ॲड.अभय आगरकर

नगर - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, वैज्ञानिक क्रांती व विचार जगाला प्रेरणादायी ठरत आहे. संविधानाने या देशातील प्रत्येक नागरीक, महिलेला समान न्याय, हक्क व अधिकार प्राप्त झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार व राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखालील महायुतुचे सरकार डॉ.आंबेकर यांच्या विचारावरच कार्य करत आहेत. त्यामुळे संविधानानुसार सर्व जनतेला न्याय मिळत आहे, असे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी केले.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहर भाजपाच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी मार्केट यार्ड येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी अभय आगरकर बोलत होते. यावेळी गोपाल वर्मा, सुवेंद्र गांधी, दत्ता गाडळकर, प्रिया जानवे, कालिंदी केसकर, श्वेता पंधाडे, सुरेखा जंगम, लीला अग्रवाल, निता फाटक, ज्योती दांडगे, मीरा सरोदे, विजय गायकवाड़,सुरेश लालबागे, सचिन पळशीकर, सुनील सकट, राजेंद्र फुलारे, भार्गव फुलारे, ज्ञानेश्वर धिरडे, सुनील तावरे, प्रकाश जोशी, लक्ष्मीकांत तिवारी, सविता कोटा, राजेंद्र सातपुते,अनिल सबलोक, अनंत देसाई, भानुदास बनकर, गोकुल काळे, विशाल खैरे, सारीका जंगम, चंद्रकांत पाटोळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



**अहमदनगर येथे जिल्हा परिषद**

जिल्हा परिषदेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हा परिषदेत त्यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, शुभम डपकर, श्री. बच्छाव आदींसह कर्मचारी उपस्थित होते

यावेळी आशिष येरेकर म्हणाले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या कृतिशील विचारांनी स्वातंत्र्यानंतर देशाला संविधानाच्या मार्गावर अग्रेसर केले. लोकशाही बळकट करण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. त्यांचे विचार प्रेरणादायी आहेत

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर.**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्ह्यात ठिकठिकाणी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

हिंगोली शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास दि ६ डिसेंबर रोजी मान्यवरांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक मधुकर मांजरमकर, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त यादव गायकवाड, आत्माराम वागतकर, नितीन राठोड, सुनील वडकुते, मोतीराम फड, बाळासाहेब पवार, प्रकाश ठाकरे, सखाराम चव्हाण, चांदोजी लाखाडे, ॲड अनिल इंगळे, ॲड धम्मदीपक खंदारे, ॲड धवसे, अशोक केंद्रे, सुरेश कुऱ्हे, निकिता इंगोले, श्वेता रणवीर, गवई, कांबळे, मिलींद इंगोले आदींची उपस्थिती होती.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राहोली खुर्द येथे महापरिनिर्वाण दिन मुख्याध्यापक गजानन बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्या म्हणून सौ.उज्ज्वला नर्सिकर, सौ.काळे उपस्थित होत्या तर मार्गदर्शक म्हणून घोंगडे अभिनंदन आणि सौ. सिंधूताई दहिफळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण कार्याची माहिति दिली. मुख्याध्यापक गजानन बोरकर यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.




यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणे केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी आरती डुकरे हिने केले प्रस्ताविक सौ.लता राठोड यांनी केले तर आभार सौ.विजयता इंगोले यांनी मानले या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

सेनगाव तालुक्यातील पळशी येथे रुक्मिणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शिवराम वाठोरे, सचिव स्वप्निल वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक व प्राचार्य पी. के. तावरे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले व पर्यवेक्षक श्री मोरे यांची उपस्थिती होती. शाळेतील सर्व शिक्षक, पवार, चापके, गीते, ढवळे, घेवंडे, वाठोरे, शिखरे, कोटकर, प्रा. गांधिले, प्रा. खंदारे, प्रा बहीरे, घोगडे, ढोले, थोरात, लोणे, इंगोले, गावंडे, लोणकर, दवंडसर, काळबांडे, खिल्लारी, शिखरे, पोहकर, सतिष तावरे, संदिप तावरे, डोंगरे पवार, बालाजी दिवाने यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओम गांधीले यांनी केले. व आभार प्रदर्शन खंदारे यांनी मानले.

शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यार्थ्यांनींनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर भाषणातून प्रकाश टाकला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डी पी डोईफोडे, एन टी सोळंके यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ अंभोरे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात केले पाहीजे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एस पी कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

शहरातील संविधान चौकात भारतरत्न डॉ बाबासाहेब यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांनी लिहीलेल्या संविधानाचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, जगजीतराज खुराणा, काँग्रेसचे उपाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, अनिल नैनवाणी, गणेश लुंगे, मिलींद उबाळे, विशाल गोटरे, आबेदअली जहागीरदार, मिलींद इंगोले यांच्यासह आंबेडकर प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिंगोली तालुक्यातील लासीना येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पवन जाधव, निलेश ठोके, सुशिल बलखंडे, दिनेश कांबळे, ऋषीकेश इंगोले, संविधान कांबळे यांच्यासह युवकांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ डिसेंबर**

हिंगोली येथील कै. शिवाजीराव सभागृह रामलीला मैदान हिंगोली येथे श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठा हिंगोली यांच्या वतीने राष्ट्रीय लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमाला प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी दिनांक १२ डिसेंबर, १३ डिसेंबर व १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७:३० ते ९:३० या कालावधीत दररोज आयोजित केलेली आहे.

महाराष्ट्रातील महापुरुष व संत यांच्या विचारातून पुरोगामीत्व प्राप्त केलेली महाराष्ट्र ही भूमी असून बहुजन समाजाला अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी सामाजिक चळवळ उभे केलेली आहे. या व्याख्यानमालेतून समाजातील संविधानिक व नैतिक मूल्य जपणुकीसाठी सामाजिक प्रबोधन करण्याचा आयोजकांचा मानस आहे.

या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प १२ डिसेंबर गुरूवारला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते अविनाश भारती हे सामाजिक समतेसाठी संतांचा संघर्ष' या विषयावर व्यक्त होणार आहेत. या कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षपदी आमदार तथा शिवसेना जिल्हाप्रमुख संतोषराव बांगर, व्याख्यानमालेचे उद्घाटक म्हणून जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विलास आघाव तसेच प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते पत्रकार वसंत भट्ट, सुभाषराव बांगर मानकरी हे उपस्थित राहणार आहेत.

दुसरे पुष्प १३ डिसेंबर २०२४ रोज शुक्रवारला असून महाराष्ट्रातील ख्यातनाम व्याख्यात्या सरस्वती भुवन कला वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर येथील इतिहास विभाग प्रमुख प्रो.डॉ. स्मिता शिंदे ह्या 'महाराष्ट्राच्या इतिहासात स्त्रियांचे योगदान' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. प्रज्ञाताई सातव तर उद्घाटक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपअधीक्षक अर्चना पाटील, सहाय्यक आयुक्त सौ गीता सानप आणि स्त्रीरोग तज्ञ डॉ. विद्याराणी बांगर हे उपस्थित राहणार आहे.

या व्याख्यानामाला तिसरे पुष्प १४ डिसेंबर रोज शनिवारला असून महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते व शिवचरित्रकार डॉ. अशोक बांगर हे 'बहुजनांचे प्रेरणास्थान एक चिंतन' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. तानाजीराव मुटकुळे तर उद्घाटक म्हणून माननीय जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे असून प्रमुख पाहुणे माजी आमदार गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबारावजी बांगर, माजी मुख्याधिकारी रामदास पाटील हे उपस्थित राहणार आहेत. हिंगोलीकर व जिल्ह्यातील ग्रामीण भागातील युवक माता -भगिनी बंधू यानी या व्याख्यानमालेचा आनंद घ्यावा, असे आवाहन श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली यांच्यावतीने करण्यात आलेले आहे. व्याख्यामाला यशस्वी करण्यासाठी श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व ग्रामीण व शहर भागात नागरिक व समाज बांधव कार्य करीत आहेत.



**हिंगोली- येथील शहर पोलिस ठाण्यात महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पोनि नरेंद्र पाडळकर यांच्यासह पोलिस कर्मचारी यांची उपस्थिती होती. छाया- लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक शुल्क माफ

हिंगोली- शासनाने दि. १ जुलै, २००४ आदेशान्वये मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ९ च्या खंड (अ) चा वापर करुन लोकहितास्तव जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, वास्तव्य प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालयासमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर आकारणी करण्यात येणारे मुद्रांक शुल्क माफ केले आहे. अनेक शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळे, शैक्षणिक संस्था व इतर कार्यालयांमध्ये जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, वास्तव्य प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येणाऱ्या नागरिक व विद्यार्थ्यांकडून केलेल्या अर्जासोबत तसेच शासकीय कार्यालये व न्यायालयासमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर १०० रुपये ते ५०० रुपये पर्यंतच्या रकमेचे मुद्रांक शुल्क लावलेल्या प्रतिज्ञापत्राची शासकीय अधिकारी तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयाकडून मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. राज्य शासनाच्या वरील आदेशानुसार सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क माफ केले असल्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील नागरिक व विद्यार्थ्यांकडून विविध प्रमाणपत्रासाठी मुद्रांक लावलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्याची मागणी करु नये अथवा आग्रह धरु नये, असे जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांना देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अनिल माचेवाड यांनी पत्राद्वारे दिल्या आहेत.

### दत्तक महिनानिमित्त हिवरा येथे जनजागृती

हिंगोली- जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय दत्तक महिना निमित्ताने औंढा नागनाथ तालुक्यातील हिवरा येथील जिल्हा परिषद शाळेत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. आंतरराष्ट्रीय दत्तक महिना निमित्ताने जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्ड हेल्पलाईन १०९८ कडून बालकासंदर्भात आणि बालकांशी निगडीत विविध विषयावर कार्यक्रम घेण्यात येत आहेत. कोणतेही बालक परस्पर दत्तक घेणे हा कायद्याने गुन्हा आहे. यासाठी कायदेशीर प्रक्रिया संकेतस्थळावर नोंदणी करुन इच्छूक पालक बालकाला दत्तक घेऊ शकतात, अशी माहिती चाईल्ड हेल्पलाईन (उक्ह) १०९८ हिंगोलीचे प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे यांनी बालकाचे कायद्याविषयी तसेच दत्तक प्रक्रियेसंदर्भात माहिती दिली. बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ व बालहक्क सप्ताहाबाबतची माहिती समुपदेशक अंकुर पाटोडे यांनी दिली. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या सामाजिक कार्यकर्ता रेशमा पठाण यांनी केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

### दुचाकीस्वारासह सोबत्याला हेलमेट सक्ती

हिंगोली- शहरातील दुचाकीस्वारांना आता हेलमेट सक्ती करण्यात येणार असून दुचाकीवर सोबत बसणाऱ्यांनाही हेलमेट सक्ती होणार आहे. लवकरच पोलिस विभाग अभियान राबवणार आहे.

# गायत्री शक्तीपीठाच्या वार्षिक उत्सवाची शिवाभिषेकाने सांगता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**



येथील गायत्री शक्तिपीठाचा २० वा वार्षिर्क उत्सव १ते५ डिसेंबर या पाच दिवस भव्य कार्यक्रमा ने संपन्न झाला या उत्सवा दरम्यान दररोज ३१ कुंडावर सकाळी ८ ते ११ गायत्री महायज्ञ संपन्न झाला यावेळी दररोज जवळपास १०० जोडप्यांनी आहुती दिली दिनांक ४ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६-३० ते ७-३० दरम्यान २४ हजार दिव्यांनी भव्य दिपयज्ञ संपन्न झाले या दिपोत्सवाने परिसर उजळून निघाला होता दीपोत्सव कार्यक्रमास शहराचे माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, डॉ.श्रीधर कंदी डॉ.मुरलीधर तोष्णीवाल, गजेंद्र बियाणी, नानुराम जांगीड कचरु, सुभाष अपूर्वा यांच्यासह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती पाच डिसेंबर रोजी शिवाभिषेक संपन्न झाला १२ ते ३ दरम्यान महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला

# पोलिस जमादाराला पाच हजारांची लाच घेतांना रंगेहाथ पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**

वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यातील जमादारास तक्रार अर्जाचे प्रकरण मिटवून घेण्यासाठी व गुन्हा दाखल न करण्यासाठी पाच हजार रूपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गुरूवारी रंगेहाथ पकडले.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत ग्रामीण पोलिस ठाणे अंतर्गत एका गावातील तक्रारदाराच्या विरोधामध्ये पोलिसांकडे अर्ज प्राप्त झाला होता. सदर अर्जाची चौकशी खांडेगाव बीटचे जमादार संजय गोरे याच्याकडे होती. जमादार गोरे याने सदर प्रकरण मिटवून घेण्यासाठी व गुन्हा दाखल न करण्यासाठी तक्रारदार यांना फोनवर संपर्क करून ५ हजारांची लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदाराने हिंगोलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यावरून दीड महिन्यापूर्वीच पडताळणी देखील करण्यात आली. यामध्ये सदर प्रकरण मिटवून घेण्यासाठी व गुन्हा दाखल न करण्यासाठी ५ हजार रूपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक विकास घनवट यांच्यासह पोलिस निरीक्षक प्रफुल्ल अंकुशकर, विनायक जाधव, सपोउपनि महमद युनुस, विजय शुक्ला, जमादार तानाजी मुंढे, रवींद्र वरणे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, राजाराम फुफाटे, भगवान मंडलीक, गोविंद शिंदे, गजानन पवार, शेख अकबर, योगिता अवचार, शिवाजी वाघ यांच्या पथकाने दुपारी चार वाजण्याच्या सुमारास वसमत ग्रामीण पोलिस ठाण्याच्या परिसरात सापळा रचला होता.

त्यानंतर जमादार गोरे याने तक्रारदाराकडून पाच हजार रूपयांची लाच स्विकारताच पथकाने त्यास रंगेहाथ पकडले. याप्रकरणी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दांडी बहाद्दरावर आळा घालण्यासाठी बायोमेट्रीक मशीन बसवा



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ६ डिसेंबर**

येथील तालुका कृषी कार्यालय, वनविभाग, पंचायत समिती, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय, पूर्णा पाटबंधारे विभाग, सामाजिक वनीकरण, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा परिषद शाळा, पशुवैद्यकीय रुग्णालय या ठिकाणी बायोमेट्रिक मशीन असणे अत्यंत गरजेचे असताना सुद्धा जुन्या रुढीप्रमाणे हजेरीपटावर हजेरी लावून कर्मचारी आपल्या सोयीप्रमाणे कार्यालयात राहत असल्याचा प्रकार उघडकीस आल्याने मानवाधिकार सहाय्यता संघाचे प्रदेश सचिव यांनी थेट जिल्हा अधिकारी यांना निवेदन दिले आहे.

शासकीय कार्यालयातील कर्मचारी हे आपण डाऊन मध्ये आपल्या सोयीनुसार शासकीय कार्यालयात हजेरी लावत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे व आर्थिक नुकसान देखील होत असल्याचे मानवाधिकार सहायता संघाचे प्रदेश सचिव (गुन्हे,शाखा )यांच्या निदर्शनास आले. वसमत येथील तालुका कृषी कार्यालय, वनविभाग, पंचायत समिती, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय, पूर्णा पाटबंधारे विभाग, सामाजिक वनीकरण, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा परिषद शाळा, पशुवैद्यकीय रुग्णालय या ठिकाणी बायोमेट्रिक मशीन असणे अत्यंत गरजेचे असताना सुद्धा जुन्या रुढीप्रमाणे हजेरीपटावर हजेरी लावून कर्मचारी आपल्या सोयीप्रमाणे कार्यालयात राहत असल्याचा प्रकार उघडकीस आल्याने मानवाधिकार सहाय्यता संघाचे प्रदेश सचिव यांनी थेट जिल्हा अधिकारी यांना तक्रारी निवेदन दिले आहे.

आता जिल्हाधिकारी वसमत येथील शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक मशीन पुन्हा सुरू करण्याचे आदेशित करतील का? याकडे आता मानवाधिकार सहायता संघाचे लक्ष वेधून आहे यावेळी मानवाधिकार सहायता संघाचे प्रदेश सचिव (गुन्हे शाखा) यांच्याशी बातचीत करताना संबंधित वृत्तपत्राच्या प्रतिनिधींनी विचारले असता ते म्हणाले की आम्ही दिलेल्या निवेदनावर जर कारवाई करून बायोमेट्रिक मशीन बसवण्याचे आदेश नाही देण्यात आले तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. सदरील निवेदन हे उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत देण्यात आले असून या निवेदनावर मानवाधिकार सहायता संघाचे प्रदेश सचिव (गुन्हे शाखा) नवीद अहमद यांच्यासह अमजद पठाण, फेरोज पठाण, शेख आसिफ, देविदास मंत्री, तलवारे आदींची उपस्थिती होती.

# वाढीव घरपट्टीविरोधात व्यापारी, पत्रकार करणार आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ डिसेंबर**

नगरपरिषद हिंगोलीने तब्बल १२ बारा वर्षानंतर हिंगोली करावंर मालमत्ता कराचा प्रचंड बोजा लादलेला आहे. वास्तविक पाहता नगरपरिषदेने प्रत्येक चार वर्षाला पुर्नमूल्यांकन करून मालमत्ता कर आकारणी करणे रास्त असताना नगरपरिषदेने प्रचंड प्रमाणावर मालमत्ता कर आकारणी केली असून शहरातील मालमत्ता धारक या प्रचंड करवाढी विरोधात दि ९ डिसेंबर रोजी शहरातील व्यापारी आणि पत्रकार यांच्यावतीने मुख्याधिकारी यांना भेटून अन्यायकारक व अवास्तव करवाढ मागे घ्यावी अशी मागणी करणार आहेत. नगर परिषदेने ही अवास्तव व अन्यायकारक करवाढ मागे घेतली नाही तर हिंगोली शहरातील सर्व व्यापारी, पत्रकार, नागरिक यांना मोठे जन आंदोलन उभे करण्याच्या तयारीत आहेत. यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीनेही येथील गांधी चौकात वाढीव घरपट्टी विरोधात स्वाक्षरी मोहीम अभियान राबवले होते. या मोहीमेला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला असून वाढीव घरपट्टीचा मुद्दा शहरात चांगलाच गाजणार असल्याचे दिसत आहे.